# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १ माहे सप्तंबर सन १८७८ इसवी. अंक ३५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ८६ |
| महामारीवरील गोळी | ८१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ८६ |
| वैद्यप्रकाश. | २८८ |
| नादारीचे नियम. | ८८ |

सदर्हू किमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

## नोटिस.

### ५०० रुपये बक्षीस.

इंग्लिश भाषेंत आरोग्यरक्षणसंबंधी पुस्तक कोणी नवीन रचील व तें हिंदुस्थान सरकारास पास होईल तर त्यास ५०० रुपये बक्षिस देण्यांत येईल. या पुस्तकाची छापील पृष्ठें २४ हून अधिक होऊं नयेत; व तें पुस्तक सरकारच्या मालकीचें होईल आणि सरकार त्याची वेगवेगळ्या भाषेंत भाषांतरें करील.

हुकूमावरून

( Sighned ) G. H. Trevor

वऱ्हाडा करितां सेक्रेटरी.

### स्वपराक्रम.

या नांवाचें एक लहानसें पुस्तक छापविण्यास आह्मी आरंभ केला आहे. यांत उद्योगाचा महिमा वर्णन केला असून त्यापासून मनुष्याची उन्नति कशी होते हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. स्पष्टीकरणार्थ शंभर सवाशें विद्वान व नावाजलेल्या गृहस्थांचीं उदाहरणें दिलीं आहेत. यांतील बहुतेक विषय इंग्रजींतील "स्माइल्स सेल्फ हेल्प" या नांवाच्या अत्युत्तम ग्रंथांतून घेतला असून याचीं षोडशपत्री साऱ्याची सरासरी ८० पृष्ठें होतील. त्याची ची सही देणारांस किंमत चार आणे ठेविली आहे. वर्गणीदार मिळवून पैसे वसूल करणारास शेकडा १५ टक्के कमिशन मिळेल. पत्रव्यवहार ठरणें तो आमचे मित्र रा. भि. गुंजीकर कांदेवाडी घर नंबर १०० यांच्याशी ठेवावा. सह्यांची मुदत सपटंबर १५ तारखेपर्यंत ठरविली आहे.

## जाहिरात.

सरकारी नौकरी करितां उमेदवारांची परीक्षा तारीख १८ माहे नोंवेंबर सन १८७८ इसवी रोजीं अकोलें व उमरावती येथें हायस्कुलांत होईल. पहिल्या प्रतीच्या सर्टिफिकिटाकरितां ९ इयत्तेंत आणि दुसऱ्या प्रतीच्या सर्टिफिकिटाकारितां ६ व्या इयत्तेंत ( इंग्रजी खेरीजकरून ) होईल. उमेदवारांनीं आपले अर्ज हायस्कुलच्या हेडमास्तरांकडे तारीख १ नोंवेंबरचे आंत पाठवावे.

Narayen B. Dandekar.

अकोलें तारीख २८ आगष्ट सन १८७८ इसवी. } डैरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रकन मु. अ. हैदराबाद

## जाहिरात.

### कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांतकौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टिपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरणें चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगलि, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया. टपालखर्च एक आणा. पण एक वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाटविल्यास टपाल खर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मास 'पोष्टपेड' पत्रें कळवावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८ } रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कौमुदीमहोत्साह कर्ते.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## रेलवेस्टेशनावरून प्रतिबंध.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि० वि० पत्रकर्ते महाराज, रेलवे प्लयाटफार्मवर जाण्याला प्रतिबंध होतो अशाविषयीं आज बरेच दिवस बोभाट आहे व याविषयीं पूर्वी आपले पत्रींही कांहीं मजकूर आला आहे; पण तो प्रतिबंध अलीकडे बराच कडक रीतीनें अमलांत येऊं लागला आहे. व ज्याला कधी अरे तर कुठलें पण अहो ह्मणून सहन करून घेण्याचीही संवय नाहीं अशा संभावित प्रतिष्ठित लोकांनां सुध्दां हवेलंडी व फटफजीती सोसून व या अप्रतिष्ठेच्या योगानें मरणोन्मुख होऊन परत यावें लागतें. हें आपणास कदाचित् खरें वाटणार नाहीं. कारण आपल्या दयाळु व न्यायी इंग्रज सरकारच्या अमला खालीं कोणत्याही निरपराधी मनुष्याच्या शरीरास त्याचप्रमाणें मनास दुखापत करण्यास कोणासही अधिकार नाहीं. पुत्रकन्यादि आपण उत्पन्न व पालन केलेलीं आह्मी आपले मालकीचीं समजून त्यांस हवें तसें वागवित होतों पण हल्लीं आपल्यास त्यांसही वाईट रीतीनें वागवितां येत नाहीं. सुनास वाईट रीतीनें वागविण्याचे हेतूनें तर नव्हेच पण त्यांचें पुढील आयुष्य सुखांत जाण्याकरितां चांगल्या वर्तनक्रमाचें त्यांच्या शरीरास वळण लागावें यास्तव बरे कसोटीस लावण्यासारखे व कडक रीतीचे नियम आपल्या हिंदुस्थान देशांत पूर्वापार आलेले देखील हल्लीं सहन न होऊन पुष्कळ जणास आगळिकीबद्दल शिक्षा झाल्या आहेत. मग रेलवे स्टेशनाचे प्लयाटफार्मवर आणारे लोक असे अपराधी असतात कीं त्यांत कोणत्याहीप्रकारें धक्के मारून हाकून देण्याचा कंपनीस बेशक अधिकार असतो.

आतां आपल्या वाचकांपैकीं कोणी ह्मणतील कीं, रेलवेस्टेशन प्लायटफार्म हीं रेलवेच्या मालकीचीं आहेत तस्मात् या भागांत कोणास न येऊं देण्यास कंपनी मुखत्यार आहे- पण यावर माझें असें ह्मणणें आहे कीं, रेलवेस्टेशन व प्लयाटफार्म हीं जरी कंपनीच्या मालकीचीं आहेत तरी तीं सार्वजनिक उपयोगासाठीं आहेत. जशीं मार्केटांतील दुकानें व्यापारी लोकांच्या मालकीचीं असतात ह्मणून त्यांच्या आळींतून किंवा दुकानांवरून जाण्याला प्रतिबंध गिऱ्हाइकास अगर अवांतर त्याचे साथीदारांस व्यापारी लोक करूं शकत नाहींत तद्वत् एथेंही कोणाला प्रतिबंध नसावा. परंतु रेलवे स्टेशनला केवळ मार्केटांतील दुकानांचीच उपमा साजत नाहीं कारण मार्केटांतील दुकानांत तऱ्हतऱ्हेचे कोणें विक्रीस मांडलेलें असून रेलवेस्टेशनें फक्त भाडें करून मनुष्य किंवा सामान एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पोंचविण्या करितांच आहेत. ह्मणून या दोहोंत तंतोतंत साम्यता तर होत नाहीं हें खरें. तथापि तीं सार्वजनिक उपयोगाचीं स्थानें नाहींत असें कोणाच्यानेंही ह्मणवणार नाहीं ह्मणून तेथें सर्वांस जाण्याविषयीं अवश्य हक्क असावा.

कारण कांहीं तरी जरूरीच्या कामाशिवाय कोणी उगीच रेलवे स्टेशनावर जात नसतील व तसें जर झालें असते तर रेलवेस्टेशनावर नेहेमी वस्तीच्या मानानें सहस्त्रावधि मनुष्यांची गर्दी जमलीच राहती पण तसें बिलकुल नाहीं. क्वचित केव्हां प्रसंगानुसार स्टेशनावर निवळ प्यासेंजरचीच गर्दी अधिक जमते व तेणेंकरून एक प्रकारचा त्रास होतो एवढ्यासाठीं एकदम व सर्व लोकांस ( युरोपियन लोक व स्टेशनावरचे हमाल खेरीज करून ) सारखा प्रतिबंध करण्यापेक्षां मुंबई पुणें इत्यादि ठिकाणाप्रमाणें एथेंही प्लयाटफार्म टिकिटें सुरू करावीं हें बरें; ह्मणजे येणेंकरून गरजवंतांची गरज भागून कंपनीसही नफा होईल.

अशीं टिकिटें सुरू करून तीं संभावित व प्रतिष्ठित लोकांस देत जावीं ह्मणून ता. २४ आगष्ट १८७८ च्या उर्दू अखबारांतही त्याच्या कर्त्यांनीं शिफारस केली आहे. परंतु त्यांत त्यांनीं गरीब व सामान्य प्रतीचे लोकांस वगळलें ह्मणून आपणास विनंती करीत आहे कीं, आपण तरी त्या सर्वांच्या तर्फे शिफारस करून गरजवंतांस प्लयाटफार्म टिकिटें अवश्य मिळावीं अशी तजवीज करावी. पत्रविस्तार भयास्तव माफी मागतों.

अकोला ता. २८ माहे आगष्ट सन १८७८ इसवी.

गरीबाचा कनवाळू व

आपला दास

रामात्मज

## नोटिस.

यादव बलद विक्रम वाढी रहाणार तेल्हारें तालुके अकोट यांस जानी मर्द यादव वाढी रहाणार नागझरी तालुके खाम व इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुझ्याशीं माझें लग्न झाल्यास सुमार २५ वर्षें झालीं. जनरीतीप्रमाणें तूं व मी संसार करीत असतां अलीकडे ५।७ वर्षें तूं इकडे तिकडे फिरून मला नांदवीत नाहींस त्या मुळें मी बापाचे घरीं राहून सुमारें ४०० रुपये लोकांचें कर्ज खाल्लें. तुझेपासून झालेली मला एक मुलगीही आहे तिचें लग्न करावयाचें व माझा संसार करावयाचा या दोन्ही गोष्टीकडे तूं लक्ष्य देत नाहींस. जातींत पंचाकडेही तुला नेलें होतें पण तूं कांहीं नीट गोष्टी करून माझी तजवीज

आविली नाहींस ह्मणून ही तुला नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत तूं माझे कर्जाची रकम देऊन मला घेऊन जावें नाहींपेक्षां सरकार मार्फत तुझा लग्नाचा हक्क रद्द करून मी दुसरा घरठाव करीन मग तुझी कसलीही तक्रार ऐकिली जाणार नाहीं.

माधव वल्लद विक्रम तुझा भाऊ यास ही कळावें कीं, त्यानें तुझा शोध करून तुला ही नोटिस पोंचती करावी व यांत लिहिलेप्रमाणें तजवीज करवावी. कळावें. तारीख २९ माहे आगष्ट सन १८७८ इसवी.

(सही) जानो इचे हातची बांगडी लुद.

## कृष्णाकुमारीकाव्य.

(मागील अंकावरून पुढें चालू.)

श्लोक.

असोनि नेसावध तोतयाचा ।
केला असा जो वध तो तयाचा ॥
झाला अकीर्तिध्वज वीरवर्गीं ।
न त्या पठणासम नीच सर्गीं ॥ २२८ ॥

यथेच्छ धन घेउनी जरि
पठाण वेडासया ।
समूळ विलयास ने, तरि न
शांति देशा तया ॥
न नाश जरि हेतुचा तरि न
कार्य पावे लया ।
कुमारिच निदान ही प्रथम
धामधुमीसया ॥ २२९ ॥

कृष्णेतें ते इच्छिती दोन राजे ।
तेणें त्यांची सर्वदा गोळि गाजे ॥
दोहीं देशीं हानि झाली उदंड ।
स्वर्मीही त्यां आठवे तेंचि भंड ॥२३०॥

तेव्हां युक्ती काढिली त्या पठाणें ।
शांतीसाठीं, जी भला लोक नेणें ॥
जी युद्धाचा हेतु कृष्णाकुमारी ।
पीडा तीच्या नाशनें तो निवारी २३१

त्वतावेळ पठाण तो मग
उदेपुरा पातला ।
न निष्ठुर नयापरी तरुण
लांडगा मातला ॥
तया अजितसिंग तो, कुम-
रिकापित्याचा गडी ।
परी अनुसेर, बळें दुरित
कर्दमीं दे बुडी ॥ २३२ ॥

त्याच्या मुखें तोचि पठाण बोले ।
उदेपुरेशा निज वाक्य, मोलें ॥
ज्याशीं टिकेना विष काळकूट,
तें बोलतां येइल कां न वीट ॥ २३३ ॥

परी सांगणें प्राप्त आहे ह्मणूनी
अतां सांगतों न स्वतापा गणूनी
जशी गर्भिणी जानकी लक्ष्मणानें
वनीं टाकिली ही कथा वाल्मिकानें २३४

अजितसिंग वदे तव दारिका
जयपुराधिपतीस कुमारिका ॥
नच वरो, इजला नवरा वर
समज जोतपुरेश, न दे परा ॥ २३५ ॥

जरि असे करितां स्वजनीं रळी
तरि इचे हरुनी असु दे बळी ॥
न सुटशी करिशी न असें जरी
सुखदशेस न युक्ति दुजी वरी ॥ २३६ ॥

न वच हे जरि घेशिल आदरें
तरि तुझी न दशा बरवी खरें ॥
अति कठोर पठाण वसे जरी
तरि न त्या जगिं कोणिहि आवरी २३७

कर्णांत वाक्यविष हें करितां प्रवेश
त्रास नृपांत न उरे सुखधैर्यलेश
सिंव्हासनावरुनि तो पडला स्वघातें
मूर्छा अचेतन करी शववत् तयातें २३८

पाहूनि त्या स्वजन घाबरले समस्त
प्राज्ञासही क्षणहि दे न विवेक हस्त
ऐसा प्रसंग अति दुर्घट पातला तो
वाटे जना सकल हें जग काल खातो
॥ २३९ ॥

तेव्हां तया परिजनें विविधोपचारें
केले सचेतन पैरि स्वसुतापकारें ॥
त्याच्या मनीं भय शिरे न सुचे उपाय
कीं तो वदे अजितसिंग महान् अपाय
॥ २४० ॥

राहाटोरा मानसिंगास द्यावी
कन्या हे तों मत्कुला डाग लावी
नाहीं ऐसें बोलतां तो पठाण
क्रोधें म्यानांतून काढी कृपाण ॥ २४१ ॥

तो शूर क्रूर आज्ञा सकुलपरिजना
धाडिल प्रेतलोकीं ।
द्वेषें अन्तःपुरातें शिरुनि कुमतिनें
दुष्ट पाडील शोकीं ॥
कोणा हें या प्रसंगीं विदित भय करू
नाउ कोठें, दिसेना ।
तो आप्त, प्राप्तकाळीं उचितचि माते जो
शीघ्र सांगेल नाना ॥ २४२ ॥

(पुढें चालू.)

---

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुद्ध ५ शके १८००

## पिकापाण्याचा आहवाल.

हिंदुस्थान सरकार सर्व ठिकाणाहून प्रति आठवड्यास तारेंतून पिकापाण्याची माहिती सरकारी अधिकाऱ्यांकडून आणून घेत असतें. ही वहिवाट तिगस्तांचे दुष्काळापासून सुरू झालेली आहे. तिच्या आधारें ता. २० माहे आगष्ट या दिवशीं संपणाऱ्या आठवड्यांतील माहिती आह्मी आपले वाचकांस कळवितो.

मद्रास इलाख्यांतील सर्व जिल्ह्यांत पाऊस पडला. कृष्णा, गोदावरी, गंजाम आणि करनूल या जिल्ह्यांच्या कांहीं भागांत पाऊस अधिक झाल्याचा बोभाटा आहे, व त्रिचिनापल्ली आणि कोइमतुर या जिल्ह्यांच्या कांहीं भागांत व वैनाद जिल्ह्यांत आणखी अधिक पावसाची जरूरी आहे. तथापि सर्वत्र पिकें चांगलीं आहेत, वे धान्याचे दर उतरत चालले आहेत. दुष्काळा निमित्त मजूरकामावर लावलेल्या लोकांची संख्या ११५५९० आहे, व धर्मार्थ अन्नावर निर्वाह करणारांची संख्या ७०१४६ आहे. ही गेल्या आठवड्यापेक्षां ४४१० आणि ३३१० नीं अनुक्रमें कमी आहे. ह्मैसुर प्रांतांत चोहोंकडे पाऊस आहे, व पिकाचा धमाव चांगला आहे. आणि धान्याच्या किमती उतरत चालल्या आहेत. मजुरांची व धर्मार्थ अन्न घेणारांची संख्या ह्मैसुराकडे ३१९१८ व १३७७५ अशी अनुक्रमें आहे.

मुंबई इलाख्यांत सर्वत्र चांगला पाऊस पडला. सिंध प्रांतांत कराचीकडे पाऊस ज्यास्ती पडून नद्यांनां पूर आले तेणें करून बरेंच नुकसान झालें. गुजराथ, खानदेश, नाशीक, व दक्षिण महाराष्ट्र या प्रांतांत उघाडीची फारच जरूर होती व त्याप्रमाणें या आठवड्यांत उघाडी पडली आहे. व पिकें चांगल्या स्थितींत आहेत. नागपुर प्रांतांत पावसाची झड आहे व ती आतां उघडावी असें सर्वांस वाटत आहे. धान्याच्या किमती मूळपदावरच आहेत.

मध्यहिंदुस्थानांत माळव्यांत संतत धारे सारखा पुष्कळ पाऊस पडत आहे व ग्वालेरीकडे पाऊस नव्हता तो हल्लीं चांगला पडत आहे. बुंदेलखंडांतही पाऊस पडला पण तिकडे आणखीही पावसाची जरूरी आहे. रजपूत संस्थानांत चोहोंकडे पुष्कळ पाऊस पडला. व तिकडे पिकें चांगलीं आहेत.

बंगाल इलाख्यांत सारण जिल्हा खेरीज करून चोहोंकडे पाऊस आहे. पिकें चांगल्या स्थितींत आहेत. पाटणा जिल्ह्यांत पावसाची अपेक्षा आहे, ढाका आणि फरीदपुर जिल्ह्यांत बरेच पूर आले तेणेंकरून पिकाचें कांहीं नुकसान झालें.

असाम प्रांतांत पाऊस चांगला आहे. ब्रह्मदेशांत चांगला पाऊस पडला पण प्रोम व थातको जिल्ह्यांत कमी आहे व तिकडे लवकर पाऊस पडण्याची जरूरी आहे. एनासरिम प्रांतांत पावसाची झड लागली पाहिजे ती अजून लागली नाहीं. वायव्य प्रांत आणि अयोध्या यांत चोहोंकडे उत्तम पाऊस पडला. आणि पिकें सर्वत्र चांगलीं आलीं आहेत. पंजाब प्रांतांत मोठ्या झपाट्याचा पाऊस पडला व डोंगराचे पायथ्याशी जे जिल्हे आहेत तेथें बरेच पूर आले. पेशावराकडे शेतीचा धजाव बराच आहे, पण पुरानें कांहीं ठिकाणीं नुकसान झालें आहे.

या प्रमाणें पिकापाण्याची प्रस्तुत स्थिति आहे. व त्यावरून आपणास "दुष्काळ गेला" असें मानण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं, कारण अगदी पाऊस नाहीं असा कोठेंच बोभाट नाहीं, व दोन वर्षें दुष्काळानें गांजलेल्या मुलखांत तर पावसाचीलई लूट झाली व त्याचा पिकास उपयोग झाला ही आनंदाची व ईश्वराच्या कृपेची गोष्ट आहे.

---

## पोळा.

हा शब्द व सण जरी सार्वदेशीय नाहीं तरी वऱ्हाड व नागपुर प्रांत या भागांत पोळ्याचें बरेंच महात्म्य आहे. हा सण श्रावण वद्य ३० ह्मणजे पिठोरीच्या दिवशीं करितात. व तो मुख्यत्वेंकरून शेतकरी व ईतर बैल बाळगणारे लोक मोठ्या आनंदानें करितात. श्रावण वद्य १४ रोजीं संध्याकाळीं बैल बाळगणारे सर्व लोक आपआपले घरीं उत्तम ठिकाणीं बैल उभे करितात व त्यांजवळ दिवे लावून त्यांस "उद्या जेवायाला या" असें ह्मणून आमंत्रण देतात त्यांस कुरवाळतात, भेटतात व त्यांचे खांदे भार ओढून ओढून सुजतात व आखडतात ते मोठ्या कनवाळूपणानें पळसाचे पानास तेल तूप लावून चोळतात व या विधीस ते लोक खांदेमळणी ह्मणतात. नंतर त्यांस यथेच्छ दाणा चारा घालतात. दुसरे दिवशीं ह्मणजे अमावास्येस सकाळीं चारीत चारीत नदीवर नेतात (कोठें कोठें नदी गावापासून ४।२ कोसही लांब असते) व त्यांस खोलपाण्यांत पोहवून दर एक बैल खराऱ्यानें घासू घासू धुवून सफा करितात व बारावर एक दोन वाजतां घरीं घेऊन येतात, व नंतर त्यांस सजविण्याचे खटपटींत लागतात. शिंगें हिंगुळानें लाल करितात व कोणी वर लाल पांढरें व पिवळें बेगडही लावितात. त्यांवर चित्र विचित्र बनातीच्या वगैरे झुला घालतात. निळ्या सुताचे दोर, मोहरके, सर, हीं नवीं करितात. पायांत तोडे पैंजण घालतात, गळ्यांत घागऱ्या, घोळ, घागर, घंटे इत्यादि बांधितात, व मस्तकावर उंच मोलाचा कलाबतूचा चांद तयार करून फुलें व केवड्याचीं पानें बांधितात व सर्व अंगावर चित्र विचित्र ठिपके देतात. इतकी तयारी गावांत होत आहे तोंच गावचे महार अंब्याचीं तोरणें दर घरीं बांधून थोडा थोडा दरवाज्याशीं मुरूम टाकितात आह्माला वाटतें हा मुरूम टाकण्याचा आतां केवळ वृद्धाचार राहिला आहे. वाकीं पूर्वीं दारा समोरची व बैलाची जागा चिखल होऊन खराब झालेली मुरूम टाकून दुरुस्त करण्याचें काम या महार लोकांकडेसच असावें व अशा प्रकारच्या चाकरी करितांच त्यांना कापणी मळणीच्या वेळीं पायली दोन पायल्या धान्य देण्याचा शिरस्ता आहे. अस्तु. गावा बाहेर गोठाणीं एक मोठें लांब तोरण बांधून ठेवितात व ५।६ वाजतां गावांतून सर्व बैल त्या तोरणा खालीं नेऊन उभे करितात. तेथें पाटील व मानकरी लोकांचे बैल आल्यावर मोठ्या समारंभानें पूजा करितात नंतर मशाली टेंभे पाजळून चकचकाट करितात व आपआपल्या बैला समोर तासे, मरफे व ढोल दमामे हीं वाद्यें सुरू करून हातनळे भुयनळे व चंद्रजोती उडवीत मोठ्या थाटानें गांवांत परत येतात. प्रथम देवदर्शन करून घरोघर जातात. कढी, ठोंबरा त्यांस खावू घालून स्वच्छ पाणी पाजतात व याचप्रमाणें आपल्या इष्ट मित्रांच्या घरीं पांच चार ठिकाणीं बैलास वाजत गाजत नेऊन जेवूं घालितात. बैल बाळगणारे धनी त्यांची सेवा चाकरी करणाऱ्या नौकर लोकांस व गाडीवान लोकांस जेवावयास बोलावितात व विडे वगैरे देऊन शिरपाव ह्मणून पागोटींही बांधितात याप्रमाणें पोळ्याचा सण आहे.

---

**रेलवेवरील नोकर**— बडोदा रेलवेच्या कामें करणाऱ्या सुतार, लोहार वगैरे लोकांचा मोठा कट होऊन ते कामें कर-

ण्याचें सोडून स्वस्थ घरीं बसले आहेत. या कंपनीकडे हे नोकर इतके दिवस दर रोज सात तास काम करीत असत. व थोड्या दिवसांमागें कर्वतकाम करणाऱ्या लोकांस तुह्मी आठ तास काम केलें पाहिजे असा हुकूम झाला त्यावरून बराच गवगवा होऊन त्या लोकांच्या कंपनीवर फिर्यादीही झाल्या होत्या. इतक्यांत असा बूट निघाला कीं, कंपनीच्या सर्व कामावरील लोकांपासून बारमाही आठ तास काम घेण्याचा ठराव होणार आहे. ही गूल ऐकतांच गेल्या सोमवारचे मागील सोमवारीं सुतार, लोहार, फिटर, हमाल, रंगविणार वगैरे सुमार ४०० लोक कामावर न येतां एकदम घरीं बसून राहिले. हें पाहून लोकोमोटीव सुपरिंटेंडेंट यांनीं ते ते कारखाने बंद करून दरवाजावर नोटिसा लाविल्या कीं कारखान्यांतील सर्व लोकांस बरतर्फ केलें आहे. या लोकांत सुमार ९० युरोपियन व युरेशियन नोकर आहेत. व कित्येक फार जुने नोकर आहेत त्यांस सुपरिंटेंडेंटच्या जुलमी हुकुमाविषयीं फार वाईट वाटत आहे. पुढें काय होतें पहावें.

**कैदींची सुटका**— हिंदुस्थान सरकारचे आफिशिएटिंग सेक्रेटरी मि० बर्नार्ड साहेब यांच्या सहीचें सरक्युलर प्रसिद्ध झालें आहे तें असें:—

चालू स्थितीवरून असें स्पष्ट दिसत आहे कीं दक्षिण हिंदुस्थानांत गेलीं दोन वर्षें ज्या दुष्काळानें फार हलाखी केली व ज्याचा संसर्ग दुसरे देशासही लागला, तो आतां या पावसाळ्यांत अगदी संपला. आणि याप्रमाणें घडून येईल तर सरकारचे हुकुमावरून अशी सूचना करण्यांत येते कीं धान्याच्या किमती चढल्यामुळें पोटाचे हाल होऊन कित्येक लोकांनीं गुन्हे केले व त्यांस त्याबद्दल कैदेच्या शिक्षा झाल्या असे लोक तुरुंगांतून पुष्कळ भरले आहेत तर धान्याच्या किमती पूर्वीप्रमाणें झाल्या ह्मणजे इलाख्याचे सरकारानें तशा कैदीवर दया करून त्यांच्या शिक्षा रद्द कराव्या व त्यांस सोडून धंद्या उद्योगास लागूं द्यावें. असें इलाख्याचे सरकारानें केल्यास त्यास सन १८७२ चा आक्ट १० कलम ३२२ प्रमाणें अधिकार आहे. मात्र असें करण्यापूर्वीं त्या त्या ठिकाणचे माजिस्ट्रेट अथवा जडज ज्यांकडून शिक्षेचे ठराव झालेले आहेत त्यांची संमती घ्यावी.

हा ठराव हिंदुस्थान सरकारानें फार चांगला केला व त्याचा अंमल सत्वर व्हावा असें आह्मी इच्छितों.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत पाऊस पुष्कळ पडला नाहीं, तरी त्यानें चांगली उघाडी दिली नाहीं. रोज बुरबुर व घाणेरी हवा रहात गेली त्यामुळें पिकास कांहीं उपयोग न होतां अपायाकडेच त्यांचा झोक जात चालला आहे. शेतकरी लोकांस डौरणी धरण्यास अजून फाव मिळत नाहीं ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे.

रया० बुलक साहेब डिपुटी कमिशनर उमरावतीस गेले होते ते गुरुवारीं परत आले.

मि० डनलप साहेब कांहीं सरकारी कामाचे संबंधानें अकोल्यास आले होते ते गुरुवारीं परत गेले.

आगरचे पाटलावर विषप्रयोगाचा आरोप आला होता त्यांतून तो दोषनिर्मुक्त झाला असें कळतें.

उमरावतीच्या प्रमोदसिंधु पत्राचे एडिटर रा. रा. यशवंतराव गोविंद सातारकर औषधोपाया करितां पुण्याकडे गेले होते ते या आठवड्यांत एथें येऊन उमरावतीस गेले. त्यांची प्रकृती दुरुस्त असून हातास थोडथोडा गुण येत चालला आहे.

एथील मिडलक्लास स्कुलाची वार्षिक परिक्षा पुरी होऊन बुधवारीं बक्षिसें वाटलीं. सालमजकुरीं या शाळेची हुशारी हमेशाप्रमाणें दिसून आली नाहीं.

एथील मि० बरजोरजी पारशी यांनीं आपली कांहीं मालमिळकत दुसरे एका पारशास गहाण दिली असून तिच्यांतील कांहीं भाग तिसऱ्या पारशास विकला, याबद्दल गहाणदारानें बाकीच्या दोन इसमांवर मि० हेर साहेबा पुढें ४७१९ रुपयांचा दिवाणींत दावा केला होता. या मुकदम्यांत तिघा पक्षकाराकडू एथील तीन च्यार नामांकित वकील असून मुंबईहून मि० नसरवानजी माणकजी कामा नावाचे पारशी ब्यारिस्टरही वादीनें आणिले होते परंतु वादीस यश मिळालें नाहीं. पक्षकारा बरोबर केलि नव्हते. दस्तऐवजाला स्टांप पुरा नव्हता. फिर्याद अर्जीला स्टांप पुरा नव्हता. कांहीं मिळकत कोर्टाचे हद्दी बाहेर होती. कांहीं मिळकत दाव्यांत दाखल केली नव्हती इत्यादि प्रकार सिद्ध होऊन वादीचा दावा रद्द झाला व प्रतीवादीचा खर्च वादीनें द्यावा असा कोर्टानें ठराव केला.

दोन तीन आठवड्यांत महामारीचें अदर्शन झालें होतें पण हवा घाणेरी झाल्यानें गुरुवारीं व शुक्रवारीं गावांत औषधाच्या गोळ्या नेण्याची बरीच चळवळ दिसून आली व आजाराचें. पुनर्दर्शन झालें असें कित्येक लोकांचे तोंडून आह्मी ऐकिलें. हल्लीं थंडीच्या व मोडशीच्याही आजारानें मनुष्यास साधारण जुलाब व वांती होतात पण त्यास थोड्या औषधानें गुण येतो सबब भिण्याचें कारण नाहीं असें आह्मांस वाटतें. कालपासून ह्मणण्यासारखा बोभाटा ऐकिला नाहीं.

हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटावरून कळतें कीं, सर्जन मेजर सी. टी. ईटस यानीं वऱ्हाडांतील आफिशियेटिंग स्यानीटरी कमिशनर, डिस्पेन्सऱ्यावरील इन्स्पेक्टर जनरल, आणि व्याक्सिनेशनचे सुपरिंटेंडेंट हीं कामें करण्याची आपली इच्छा नाहीं असें कळविल्यावरून त्यांस पुन्हा लष्करी खात्याकडे नेमिलें व सर्जन मेजर जेला एम डी. बंगलोरच्या सेंट्रल जेलवरील आफिशिएटिंग सुपरिंटेंडेंट यांस वऱ्हाडांत आफिशिएटिंग स्यानिटरी कमिशनर व गैरेच्या हुद्यावर नेमिलें.

रेसिडेंट साहेबाची जाहिरात नंबर ८६ तारीख १२ आगष्ट सन १८७८ इ.— सन १८७७ चा आक्ट १० कलम ३७ बरहुकुम वऱ्हाडांतील दिवाणी कोर्टांतून मंजूर केलेले मुखत्यार कोणास समजावें कीं, जे हजर रहातील, अर्ज करितील व ३६ वें कलमांतील कामें करितिल. त्याविषयीं नियम केले आहेत ते येणें प्रमाणें:—

१ कोर्टाच्या हद्दींत रहाणाऱ्या पक्षकार लोकां करितां.

( अ ) नातेवाईक, कायमचा नौकर, अथवा विशेष मुखत्यारमाना ज्यापाशीं आहे तो, हजर रहाणें, अर्ज करणें अथवा तशा प्रकारचीं दुसरीं कृत्यें करणें यास योग्य आहे असे कोर्टास वाटेल तर कबूल करावा.

२ कोर्टाच्या हद्दी बाहेर रहाणाऱ्या पक्षकारा करितां,

( अ ) सदरीं ( अ ) यांत सांगितलेले लोक.

( ब ) साधारण मुखत्यारनामा ज्यापाशीं सदरील प्रकारची कृत्यें करण्यासाठीं असेल ते लोक.

[ क ] पक्षकाराकारितां अथवा पक्षकाराच्या नावानें व्यापार धंदा करणारे लोक. मात्र दुसरा कोणी मनुष्य मुद्दाम अधिकार देऊन हजर रहाण्यास, अर्ज करण्यास अथवा तशीं कृत्यें करण्यास नेमला नसेल तर

रेसिडेंट साहेबांची जाहिरात. नंबर ८८ तारीख १९ आगष्ट सन १८७८ इ०— दिवाणी काम चालविण्याविषयींचा सन १८७७चा कायदा १० कलम ३३६ याचे आधारें रेसिडेंट साहेब ठराव करितात तो:— हुकुमनाम्याचे बजावणींत पैशाकरितां फैसल्यांतील रिणकोस जेव्हां कैद करून कोर्टापुढें आणिलें असेल तेव्हां सदर कायद्याचे २०वे बाबिप्रमाणें आपल्यास नादार ठरवून घेण्याचा अर्ज दे असें कोर्टानें त्यास सांगावें. व त्याप्रमाणे त्यानें अर्ज केला व त्यांत गैरइमानाचें कांहीं काम केलें नाहीं व आपली सर्व माल मिळकत कोर्टानें स्वाधीन करून घेण्याकरितां नेमलेल्या मनुष्याच्या तो स्वाधीन करीत आहे असें असेल तर त्यास सोडून दिला जाईल.

रेसिडेंट साहेबांनी जाहिरात नंबर ८९ ता. १२ आगष्ट सन १८७८ इ.— दिवाणी काम चालविण्याचा कायदा सन १८७७ चा १० कलम ३३८ बरहुकूम फैसल्यांतील रिणकोचे पोटगीबद्दल द्यावयाचे दरमहाचे नेमणुकीचे दर रेसिडेंट साहेबांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविले आहेत.

वर्ग १ मध्यम व उंच पदवीचे युरोपियन व युरेशियन आणि उंच पदवीचे नेटिव यांस २२ रुपये ८ आणे.

वर्ग २ इतर युरोपियन व युरेशियन आणि साधारण संभावित नेटिव ह्मणजे माजि परगणा आफिसर, बऱ्याच प्रकारचे उदमी व्यापारी यांस ११ रुपये ४ आणे.

वर्ग ३ वर सांगितल्याहून खालच्या प्रतीचे नेटिव लोक पण ते हलके प्रतीचे माजि परगणा आफिसर, गावचे कामदार, व सामान्य व्यापारी यांस ७ रुपये ८ आणे.

वर्ग ४ सदरील प्रकाराशिवाय इतर सर्व नेटिव लोकांस ३ रुपये १२ आणे.

हे दर परमावधि प्रमाणाचे आहेत आणि कोणी आजारी असला, किंवा कांहीं विशेष कारण असलें तर हे दर दुपटीहून अधिक नाहींत इतकें वाढविण्याचा अधिकार आहे.

**देऊळघाट**—[ मित्राकडून ] दुःखाची गोष्ट कीं महामारीनें या गावांत आक्रांत करून एक महिन्यांत १६० मनुष्यें यमसदनास नेलीं. तरी उपद्रवाला अजून कांहीं शम नाहीं, गावांत घाण व कचऱ्याचे ढीग अतिशय आहेत. व रस्त्यावरून लोक शौच्यास बसतात त्याचा कांहींच बंदोबस्त नाहीं सबब डिपुटी कमिशनर साहेब इकडे लक्ष्य देतील तर बरें होईल. एथें म्युनिसिप्यालिटी आहे ह्मणतात ती कागदी कागदीं असेल. माणसा माणसी आहे असें दिसत नाहीं. कारण अशाही कठीण प्रसंगीं तिला कांहींच चळवळ नाहीं तेव्हां तिला मनुष्यांत कशी गणावी?

मनुष्यें फार मरूं लागल्यानें सर्पण महाग झालें. रुपयास शंभर गोवऱ्याही मिळत नाहींत. मग मोळ्या खरेदी करून प्रेतसंस्कार करावा लागतो. त्यांत पावसानें तर धूम मांडली आहे. लोक ह्मणतात कीं इतका पाऊस अलीकडे कधीं झाला नव्हता. रात्रंदिवस संतत धार आहे., नदीचा पुर खळत नाहीं. शेतांतील तण निघत नाहीं. व अतिवृष्टीनें पिकें पिवळीं पडून खराब झालीं.

प्रथमतः तर महामारीला औषध एथें मुळींच कांहीं नव्हतें. गावचे अधिकाऱ्यांनाही रयतेची कांहीं गरज आहे असें दिसून येईना, त्यामुळें मरणारानें खुशाल मरावें व जगणारानें जगल्यास जगावें असा प्रकार चालला होता. पुढें सरकारास दया येऊन त्यानीं एक मुसलमान डाक्टर पाठविला त्यानें ४।५ दिवस गावांत हिंडून बहुत लोकांस औषधें दिलीं व तेणेंकरून कित्येकास गुणही आला. परंतु दुर्दैवाची गोष्ट कीं तो डाक्टरच पुढें आजारी झाला व गाडी करून एथून चालता झाला. पाटील पांडे यांचे गावाकडे फार दुर्लक्ष्य आहे. एका फकीरीणीचे प्रेत एक दिवस कुजत पडलें होतें पण तें लवकर उठविण्याची कोणास दया आली नाहीं. सरकारांत नावाजलेले असे एक दोन गृहस्थ एथें आहेत पण त्यांनीं देखील या महामारीच्या कठीण प्रसंगांत घराबाहेर पडून लोकांचा कांहीं उपयोग केला नाहीं. याप्रमाणे या गावची स्थिति आहे.

## वर्तमानसार.

मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी मि० नरसी केशवजी हे ऊर्णावस्त्रांची गिरणी घालणार आहेत. लोकरीची गिरणी हिंदुस्थानांत पहिली हीच होणार.

माशा ह्या हवेंतील बारीक जीव जंतु खातात व तेणेकरून त्यांतील रोगांचे बीं बरेंच नाहींसें होतें. यावरून ज्या घरांतील माशा रोड त्यांतील हवा स्वच्छ व ज्या घरांतील माशा पुष्ट त्यांतील हवा खराब असें ह्मणतात.

धारवाडाहून मुरम गांव ( गोवा ) पर्यंत रेल्वे तयार करण्याविषयीं पोर्तुगीज सरकारानें स्टेट सेक्रेटरीची मंजुरी मिळविली असें ह्मणतात, व त्याविषयीं भांडवल जमविण्याचा मेजर क्यांबेल ह्मणून गृहस्थ ह्मपाल्यानें उद्योग करीत आहेत; परंतु त्याचा परिणाम या रेल्वेची सवत जी कारवाड रेल्वे व जिचा मार्ग सर्वस्वी ब्रिटिश मुलखांतून आहे तिची त्वरेनें पूर्तता करण्याकडे होईलसें ह्मणतात. व गोव्याचा रेल्वेपेक्षां कारवाडची ही इंग्रजी अमलांतून जाणारी असल्यामुळें ना. सर रि. टेंपल यांनीं हिची शिफारस केली आहे.

वायव्य प्रांत व अयोध्या यांत सरकारच्या सूचनेवरून शेतकरी लोकांस बिनव्याजी पैसा, बैल, आउतें व बियाणें विकत घेण्याकरितां हिंदुस्थान सरकारानें त्या सरकारास ४ लक्ष रुपये देण्यास मंजुरी दिली.

जेवणें अवश्य आहे काय?— मि. जी. एफ. ट्रेन यांनीं या बाबतींत आपणा स्वतांवर प्रयोग करून पाहिले त्यांत त्यांनीं सहा दिवस कांहीं खाल्लें नाहीं व त्यावरून त्यांस वाटतें कीं, याहूनही आपण पुष्कळ दिवस अन्नावांचून काढूं. या प्रयोगापासून त्यांस तीन गोष्टी माहीत झाल्या त्या अशा कीं, क्षुधेपासून असह्य यातना होतात ह्मणून जें ह्मणतात तें झूट आहे. दुसरें उपासानें माझी बुद्धि वाढली, व तिसरें ज्यानें ६ दिवस उपास केले त्यास नंतर अधाशाप्राणें भूक लागत नाहीं. एकादशी, प्रदोष, शिवरात्र, यांचाही हाच हेतु नसेलना ! !

आरोग्य:— शरीरास घाम येणें हें उत्तम हवा घेण्याप्रमाणेंच अवश्य आहे. आपल्या सर्व शरीरास जर कोणी आर्द्रता प्रतिबंधक एकादें उटणें लावलें तर तो ६ तासांवर वांचणार नाहीं. एका बाईनें समारंभाच्या दिवशीं आपल्या मुलाच्या सर्व आंगाला रोगण लावून सोनेरी वर्ख चिकटविले; परंतु तें मूल त्यामुळें थोड्याच तासांत मेलें. यांत नवल नाहीं. कारण मनुष्यांच्या आंगाच्या रंध्रांतून विशेषत: तारुण्याच्या स्थितींत २४ तासांत १ पइंट आर्द्रता बाहेर पडत असते व शिवाय त्याच रंध्रांनीं क्यार्बोनिक आसीड ह्मणून एक विषारी वायु निघत असतो. सबब वारंवार धुऊन साफ ठेवणें मोठें महत्वाचें आहे व याचकरितां आमचे पूर्वीचे आर्य लोक त्रिकाळ स्नान करीत असत कीं काय कोण जाणे. इ. प्र.

## कलेक्टराला मारल्याच्या खटल्याचा निकाल.

धारवाडचे कलेक्टर मि० एलफिन्स्टन यांस कल्लणगौडा नावाच्या एका मनुष्यानें धोंडा मारला व त्याबद्दल त्याजवर खटला झाल्याची जी हकीकत गेल्या बेळगावसमाचार पत्रांत छापली आहे तिजवरून आह्मी मि. एलफिन्स्टन यांची मोठी तारीफ करितो व तो धारवाडचा खटला असतां ज्या कारणासाठीं त्या खटल्याचा इन्साफ धारवाडास आपल्यापुढें न होतां दुसऱ्या ठिकाणीं व्हावा असें धारवाडच्या जडजांनीं हायकोर्टास लिहिलें त्याबद्दल आह्मी धारवाडच्या जडजाचीही तारीफ करितों. आरोपी याजवर कलम ३०७ प्रमाणें खुनाच्या प्रयत्नाचा व कलम ३३२ प्रमाणें दुसरा असे दोन आरोप असून शिवाय कलम ३३३ व ९११ प्रमाणें मिळून एक असे तीन चार्ज होते व त्यांबद्दल धारवाडच्या हुजूर डेपुटी माजिस्त्रेटानीं त्यास रीतीप्रमाणें धारवाडच्या सेशनांत कमीट केला. हा खटला सेशनांत गेल्यावर से. जडज मि. सांडविथ यांणीं "हायकोर्टास लिहिलें कीं एथील लोकांचा आणि माजिस्त्रेट साहेबांचा जो संबंध आहे त्यावरून इकडे विचार चालला असतां न्यायास जशी योग्य मदत मिळावी तशी मिळण्याचा संभव फार कमी आहे या कारणासाठीं या खटल्याची चौकशी दुसरीकडे व्हावी" असें लिहिल्यावरून त्या खटल्याचा इनसाफ बेळगावच्या सेशनांत व्हावा असें हायकोर्टानें ठरविलें व त्याप्रमाणें ता. १९ रोजीं बेळगावास चवकशी होऊन आरोपी यास ३ वर्षें कैद व ५०० रुपये दंड अशी शिक्षा झाली. यांत मि. सांडविथ यांणी खटला दुसरीकडे पाठविण्यासाठीं जें कारण पुढें केलें त्यावरून मि. सांडविथ हे उत्तम प्रकारचे न्यायी व निस्पृह आहेत असें होतें व त्याचप्रमाणें सुरतच्या दंग्याचे खटले आपल्यापुढें न चालतां एखाद्या तिऱ्हाइतापुढें चालावे असें सुरतच्या जडजांनीं हायकोर्टास लिहिलें असतें तर ते ही लोकांच्या मतानें विशेष स्तुतीस पात्र झाले असते. असो. या धारवाडच्या खटल्यांत जडजाचा न्यायीपणा वरील लेखावरून स्पष्ट झाला पण त्या खटल्यांतील फिर्यादी जे धारवाडचे कलेक्टर मि. एलफिन्स्टन यांचा न्यायीपणा पुढेंच आहे व तो फारच तारीफ करण्यासारखा आहे. बेळगावच्या सेशनांत खटला सुरू झाल्यावर फिर्यादी या नात्यानें मि. एलफिन्स्टन यांची जी जबानी झाली तींत त्यांणीं असें सांगितलें कीं "आरोपी याजवर चोरीचा माल ठेवून घेतल्याचा आरोप असल्याची त्याजवर फिर्याद जहाल्यावरून त्या गुन्ह्याची चौकशी करण्याकरितां तो खटला आपण मे. आर्डिंग साहेब डि. डि. माजिस्त्रेट यांजकडे पाठविला. ती हकीकत आरोपि यास समजल्यावरून दुसरे दिवशीं प्रात:काळींच आरोपी माझ्या बंगल्यास आला. तों मी तुरुंगाकडे जाण्याकरितां निघालों तेव्हां मला भेटला व सांगू लागला कीं मजवर फिर्याद जहाली आहे व वारंट निघणार आहे असें ऐकतों तर मी अब्रूदार मनुष्य आहे. मला आपणाकडून व दुसऱ्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांकडून बक्षिसें व शिफारस पत्रें मिळालीं आहेत व या गांवांत माझे अदावतदार पुष्कळ इसम आहेत त्यांत धारवाडचे चावडींत शेट्टी ह्मणून एक इसम बिनपगारानें पोलिस काम पाहत असतो तो माझा अदावतदार आहे या साठीं ते सर्व लोक मिळून मला फार त्रास देतील व माझी अब्रू घेतील यासाठीं मला जामिनावर मोकळा करावा व या खटल्याची चौकशी आपण स्वत: करावी व जामिनावर मोकळा ठेवणें आपणास बरोबर न दिसल्यास आपल्या खासगी बंगल्यांत मला कैदी दाखल ठेवावें परंतु माझी अब्रू घालवूं नये वगैरे सांगितलें. तथापि मी त्याला कांहीं जबाब न देतां तसाच निघून गेलों. परत आल्यावर पहातों तों आरोपि बसलाच आहे. त्याणें पुन: आपली सर्व हकीकत सांगितली तेव्हां मी त्यास सांगितलें कीं रीतीप्रमाणें आर्डिंग साहेब तुझ्या खटल्याची चौकशी करून ठराव करतील. त्यावर अपील केल्यास मी योग्य न्याय देईन असें सांगून आपण चालता जहालों तों मागाहून आरोपीनें कांहीं वाईट शब्द बोलून माझ्या आंगावर एक दगड फेकला तो माझ्या कानास लागून गेला.' हें त्यांचें सांगणें किती सरळ आहे याचा आमच्या वाचकांनींच विचार करावा. त्यांच्या या जबानीवरून मि. एलफिन्स्टन हे फारच सरळ व कोमल अंत:करणाचे असावे असें होत नाहीं काय ? आपणास दुखापत करणाराची खोडकी मोडण्याकरतां जे शेकडो काळे व गोरे लोक कोर्टापुढें येत असतात त्यांत इतके सरळ किती असतात याचा आमच्या वाचकांनीं आपापल्या मनाशींच विचार करावा ह्मणजे इतके सरळ फारच थोडे असतील असें त्यांस स्पष्टपणें कबूल करावें लागेल. त्यांच्या जबानीचा हा वरील भागच सरळपणा दाखवितो इतकेंच नसून शेवटीं त्याची आपली कांहीं अदावत नाहीं असें सांगून "तो त्या दिवशीं फार त्रासांत होता असें मला वाटलें" असेंही त्यांणीं सांगितलें आहे. या शेवटच्या वाक्यावरून मि. एलफिन्स्टन यांची आह्मी तारीफ करतों आणि असले गृहस्थ धारवाड करास कलेक्टर मिळाले हें धारवाडकराचे मोठें भाग्य आहे असें समजतों. बेळगावचे जडज मि. शा यांणी आरोपीवर पहिला चार्ज शाबीत करून त्यास काळ्या पाण्यावर पाठविण्याचा गोरा न्याय केला नाहीं हा त्यांणीं मोठा न्यायीपणा केला, पण फिर्यादीच्या जबानीवरून विचार करून पाहिल्यास आरोपीस हल्लींपेक्षां जास्त शिक्षा करतां आली असती असें कोणासही वाटणार नाहीं, इतकेंच नव्हे तर ही झालेली शिक्षाच जास्त आहे असें ह्मणावें लागतें. असो, एकंदरीनें या खटल्याचा निकाल चांगला झाला असें आह्मी ह्मणतों.

अ. द.

## नोटिसा.

बापु वल्लद चिधाजी दहिभात रहाणार एदलापुर प्रगणे आढगाव जिल्हा अकोला यास खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुमची व आमची फार दिवसापासून अदावत असल्याबद्दल प्रसिद्ध आहे. दिवाणी कोर्टांत तंटे चालू आहेत असें असतां तुह्मी मजला बुडविण्या करितां माझे नावचें खरीद खत अथवा गाहणाचा अथवा दुसरे प्रकारचा करून दावा करणार असे चौघा लोकांसमक्ष बोलले त्याचे जबानीवरून मजला समजलें आहे याजकरितां असें कळवितों कीं, तुमचे कडे माझे घेणें असून तुमचे देणें मी लागत नाहीं. असें असतां तुह्मी विनाकारण माझे नावचा दस्तऐवज खरीदीचा अथवा गाहाणाचा किंवा दुसरे प्रकारचा केला असल्यास अथवा कराल तर तो रद्द असे. मी तुह्मास कधीही दस्तऐवज लिहून दिला नाहीं. व पुढेंही देणार नाहीं असें समजावें. जर तुह्मी वर लिहिल्या पैकीं कोणतेही प्रकारचा खोटा दस्तऐवज केला असल्यास त्याची प्रसिद्धी करावी व मजला कळवावें. ह्मणजे तावडतोब न्यायाचें कोर्टांतून इनसाफ मिळवीन कळावें तारीख २९।८।७८ इसवी.

[ सही ] चंद्रभान वल्लद भोना
जी रहाणार एदलापुर.

नोटिस.

मेहेरबान स्टेशनमास्तर साहेब शिगांव जी. आय. पी. रेलवे यांसी खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, जवारी भरलेलीं पोतीं २९ माल मण ६३८१० त्रेसष्ट मण दहा शेर तारीख ३ माहे जून सन १८७७ इसवी रोजी शिगांव स्टेशनाहून बल्लारीस पोंचविण्याकरितां आपले स्वाधीन केलीं त्याची रसीद तुमचे सहीची आमचे पाशीं आहे असें असतां तो माल तुह्मी बल्लारी एथें शेट बनसीलाल अबीर चंद यांजला मुळींच पोंचता केला नाहीं. त्यामुळें आमचें फार नुकसान झालें. तुह्मांस एक दोन वेळां लिहिलें असतां तुह्मी मुळींच कांहीं तजवीज लागू दिली नाहीं. यावरून तुह्मास ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर सदर्हू जवारीची किंमत दर मणी रुपये ७८ साडेसात प्रमाणें रुपये ४७५८६ मालाची किंमत चारशें पंच्याहत्तर सहा आणे व सदर्हूस लागलेल्या २६ पोत्यांची किंमत ९८६ मिळून ४८४ ८१२ च्यारशें चवऱ्यांशीं रुपये बाराआणे यांत तुमचा रेलवे चार्ज ८५ रुपये वजा जातां बाकी रकम रुपये ३९९८१२ व त्याचें आज मिती पर्यंतचें व्याज हे तुह्मी आह्मास रोख दिले पाहिजेत आणि त्याप्रमाणें ही नोटीस पोंचल्या पासून ८ दिवसांत सदर्हू रुपये तुह्मी आह्मास दिले नाहींत तर तुह्मावर कायदेशीर रीतीनें दिवाणी कोर्टांत फिर्याद करूं व खर्चा सुद्धां रकम भरून घेऊं. या नोटिशीचाही खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख २६ माहे आगष्ट सन १८७८ इसवी.

( सही ) लछिराम चिमणराव, धनी सुकराम खुशालचंद. दुकान शिगाव दस्तुर रामनारायण.

हे पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० ८ माहे सप्तंबर सन १८७८ इसवी. | अंक ३६


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकाकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ०६ |
| महामारीवरील गोळी | ०१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |

सदर्हू किमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

## जाहिरात.
## कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें " सिद्धांतकौमुदी " संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टिपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तिपूर्णभाग इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरणें चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशे शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगला, सांचा मोठा, छपणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया. टपालखर्च एक आणा. पण एक वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाठविल्यास टपाल खर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस 'पोष्टपेड' पत्रीं कळवावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८ } रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कौमुदीमहोत्साह कर्ते.

## नोटिस.
## ५०० रुपये बक्षीस.

इंग्लिश भाषेंत आरोग्यरक्षणसंबंधी पुस्तक कोणी नवीन रचील व तें हिंदुस्थान सरकारास पास होईल तर त्याए ५०० रुपये बक्षिस देण्यांत येईल. या पुस्तकाची छापील पृष्ठें २४ हून अधिक होऊं नयेत; व तें पुस्तक सरकारच्या मालकीचें होईल आणि सरकार त्याची वेगवेगळ्या भाषेंत भाषांतरें करील.

हुकुमावरून
( Signed ) G. H. Trevor
वऱ्हाडा करितां सेक्रेटरी.

## जाहिरात.
## दोनशें रुपयांचें बक्षीस.
### सर्व वैद्य लोकांकरितां.

वऱ्हाड प्रांतांत चिखलीं तालुक्यांत चांडोळ या गांवीं सुमारें तीन महिन्यापूर्वीं वे० रा० रंगाचार्य नामें एक कुलीन गृहस्थाच्या दोघा मुलांस देवी येऊन त्यांचे डोळे गेले आहेत. प्रत्येकाच्या डोळ्यांत हरबऱ्या येवढे वडस झाले आहेत. मुलांस अंधार उजेड समजतो. पुष्कळ औषधोपचार केले परंतु बरे होत नाहींत, तर जो कोणी सुज्ञ गृहस्थ हे डोळे बरे करून देईल त्यास या गृहस्थानें २०० रुपये बक्षिस देण्यासाठीं ह्मणून आमचे जवळ अमानत ठेविले आहेत, इकडे सर्व अनुभविक वैद्यांनीं लक्ष्य द्यावें. त्यांस एथपर्यंत येण्यास जो खर्च लागेल तो देण्यांत येईल. सोय असल्यास मुलें वैद्याचे घरीं सुद्धा येतील. परंतु इतकी एक शर्त आहे कीं, ज्यांच्या पाशीं अशा प्रकारचे डोळे बरे केल्याबद्दलेच एक दोन ठिकाणचे दाखले असतील त्यांचीच योजना केली जाईल. ज्यांची उमेद असेल त्यांणी खालीं सह्या करणारांकडे पत्रें पाठवावीं. पत्रें नाटपेट असलीं तरी चिंता नाहीं.

कृपाकरून सर्व वर्तमानपत्रकर्ते यांणीं लोकहितबुद्धीनें निदान तीन वेळा तरी ही जाहिरात आपल्या पत्रांत द्यावी. इतकी आमची त्यांस विनंती आहे.

मुक्काम चांडोळ तारीख ५ माहे आगष्ट १८७८ } अमृतराव विनायक राव देशमुख चांडोळ जिल्हा बुलढाणा.

अनंत परशराम खरे
स्कूल मास्तर
चिखली.

## जाहिरात.

वऱ्हाडाकरितां नवीन दिवाणी कायद्यांत वहिवाटीच्या संबंधानें आ. रेसिडेंट साहेबांनीं केलेल्या नियमाचें भाषांतर.

नवीन दिवाणी कायद्यांतील ज्या कलमांत कांहीं वहिवाटीचे वगैरे संबंधानें स्थानिक सरकारानें नियम करावे ह्मणून हुकूम दिला आहे, त्या संबंधानें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं नियम करून तारीख १५ माहे आगष्ट सन १८७८च्या "रेसिडेन्सी आर्डर" मध्यें छपून प्रसिद्ध केले आहेत. त्याचप्रमाणें नवीन कायद्यांत वऱ्हाडच्या संबंधानें झालेला फेरफार तारीख १८ माहे जुलै सन १८७८ च्या "रेसिडेन्सी आर्डर" मध्यें आला आहे ह्या सर्वांचे भाषांतर करून आह्मी छापण्यास सुरुवात केली आहे. वकील, मुकत्यार व इतर दुसऱ्या लोकांस ह्या पासून फार उपयोग होणार आहे. याचीं सुमारें पृष्ठें २० होतील याची किंमत ८ आणे दर प्रतीस व बाहेरे गावचे लोकांस या खेरीज टपाल हशील पडेल. प्रती सध्या थोड्या काढल्या आहेत ह्मणून ज्यास घेणें असेल त्यानीं लवकर घ्याव्या. प्रती आठ दिवसांत तयार होतील. उमरावती ता. २ सप्तंबर १८७८ इसवी.

म्यानेजर प्र. सिं.

## नोटिस.

नरसु वल्लद गोविंदा कसुरकार रहाणार हिवरखेड ता. अकोट यास सिता मर्द नरसु कसूरकार रहाणार उगवे ता. अकोलें इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं मी तुझी लग्नाची बायको असतां सुमार साडे पांच वर्षे झाली तूं मला पोटास न देतां घराबाहेर हाकून दिलेस. व त्या पूर्वींही तूं मला चांगलें नांदवित नव्हतास व घडोती तर तूं कधींच घेतली नाहींस. माझा बाप मला लुगडीं घेई ती देखील तूं सोडून घेत असस त्यावरून तुला ही नोटिस दिली आहे व तुझे पोटची मला एक मुलगी झाली आहे तिचे लग्नाला १०० रुपये खर्च झाला तो तूं दिला नाहीं व अन्न वस्त्राबद्दल आजपर्यंत ३०० रुपये कर्ज खाल्ले ते मिळून ४०० च्यारशें रुपये नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत द्यावे. व पुढें मला चांगले रीतीनें वागवावयाचें नसेल तर सोडचिठ्ठी द्यावी. याप्रमाणें तूं न करशील तर मी गंधर्वाचा दुसरा घरठाव करण्याबद्दल व पैशाबद्दल कोर्टांत तुजवर फिर्याद करीन व खर्चा सुद्धा भरून घेईन. कळावें तारीख ३ माहे सप्टंबर सन १८७८ इसवी.

[ सही ] सिता मर्द नरसु कसूरकार इचे हातची नांगरी.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. पत्रकर्ते महाराज, अनेक चमत्कार व मोठमोठीं अचाट कार्यें अन्य कृतीवाचून फक्त मंत्रानें करतां यावीं अशा कृत्यास जादू टोणा ह्मणतात, हें आपले सर्व वाचकांस ठाऊक असेलच. "बाबा वाक्यं प्रमाणं" यास अनुसरून वागणारे पुष्कळ लोक जरी डोळे झाकून हें मंत्रसामर्थ्य खरें मानितात तरी अलीकडे इंग्रज सरकारच्या सहवासानें विद्येचे खरें तत्व समजून येऊन बरीच लोकसंख्या यावर भरवसा ठेवीनाशी झाली आहे. जादुगीर ह्मणवणारे लोक संधी फावेल तसतसे नजर भुलीनें व हस्तचापल्यानें आपले मंत्रसामर्थ्याचे प्रयोग करून लोकांसमोर आणतात. व आमच्या मंत्रतंत्राचा हा प्रभाव ह्मणून लोकांत फुशारक्या मारतात.

या विषयाचे खरेखोटेपणाविषयीं गेले महिन्यांत आपले पत्रांतून दोन तीन वेळां मजकूर प्रसिद्ध झाले त्यांत जळगांवास घडलेल्या प्रयोगाची हकीकत तर "मांत्रिक विद्या खरी आहे". अशाविषयीं वाचकांची बालंबाल खात्री करून देणारी होती. कारण तो जळगाव एथील प्रयोग पहाण्यास बरीच सुज्ञ व चिकित्सक मंडळी होती व त्यानीं मोठ्या कसोशीनें परीक्षाही पाहिली पण त्यांत हस्त लाघवाचें ह्मणून कांहींच दिसून आलें नाहीं असें त्याच मजकुरावरून समजून आले व तेणेंकरून आमच्या सारख्या खेड्यापाड्यांतील अज्ञानी व धर्मभोळया लोकांची तर पूर्ण खात्री होऊन गेली कीं मंत्र खरे असावेत. तथापि त्याची पुन्हा प्रचीती पहाण्यासाठीं आपण शेकडो रुपये खर्चण्यास सिद्ध होऊन खरें तत्व बाहेर पडावें ह्मणून आपला उदार लेख प्रसिद्ध केला तो पाहून मंत्रतंत्रावर भरवसा न ठेवणारे लोकांस बराच दिलासा आला व उमेद येऊं लागली कीं, आतां कांहीं तरी गम्मत दिसेल निदान ऐकावयाला तरी सांपडेल. पण त्यानंतर कोणीच जादुगिरानीं आपली करामत कोठें दाखविल्याविषयीं मजकूर आपले पत्रांतून वाचण्यांत आला नाहीं व पुष्कळ लोकांचीं मनें या विषयाकडे गुंतून राहिलीं आहेत. याकरितां आपण अलीकडील हकीकत काय झाली असेल ती व त्यावरून मंत्रसामर्थ्याविषयीं आपला झालेला निश्चय असा एकंदर मजकूर प्रसिद्ध करून लोकांची संशयनिवृत्ति दूर करावी. अशी सोत्कंठ प्रार्थना आहे.

कांहीं ठिकाणीं जादुगीर लोकांचा दरारा लोकांच्या मनावर कशा प्रकारचा असतो हें माझ्यानें पत्रीं लिहून संपवणा

र नाहीं. कारण जे वृक व्याघ्रास भीत नाहींत, जे लोक राव राजास भीत नाहींत. फार तर कशाला, जे लोक केवळ परमेश्वराचीसुद्धां तो अदृश्य आहे ह्मणून पर्वा करीत नाहींत, ते देखील मंत्रश्रध्घालु लोक जादुगिराचे पुढें विनम्र होऊन मोठ्या अजीजीनें वागतात. कारण मनुष्यास सर्वांपेक्षां जीवाची आशा अधिक असते. व मंत्रसामर्थ्यानें जादूगीर लोक सुदृढ मनुष्यास सुद्धां हालोहाल घायाळ करूं शकतात अशा शेकडो लोकांचे तोंडून गप्पा ऐकावयास सापडतात. आतां त्यांत तथ्यांश जरी असतो अगर नसतो याची पूर्ण खात्री नसते तरी वारंवार त्याच त्या गोष्टी कानीं पडल्यानें तेंच खरें वाटूं लागतें ह्मणून आपण अवश्यमेव या गूढ विषयाचा खुलासा करावा, ह्मणून पुन्हा विनवणी आहे. पत्रविस्तार भयास्तव पुरें करितो. कळावें तारीख ३ माहे सप्तंबर सन १८७८ इसवी.

एक शंकित.

## वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुद्ध १२ शके १८००

## विद्याखात्याचा वार्षिक रिपोर्ट.

सन १८७७।७८ सालचा विद्याखात्याचा रिपोर्ट नुकताच छापला गेला व त्याची एक प्रत रा. ब. नारायण भाई दांडेकर ह्या खात्याचे मुख्याधिकारी यांनीं आह्मास पाठविली ती आदरपूर्वक स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितो.

वऱ्हाडांत हायस्कुलें २, ट्रेनिंग कालेज १, मिडलक्लास स्कुलें ३३, लोअरक्लास स्कुलें ४१२, मुलींच्या शाळा १३, व नाइटक्लास स्कुलें ४ आहेत. या सालांत या शाळांस, विद्यार्थ्यांच्या पगारास व अधिकाऱ्यांच्या पगारास व इतर खर्चास रुपये ३०१९०९ लागले यांत सरकारच्या जमाबंदींतून २३३३३२ रुपये, स्कूलसेसचे ७४१९८ रुपये. व दुसऱ्या फंडांतून रुपये ४४१७ मिळाले. फी बद्दल १९६७३ रुपये आले, व खेड्यापाड्यांतून लोकांनीं शाळांनां मदत ह्मणून ४३०१ रुपये दिले असें कळतें.

या रिपोर्टांत वाचकांस कळविण्याजोगी माहिती पुष्कळ आहे ती यथावकाशें आह्मी लिहू. आज आमचा हेतु या रिपोर्टाच्या संबंधानें वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जे उद्गार बाहेर पडले आहेत ते कळवावे व त्यांविषयीं स्वतांचेंही थोडक्यांत मत सांगावें असा आहे सबब आतां तिकडे वळूं.

विद्याविषयीं पराङ्मुख व सुधारणेविषयीं बहुधा कडेलोटांत असलेल्या आमच्या या वऱ्हाड प्रांतांत शाळाखातें सुरू झाल्यादिवसापासून आजपावेतो जे रिपोर्ट झाले आहेत त्यांजवरून उत्तरोत्तर खात्याची ऊर्जितकला दिसून येत आहे. व त्यांत विशेष आनंद देणारी गोष्ट ही आहे कीं हें खातें सर्वोपरी एतद्देशीय विद्वान लोकांचे हातीं असून त्यांची कारकीर्द पूर्वींच्यापेक्षां लोकांच्या व सरकारच्या विशेष संतोषाची आणि विशेष वेतावाताची आतांशी होत चालली आहे.

आमचे रावबहादुर नारायण भाई यांची या प्रांतास नेमणूक झाली तेव्हां लोकांचा जो समज झाला होता तो सर्वथैव खोटा ठरून त्यांनां निष्कलंक यश आजपावेतो मिळत आलें हें पाहून आह्मास फार संतोष वाटतो. रावबहादुर स्वतः परम विद्वान आणि शाळाखात्यांतील पूर्ण अनुभाविक असल्यामुळें त्यांनां या प्रांतांतील हें खातें सुधारणें बिलकूल भानगडीचे वाटलें नाहीं. रावबहादुर नारायणभाई यांच्या एकंदर योग्यतेविषयीं कमिशनर साहेब व रेसिडेंट साहेब असे उभयतांही एकमतानें फार तारिफ करितात व अंतःकरणपूर्वक त्यांनां सहाय देतात हें पाहून आह्मास फार संतोष वाटतो.

मागें असा कांहीं काल दिसत होता कीं तेव्हां शाळाखातें हें अगदीं निराश्रित व टाकाऊ सारखें होतें, परंतु हल्लींचा मनु अगदी बदलून गेला आहे. जशीं इतर कामें जिल्ह्यांतील मोठमोठाले अधिकारी करितात व त्या संबंधानें ते जबाबदार धरले जातात तसेच शाळाखात्याचे संबधानें त्यांनां आतांशीं लक्ष पुरावणें भाग पडलें आहे. हें या खात्याच्या ऊर्जित दशेचें मोठेंच चिन्ह समजलें पाहिजे. वरिष्ठ लक्षपूर्वक सर्व गोष्टी पाहतात असें समजलें ह्मणजे हाताखालील कामगार ते काम मोठ्या हुशारीनें व सावधगिरीनें करतात असा नियम आहे. व तोच प्रकार आह्मास सालमजकुरचे रिपोर्टावरून या खात्याच्या संबधानेंही आढळून येत आहे.

हल्लींचे आमचे कमिशनर, मे. जोन्स साहेब मोठे माहितगार व हुशार असून शाळाखात्याकडेही त्यांचें लक्ष इतर खात्याप्रमाणेंच बारकाईचें आहे व असेंच सर्वकाल असावें अशी आमची इच्छा आहे. कमिशनर साहेबांनीं वऱ्हाडच्या विद्याखात्याच्या खर्चाच्या संबंधानें जी रिमार्क केली आहे ती फार चांगली आहे व खात्याच्या हिताची आहे आहे असें आह्मास वाटतें. खानगी शाळांस जितकें उत्तेजन देववेल तितकें देणें बरें आहे असें त्यांचें मत आहे. कारण खानगी शाळा जितक्या वाढतील तितकी लोकांस विद्येची अभिरुचि अधिक लागली असें समजावयाचें आहे.

डिपुटी इन्स्पेक्टरानीं वर्षांतून अमुक वेळां प्रत्येक शाळा पाहिलीच पाहिजे असें जे पूर्वीं मत होतें तें हल्लींच्या रेसिडेंट साहेबांच्या, कमिशनर साहेबांच्या, आणि डायरेक्टर साहेबांच्या मतावरून बहुतेक चुकीचें ठरून तपासणी एक वेळ चांगली बारकाव्याची झाली असतां ती वारंवार केलेल्या अनेक वरवर तपासणीपेक्षां अधिक चांगली आहे असें आतां स्पष्ट ठरलें. खरोखरच वर्षभर मास्तरानें काय केलें, शाळेंत कमी ज्यास्ती काय झालें. मुलानें एक वर्षांत काय केलें पाहिजे व त्याजवरून पुढें तो कसा होईल वगैरे गोष्टी जर एक वेळ चांगल्या बारकाईनें पाहिल्या जाऊ नयेत तर ती तपासणी काय कामाची? आह्मास बऱ्याच दिवसांपासून या बाबदींत लिहावयाचें होतें परंतु अधिकारी स्वतःच हें पाहू लागले यामुळें आह्मास आतां लिहिण्याची गरज राहिली नाहीं. हल्लींची व्यवस्था आह्मी पसंत करितों. व या व्यवस्थेस अंशतः उत्पादक रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट हे झाले ह्मणून त्यांची तारिफ करितों. नियमाप्रमाणें तपासणी करण्यांत सर्व गोष्टी जशा पहाव्या तशा पहातां येत नाहींत असें त्यांनीं आपल्या रिपोर्टांत ह्मटलें होतें व त्याजवरून नेट रेसिडेंट साहेबापर्यंत त्याचा विचार होऊन एक वेळ परंतु चांगली तपासणी झाली असतां उत्तम, तसें न होतां उथळ तपासण्या कित्येक करण्यात कांहीं अर्थ नाहीं असें ठरलें.

कमिशनर साहेबांनीं ए. इन्स्पेक्टर यांच्या रिपोर्टाचे संबधानें मत देतांनां असें ह्मटलें आहे कीं ते समजतात त्याप्रमाणें ते फक्त मिडलक्लास स्कुलें तपासण्याविषयींचेच जबाबदार आहेत असें नसून लोअर क्लासस्कुलांचे संबधानेंही ते तसेच जबाबदार आहेत. व तींही त्यांनीं तपासणें अवश्य आहे. आमचेंही मत असेंच आहे. आणि इन्स्पेक्टर साहेबांचेंही मत याविरुद्ध असेल असें आह्मास वाटत नाहीं. आपण लोअरक्लास स्कुलें तपासण्याविषयीं जबाबदार नाहीं असें ते मुळींच ह्मणत नाहींत उलटें त्यांनीं रिपोर्टांत लिहिलें आहे कीं "मुख्यत्वें करून मिडल क्लास स्कुलें आपले तपासणीखालीं असल्यामुळें पहाववतील तितकीं तीं पाहण्याचा ह्या वर्षीं आह्मी निश्चय केला व इतकें काम पुरें होईल असी जरी आह्मांस कल्पना नव्हती तरी ती सर्व स्कुलें वर्षअखेरीच्या पूर्वींच तपासलीं गेलीं. ज्या अधिकाऱ्यास वर्षांतून एकवेळ सर्व प्रांतभर फिरण्याची अवश्यकता आहे त्याजकडून अर्थांत लोअरक्लास स्कुलें प्रत्येक वेळीं थोडीशींच तपासलीं जातील आणि ह्मणून आह्मी असा निश्चय केला कीं ज्या शाळा सन १८७६।७७ सालांत आह्मी पाहिल्या नाहींत त्या होतील तितक्या ह्या वेळीं पहाव्या असें इन्स्पेक्टर रा. रा. श्रीराम भिकाजी ह्मणतात. व त्यांनीं ९८ लोअर क्लास स्कुलें व १२ फीमेल स्कुलें आणि ८ इतर प्रकारचीं स्कुलें पाहिलीं" यावरून कनिष्ठप्रतीच्या शाळा तपासण्यास आपण जबाबदार नाहीं असा त्यांच्या मूळ लेखांतूनही अर्थ निघत नाहीं व अशा प्रकारची त्यांची कधींही समजूत नव्हती असें आह्मास ठाऊक आहे. व कमिशनर साहेबांच्या मताप्रमाणेंच त्यांची वहिवाट आहे.

रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान अकोलें जिल्ह्याचे डि. ए. इन्स्पेक्टर यांची डायरेक्टर साहेबांनीं आपल्या रिपोर्टांत तारीफ केली आहे व रेसिडेंट साहेबही विशेषें करून प्रधान यांस वाखाणतात हें आह्मास मोठें अभिनंदनीय वाटत आहे. बजाबा हे वास्तविक हुशार, अनुभविक, लोकप्रिय, आणि पराकाष्ठेचे मेहेनती आहेत. डायरेक्टर साहेब ह्मणातात कीं जी वर्गणी लोकांकडून वसूल व्हावयाची नाहीं ह्मणून इतर डि. ए. इन्स्पेक्टर ह्मणत असत तशी वर्गणी बजाबा यानीं दोन हजार रुपयांवर जमविली. ही गोष्ट त्यांस मोठी भूषणास्पद आहे.

कमिशनर साहेबांनां सर्व डि. ए. इन्स्पेक्टर यांचे काम मानवलें. व त्यानीं त्यांची वाखाणणी केली आहे. डिपुटी कमिशनर व तहशिलदार यांनींही चांगलें लक्ष पुरविलें ह्मणून कमिशनर साहेब ह्मणतात. तथापि तहशिलदार लोकांनीं याहून पुष्कळ अधिक झटलें पाहिजे असें त्यांचें मत आहे. आह्मी ह्मणतों हें अगदी जरूर आहे. इकडेस अशिक्षित लोकांस विद्येची गोडी अद्यापि चांगली लागली नाहीं व ती केवळ मास्तराच्या चांगुलपणानें लागणें नाहीं. लोकांशी ज्यांचें दळणवळण आहे असे अधिकारी लोकांनीं त्यांस उत्तेजन दिल्हें पाहिजे व तें काम तहशिलदार लोकच चांगलें करूं शकतील.

डि. ए. इन्स्पेक्टर यांनीं जिल्ह्यांतील अधिकारी लोक यांच्या कामावर टीका करूं नये ह्मणून कमिशनर साहेब ह्मणतात. असें लहान तोंडानें मोठा घास घेणारे गृहस्थ कोण असतील कळत नाहीं, पण कमिशनर साहेबांनीं त्यांस दाबलें हें बरें केलें असें आह्मी ह्मणतों. कारण जिल्ह्याचे अधिकारी यांचें काम कसें झालें हें लक्ष लावून पहाणारे वरिष्ठ अधिकारी आपल्या प्रांतास आहेतच.

वऱ्हाडांत मुलींच्या शिक्षणाच्या कामीं यश आलें नाहीं हें पाहून खरोखर वाईट वाटतें. ही स्थिति हिंदुस्थानांत बहुतेक सर्वत्र आहे तथापि यत्न चालू आहेत, तसाच इकडेही यत्न चालू रहावा अशी आमची इच्छा आहे. मुलांचे शिक्षणाप्रमाणें मुलींचें शिक्षण एकदम उदयास येण्याचा हा काळ नाहीं ह्मणून तें मुळींच नाहींसें करणें कांहीं बरें नाहीं. मुलींच्या शाळा बिघडल्या ह्मणून त्या काढून टाकण्यापेक्षां सुधारण्याचा यत्न हरतऱ्हेनें प्रथम करावयाचा होता, आमच्या अकोल्यास एकही मुलींची शाळा नसणें ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. म्युनिसिप्यालिटीनें आपला हात आवरला हें बरें केलें नाहीं व डायरेक्टर साहेबांनीं तिची निराळी कांहीं व्यवस्था न करतां बंद केली हेंही आमच्या मतें चांगलें झालें नाहीं.

उमरावती हायस्कूल व अकोलें ट्रेनिंग कालेज यांची माजी व्यवस्थ पकावडून जी अव्यवस्था झाली होती ती हल्लींच्या सुशिक्षित व लोकप्रिय तरुण [illegible] गृहस्थांच्या श्रमानें नाहींशी होऊन दोन्ही विद्यालयें चांगल्या उत्तम स्थितीस पोंचतील असें डायरेक्टर साहेब आपल्या रिपोर्टांत ह्मणतात व कमिशनर साहेब आणि रेसिडेंट साहेबही तसी आशा करतात. आमची पक्की खात्री आहे कीं डायरेक्टर साहेबांचें ह्मणणें व वरिष्ठांच्या आशा सर्वोपरी पूर्ण होण्याचा काळ दोन्ही विद्यालयास आतां फार दूर नाहीं.

डिपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टरांपैकीं रा. रा. वामनराव बाळाजी हे ह्या वर्षीं पार

कवाली झाले हें दुःखप्रद वर्तमान आमचे वाचकांस माहित आहेच. त्यांची हुशारी व लायकी डायरेक्टर साहेबांनीं स्वतः ह्या रिपोर्टांत वर्णन केलीच आहे. त्यांची जागा अद्यापपर्यंत कायमची भरली नाहीं. तथापि हल्लीं काम करीत असलेले गृहस्थ रा. रा. लक्ष्मण गोविंद ऋषि हे त्या कामास लायक आहेत असें त्यांचे वरिष्ठ जाणताहेत व त्यांनांच ती जागा कायमची मिळावी अशी आमची शिफारस आहे.

शाळाखात्याचे कामीं सर्व जिल्ह्याचे डिपुटी कमिशनरांनीं मदत दिली असें कमिशनर साहेब ह्मणतात. आमचे परम मेहेनती व हुशार डिपुटी कमिशनर कपा. बुलक साहेब यांचा रिपोर्ट फार महत्वाचा व उपयोगाचा आहे असें त्यांचें मत आहे. आह्मांस बुलक साहेबांविषयीं जो अनुभव आहे तो याहून निराळा नाहीं. ते सर्व प्रकारच्या कामांत असेंच लक्ष देतात, व अंतःकरणपूर्वक झटतात. त्यांच्या जवळ कामाची निवड ह्मणून मुळींच नाहीं. जें काम आपल्या समोर येईल तें आपण वास्तवीक लक्ष लावून व बुद्धी खर्च करून करावें अशी त्यांनां संवय जडलेली आहे. आह्मी आशा करितों कीं, असेच सर्व जिल्ह्याचे अधिकारी होवोत.

मे. मेकंजी साहेब यांचीही शाळा तपासण्याचे कामीं कमिशनर साहेबांनीं तारीफ केली आहे व यांचा अनुभव आह्मासही आहेच.

शारीरश्रम व कसरत शिकविण्याचे कामींही सरकारचें लक्ष बरें आहे. हल्लींच्या या देशाच्या स्थितीस ह्या शिक्षणाची फार गरज आहे असें आह्मास वाटतें. नुक्तेच पाच चार तरुण विद्वान मुंबई पुण्याकडे मरण पावले. तेव्हां अतिशय श्रमानें एक प्रकारचा रोग त्यांचे शरीरांत खिळला जाऊन त्याच्या योगें ते मरण पावले असें स्पष्ट झालें आहे ह्मणून नवीन विद्यार्थ्यांस शारीरश्रम व कसरत अवश्य असली पाहिजे. हल्लींची प्रजा स्वभावतः अशक्त आहे तेव्हां तिला शरीराची विशेष घटवणूक जरूर पाहिजे.

आह्मी हा रिपोर्ट व त्यासंबंधानें कमिशनर साहेब व रेसिडेंट साहेब यांचीं मतें लक्षपूर्वक वाचून पाहिलीं. त्यांत पुष्कळ गोष्टी महत्वाच्या आहेत परतु आह्मांस वाईट वाटतें कीं, आमच्या लहानशा पत्रांत एके वेळीं त्यांचा समावेश करणें अशक्य आहे ह्मणून मुख्य मुख्य गोष्टी सांगून हा विषय पुरा करितों. व विषय पुरा करण्यापूर्वीं एकवेळ पुन्हा ईश्वराची प्रार्थना करून शाळाखात्यास व त्यांतील अधिकाऱ्यांस वारंवार अधिकाधिक यशप्राप्ती व्हावी असें त्यास मागणें मागतों.

---

**दीर्घायुष्य**— युरोप खंडांत जर्मनी देशांत कर्कन्नात या गावीं फ्रांरेन गोल्डस्मिड नावाचा एक शेतकरी नुकताच मरण पावला. त्याचें वय १४८ वर्षांचें होतें. ब्रनस्विकचा ड्यूक फर्दिनांद याचे हाताखालीं त्यानें नोकरी केली होती व बेथलेमस्तालच्या लढाईच्यांवळींही हा तेथें होता. याला शंभर शंभर वर्षांच्या वयाचे दोन मुलगे आहेत. याशिवाय १६ नातू व ४३ पणतू आहेत व ते सारे वयांत आलेले आहेत.

आमचे देशांत निजाम अली १०४ वर्षांच्या वयाचे होऊन मरण पावले एवढें उदाहरण आधुनिक इतिहासांत आहे. व जर्मनींतील सदहू मनुष्य दीडशाच्या मजलेला आलेला होता आणि जुन्या काळचीं मनुष्यें निरोगी असून अधिक काल वाचत होती तें मनांत आणिलें ह्मणजे पुराणाच्या कालांतील " अव्यायशी सहस्र वर्षें राया दशरथा, चौदा चौकड्या लंकनाथा" याप्रमाणें आयुष्यें होतीं ह्मणून लिहिलें आहे ती सर्वथैव गप्पच नसावी असें कां मानू नये?

---

**नवीन वर्तमानपत्रः**— सोलापुरास कल्पतरु नावाचें वर्तमानपत्र आहे त्या शिवाय सुदर्शन नावाचें दुसरें वर्तमानपत्र दोन आठवड्यापासून तेथें निघूं लागलें आहे. तें बरें आहे. त्याला चांगला आश्रय मिळो व ते दीर्घकाल चालो असें आह्मी इच्छितों.

---

## वऱ्हाड.

मि० कमिशनर साहेब या आठवड्यांत एथें येणार अशी वदंता होती पण आले नाहींत. आतां १६वे तारखेस येणार असें वर्तमान आहे.

कापसाचीं विलायती यंत्रें अकोल्यास मांडण्याचा बेलारीचे मेसर्स हार्वे आणि सभापति यांणीं निश्चय केल्याप्रमाणें त्यांनीं यंत्रें पाठविलीं व तीं एथें येऊन दाखल झालीं. आतां त्यांच्या इमारतीचें काम लवकर सुरू होईल. आणखी आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं अकोटास मेसर्स फ्लेमिंग आणि कंपनी यांचीं यंत्रें आहेत तीं ते एथें आणून मांडणार व त्यांनींही त्याकरितां जागा वगैरे कमिटीस मागितली आहे व ११वे तारखेस या विशेष कामाचे निमित्तानें जनरल कमिटी भरणार आहे असें समजतें.

खामगावास गेल्या गुरुवारच्या मागील गुरुवारीं रात्रीं ओढ्याला मोठा पूर येऊन सुमार ३०० घरें वाहून गेलीं व ९।१० माणसें मेलीं असें समजतें. ओढा लहान असून त्याला अतोनात पाणी रातोरात आल्यानें हा भयंकर परिणाम घडून आला हें पाहून आह्मांस दुःख वाटतें. मि० डनलप साहेब स्माल काज जडज यांणीं नुकसानींत आलेल्या गोरगरीबांस चांगलें सहाय दिलें असें समजतें. ही दुःखांत सुखाची गोष्ट आहे.

डायरेक्टर साहेबांचे आफिसांतील क्लार्क मि० जोसेफ हे कित्येक महिने आजारी होते ते बरे न होतां कालच्या मागील शनिवारीं मरण पावले. हे गृहस्थ आफ्रिकन असून चांगले हुशार व इंग्लिश नाटकें वगैरेचे कामीं बरेच प्रवीण होते त्यामुळें त्यांचें मरण एथील लं... द होईल यांत संशय न... व मुली बऱ्याच आहेत. डायरेक्टर साहेबांनीं ३० रुप... दिली.

रा. वामनराव गोविं... दकाजी यांस त्यांनीं ... मकदमा तेथील

ळीं आणून दाल... गाळून हो... ल हे

इसवी. अंक ३७

...री,

---

मि० जोजफ यांची डायरेक्टर आफिसांतील ६० रुपयांची जागा रा. रा. तात्याजी बळवंत कुंठे यांस मिळाली व त्यांची ४९ रुपयांची जागा रा. रा. अपाजी वामन यांस व त्यांची ३९ ची जागा मि० डिसोजा ३० रुपयांचे क्लार्क यांस मिळाली. या नेमणुका चांगल्या झाल्या.

रा. रा. वामनराव गोविंद जमादार मूर्तिजापुरकर यांवर एक फौजदारी मुकद्दमा मि० हेरसाहेब यांपुढें चालून त्यांस २५ रुपये दंड झाला. अपिलांत काय होतें पहावें.

उमरावतीस पब्लिकवर्कस कानफरन्स झाली त्यांत तिसरे प्रतीच्या सडका करण्याकरितां ५० लक्ष रुपयांचे सांगशन करावें असें ठरलें.

मे. जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी उमरावतीहून शुक्रवारीं यवतमाळाकडे जाणार होती.

मि. यासनखा साहेब अव्वाची हैदराबादेहून उमरावतीस येऊन दाखल झाले

तालुक्यांतील वीस रुपये पगाराचा एकेक कारकून कमी करणार व नायब तहशिलदारास तितके रुपये पगार अधिक करणार असें वर्तमान आहे.

उमरावती व खामगाव रेलवेचें काम सरकार आपल्याकडे घेणार.

इलिचपुर व दर्यापुर वगैरे ठिकाणीं गेले आठवड्यांत महामारीचा उपद्रव होता असें कळतें.

### जाहिरात नंबर ९२

दिवाणी काम चालविण्याचे रीतीविषयींचा सन १८७७ चा आक्ट १० यांतील कलम १६० चे आधारें दिवाणी कोर्टांत हजर होण्याकरितां जा साक्षिदारास समन्स केलें असेल त्याच्या खर्चाचें प्रमाण रेसिडेंट साहेब यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे.

वर्ग पहिला दररोज ५ रुपये. सरकारी सर्व सनदी व कमिशन दिलेले कामगार, एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या हुद्याहून अधिक किंवा त्यांचे बरोबरीची ज्यांची नेमणूक असेल असे बेसनदी कामदार, मोठ्या पदवीचे युरोपियन व युरेशियन आणि प्रतिष्ठित नेटिव यांस.

वर्ग दुसरा दररोज तीन रुपये. बिन अधिकारी युरोपियन किंवा मध्यम पदवीचे युरेशियन, सरकारी कचेऱ्यांतील मोठ्या हुद्याचे ... कृत्य करण्यास प्रवृत्त होतात. यासाठीं ...ज्यांनीं चांगले रीतीनें सुनांनां वागवावें ...आहे.

कचेऱ्यां... आनंद वाटतो कीं, ...क, मराठी ...पद्रव चांगला क... कडील नोकर प्रत्येच एतः संभावित प्रतीचे नो... ण्या ...णजे परगण्याचे माजी कामर, व चांगल्या प्रतीचे व्यापारी यांस

वर्ग चौथा दर रोज सहा आणेः- सदरील वर्गांत सांगितल्या पेक्षां खालच्या प्रतीचे पण ज्यांस कांहीं सा मान असतो असे नेटिव ह्मणजे परगण्याचे कनिष्ठ प्रतीचे माजी कामगार, हलके प्रतीचे व्यापारी वगैरे यांस

वर्ग पांचवा दर रोज च्यार आणेः- सदरील वर्गांत दाखल झाले नाहींत असे सर्व नेटिव ह्मणजे मजूर वगैरे यांस

२ कोर्टांपासून ६ मैलांचे आंत रहाणारे सर्व लोक त्याच दिवशीं येऊन त्यास परत जातां येतें असें समजावें. आणि त्यास एक दिवसाचा पोटगी खर्च मिळण्याचा हक्क आहे. सहा मैला पासून बारा मैलापर्यंत रहाणारे लोकांस एक दिवसांत येऊन दुसरें दिवशीं परत जातां येतें, सबब त्यांस दोन दिवसांचा पोटगी खर्च मिळण्याचा हक्क आहे. याप्रमाणें प्रत्येक सहा मैलास एक दिवस अधिक समजावा किंवा प्रत्येक साक्षीदारास बारा मैल किंवा बारा मैलाच्यां अंशा बद्दल एक दिवसाचा पोटगी खर्च दिला पाहिजे. आगगाडींतून सगळा किंवा अंशतः प्रवास करण्यास जो अवश्य वेळ लागेल तिजबद्दल प्रत्येक कोर्टानें ठराव करावा.

---

## वर्तमानसार.

मुंबई इलाख्यांत सन १८७७।७८ सालांत स्टांप विक्रीचें उत्पन्न ४१६६४६२ रुपये झालें. हें मागील साला पेक्षां फारच कमी आहे. याचें कारण दुष्काळामुळें फिर्यादी कमी झाल्या हें आहे.

नागपुरापासून रायपूर पर्यंत जी रेलवे करणार तिची रुंदी कमी धरली आहे ती वाढवून इतर मोठ्या रेलवे प्रमाणें धरावी असा मुंबईचे चेंबर आफ कामर्स सभेनें मुंबई सरकारास अर्ज केला होता. पण त्या भागांतील काम काज जून असल्यामुळें अधिक रुंदीचें कांहीं कारण नाहीं असा सरकारानें त्यांस जबाब दिला.

मुंबई इलाख्यांतील सरकारी कामें छापण्याकरितां मुंबईस सेंट्रल प्रेस ठेविला आहे त्याचें गुदस्त सालचें उत्पन्न २,७२,११० रुपये झालें. हें तिगस्तापेक्षां ६०,०३३ रुपयांनीं कमी आहे. कारण या वर्षी छापण्याचे दर कांहीं कमी केले आहेत.

# वऱ्हाडसमाचार

वऱ्हाडसमाचार तारीख ८ माहे सप्तंबर सन १८७८ इ०

पुस्तक १२ अकोला, र


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

रुपये

वर्षाचे अगाऊ ... दुष्काळ

सालअखेर ... गणा जिल्ह्यांत

किरकोळ ... व ३ हेड कानस्टेबल ... यांत कित्येक रजेवरून वक्त ... परत न आल्यामुळें काढून टाकिले ... हेत. पोलिसाकडे या वर्षांत १०८९८९ गुन्हे आले त्यांत चोरीस गेले मालाची किंमत ९६७७६२ होती. त्यापैकीं ३०१४५१ रुपयांचा माल मिळाला.

काश्मीरचे महाराजांनीं दुष्काळप्रीत्यर्थ सर्व उदमी व्यापाऱ्यांवरील कर दोन महिने माफ केले.

मि० एच टी प्रिन्सेप यांस कलकत्ता हायकोर्टांत जडज नेमिलें.

कासीम बाजार एथील महाराणी शरण माई यांस क्राउन आफ इंडियाचा किताब मिळाला. त्यासाठीं त्यांचे वाड्यांत दरबार भरला होता व मि० पीकाक कमिशनर त्या समारंभास गेले होते. नंतर राणी साहेबांनीं तेथील युरोपियन लोकांस मोठी मेजवानी दिली, दारूकाम सोडिलें व गरीबास धर्म केला.

मद्रास इलाख्यांतील ज्या लष्करी आफिसरांनीं दुष्काळांत सहाय केलें त्यांची सरकारानें स्तुति केली आहे.

चक्रवर्तिनी साहेबांची कन्या प्रिन्सेस ब्रिटीस यानां जान प्राईस नावाच्या मनुष्यानें भेटीकरितां कित्येक पत्रें पाठविलीं व त्यांत आपली तुह्मा बरोबर लग्न करण्याची इच्छा आहे असें दर्शविलें या सबबेनें त्यास कैदेंत ठेविलें होतें पुढें तपास करितां तो वेडा आहे असें ठरून त्यास वेड्याचे इस्पितळांत पाठविलें.

मुंबईंत मोऱ्या बांधून खराब पाणी समुद्रांत सोडून देण्याकरितां लोकांपासून ६० लक्ष रुपये व्याजानें कर्ज काढण्याकरितां मुंबई सरकारापाशीं परवानगी मागावी अशी हानकाक यांनीं म्युनिसिपल कार्पोरेशन सभेस सूचना केली होती. त्याबद्दल बरीच वाटाघाट होऊन पुष्कळ मतभेद पडला. अखेरीस मि० नवरोजी फरदुनजी यांनीं पहिल्या प्रथम जरूरीचे कामाकरितां २७ लक्ष रुपये कर्ज काढावें व मागाहून जसजसी जरूर लागेल तसतसें कर्ज काढावें अशी सूचना केली. त्यास बरेच लोकांचें अनुमोदन मिळून तसें करण्याचा ठराव झाला.

रशियन सरकार एशियांतील टर्कीत आपलें नफानुकसान पहाण्याकरितां ठिकठिकाणीं हुशार वकील नेमणार आहे.

ओरेनबर्गपासून मध्य एशियापर्यंत ह्मणजे सुमार २०० मैल रेलवे त्वारेत बांधण्याचा रशियन सरकारानें विचार केला आहे.

आस्ट्रेलियांत सिडनी येथें १८७९ च्या आगस्टांत जगांतील सर्व राष्ट्रांच्या पदार्थांचें प्रदर्शन होणार आहे.

बापूजी भांग्रे नावाच्या एका मनुष्यानें आपल्या साथीस घेऊन ... पूर्वी ठाणें, पुणें, खान ... जिल्ह्यांत बंडाळी करून ... दिला होता त्यावेळीं त्यास ... करितां व पकडण्याकरितां सरकारा ... यक उपाय करून ते व्यर्थ गेल्यावर ... वळचे ठाण्याचे पोलिस सुपरिन्टेंडेन्ट ... ने. जिल यांणीं एक विलक्षण युक्ति लढवून त्यास पकडलें; ती युक्ति अशी कीं, जिल हे स्वतां साधु अथवा जोगी बनून त्यांणीं आपल्या बरोबर एक ब्राह्मण साथीदार घेतला आणि भांग्रे हा पंढरपुरीं असतां तेथें साधु वेषानें जाऊन त्यास पकडला अशी एक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. यांतील बापूजी भांग्रे या नांवाच्या बदला राघुजी भांग्रे हें नांव असावें असें वाटतें, कारण बापूजी नांवाचा मनुष्य इतक्या प्रसिद्धीस कधीं आला होता हें स्मरत नाहीं.

शिंदे सरकाराजवळ जी फौज आहे ती कवाईत वगैरे कामांत फार निपुण आहे असें चहूंकडे प्रसिद्ध होतें. हल्लीं असें समजतें कीं, शिंदे सरकार फौजेकडे बिलकुल लक्ष देत नसून कवाईत वगैरेही पहिल्या प्रमाणें होत नाहीं. शिवाय शिंदे सरकारचा फौज कमी करण्याचा विचार असून थोड्या दिवसांपूर्वीं त्यांनीं ६०० घोडेस्वार कमी केले. सरकारचें लक्ष हल्लीं वसुलाकडे विशेष लागलें असून रस्ते वगैरे दुरुस्त करण्याचा विचार चालला आहे. असें होण्याचें कारण काय असेल तें असो.

ने. ओ.

## मत् भूल किंवा संसार-माया

प्रसंगवशात् नित्य दृष्टिगोचर गोष्टींपासूनही थोडाबहुत बोध होतो. थोड्या दिवसांपूर्वीं एथील एका राजमार्गानें जात असतां असें दृष्टीस पडलें कीं, एका धनाढ्य सावकाराचे घरीं कांहीं मंगलकार्य असून माडीवर मंजूळ, सुघोष, चवघडा वाजत आहे, व कुशल वाजंत्री सारंग रागांत सनैवर सुस्वर ताना मागून ताना घेत आहेत. हा वाद्यमेळ इतका वेधक होता कीं, सर्वांगावर रोमांच उभारून पंचप्राण सुहर्षित झाले.

दोन घरें पुढें सरल्यावर, कोणी एक गृहस्थ मरण पावला असून प्रेतसंस्कार चालू आहे असें पाहिलें. वाहन रस्त्यावर तयार होतें व मोठा जनसमुदाय खिन्न असा आजूबाजूस बसलेला होता. प्रेतास ओटीच्या सोपानावर स्नानविधि होत असतां आंत कुटुंबाचा मोठा कोल्हाळ चालला होता.

थोडक्याच अंतरानें पुढें नवीन उठवलेल्या एका जंगी इमल्याच्या वास्तूचा समारंभ होता. हा वाडा तोरणांनीं गोंगविला, असून सर्वत्र चित्रविचित्र कणे रांगोळ्या केल्या होत्या हरिद्रा, कुंकुम, नारळ आंब्याचीं पानें, सूत्र व पुष्पें यांहीं भूषित झळझळीत कलश स्थापिले होते, आणि पुष्कळ पाशीं नारी स्नातशु चर्भूत, रेशमी उंच वस्त्र परिधान करून, सुवर्ण मौक्तिकादिकांच्या भूषणांनीं अलंकृत व कुंकुम लेवून मंगळ स्वास्तवाचक गात भोंवतालीं उभ्या होत्या. सर्व तेथील मंडळी सुप्रसन्न दिसली.

ही सुखदुःखद गोष्टीची परंपरा पाहून भिन्न भिन्न भावोत्पत्तीस नुकता अवकाश मिळतो आहे इतक्यांत, एक एकाक्ष, दिसण्यांत कंगाल, ठेंगणा, हिंदुस्थानी ब्राह्मण उन्मुख होऊन तृतीय सवनांत "मत् भूल" असा त्रिवार आक्रोश करिता झाला. (हा ब्राह्मण ठिकठिकाणीं उभा राहून असा घोष करून चालता होतो असें समजलें आहे) आणि हा प्रकार सर्व थोडक्याच वेळामध्यें घडून आल्या कारणानें सर्व मनोभाव मिश्रित झाले व वर्तमान संसारसुखाविषयीं क्षणभर अंतःकरणाची एका प्रकारची अवर्णनीय स्थिति झाली. आणि आपल्या अल्प ग्राहक बुध्यनुसार बोधही झाला. आणि पुढें लिहिलेल्या श्लोकांचें स्मरण झालें.

क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्तकलहः  
क्वचिद्वीणावादः क्वचिदपि च हाहेति रुदितम्॥  
क्वचिद्रम्या रामा क्वचिदपि जराजर्जरतनु ।  
र्न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः॥१॥  
यत्रानेकः क्वचिदपि गृहे तत्र तिष्ठत्यथैको ।  
यत्राप्येकस्तदनु बहवस्तत्र नैकोपि चान्ते ॥  
इत्थं चेमौ रजनिदिवसौ दोलयन्द्वाविवाक्षौ ।  
कालः काल्या भुवनफलके क्रीडति प्राणिसारैः

[ १ ] 'एके ठिकाणीं विद्वज्जन संवाद, अन्य स्थानीं मदोन्मत्तांचा कलह; कोठें वीणाध्वनि कानीं पडतो आहे, कोठें सकरुण आक्रोश चालला आहे; कोठें लावण्यवती नारी, अन्यत्र वृद्धापकाळानें जर्जर झालेली. संसार विषमय किंवा अमृतमय हें उमगत नाहीं.' ( २ ) 'ज्या घरांत मोठें कुटुंब नांदत होतें तेथें आतां अवघा एकच उरला आहे; जेथें एकच होता तेथें पुढें कुटुंब विस्तार होउन शेवटीं कांहीं नाहीं. ह्या प्रमाणें रात्र व दिवस एतद्रूप दोन फांसे घोळवून पृथ्वीपटावर प्राणिरूप सोंगट्यांनीं ईश्वरपार्वतींनीं डाव मांडिला आहे.

ह्या श्लोकांपुढें आणखी संसार असारतेचें वर्णन देणार तें काय? (आमच्या हातींही संसार ह्यादशेस पोंचला!) ह्या महाज्ञानी कवींनें शेवटीं रूपकालंकारद्वारें आमच्या वर्तमान प्रापंचिक सुखदुःखाची यथास्थित प्रतिमा जगता पुढें प्रतिबिंबित केली आहे. पार्थिव वैभव असारतेचा पुतळा हाच ह्या श्लोकाचा भावार्थ होय. खळ हें अनिश्चिततेचें लक्षण ह्मणून क्षणभंगुर संसारास त्यांची उपमा दिली. लोकांस ऐश्वर्यानें इतका माद येतो, मोहामुळें ते इतके बेपर्वा वागतात कीं कित्येक उष्ट्या हातानें कावळा हाकणार नाहींत. बिलकूल दुसऱ्याचें जड जोखीम जाणणार नाहींत. पण इहलोकींची सर्व संपत्ति अळवावरचें पाणी. यौवन, परीवार, सोयरे दोन दिवसांचे. आमचा सर्व अभिमान निराधार, अज्ञानमूलक व पोकळ, शेखी मिरविण्यासारखें असल्या ह्या संसारांत आह्मापाशीं कांहींच नाहीं. विद्याभिमान, कुलाभिमान, जात्यभिमान, सर्व भ्रम विषयसुख गतधुंदी हीं सर्व मोहक संसाराची आपल्या डोळ्यांवर गुंगी, (माया) होय. ज्या जीविताचा आपण एवढा अवडंबर मांडिला आहे. ज्याची आपणास एवढी घमेंडी, त्यासारिखें तर क्षणिक दुसरें कांहीं नाहीं. निरभ्र काळोख्या रात्रीं प्रशस्त स्थानीं उभें राहिल्यानें नानाविध नक्षत्रमालिकांनीं नभोमंडळ मंडित दिसतें, तीं सर्व तेजःपुंज नक्षत्रें एकामागून एक पश्चिमदिशेस अंतर्धान पावत असतात, व नूतन नक्षत्र परंपरा पूर्वेस उदित होत असतात अगदीं त्याप्रमाणें दिसून येतें त्याचप्रमाणें ह्या भ्रामक संसारांत क्षणोक्षणीं कैक निर्माण होताहेत, व किती निजधामास जात आहेत? सरासरीस सेकंदास १ किंवा पळास २४, ह्या प्रमाणानें मनुष्याचें जीवित अस्त होत आहे अशी अटकळ काढिली आहे. मरणावायूच्या सोसाट्या पुढें दुर्बल आयुर्दीपाचें कांहीं चालत नाहीं केव्हां विपद् घन-जाल येऊन क्षणिक ऐश्वर्यास आच्छादील ह्याचाही भरंसा नाहीं.

संसारांत राहून सुखसोहळा कांहीं करूं नये असें मुळींच ह्मणणें नाहीं. धनधान्यादि सकल यांचा मेळा असतां, तो जणु काय नाहीं असें वर्तन ठेवावें. सदा जागृतानें प्रपंच चालवावा. मग भूल पडणार नाहीं. हें केवळ मृगजल होय. हा सर्व दुनियादुकानाचा पसारा स्वप्नवत् आहे असें भासलें पाहिजे. ह्मणजे मोठालेही प्रसंग आले असतां तयारी राहील. मन स्वाधीन राहील व अंतींचा जो एकच धर्म त्याचें मनुष्य अवलंबन करील.

मृतं शरीरमुत्सृज्य काष्ठलोष्ठसमं क्षितौ ॥  
विमुखा बान्धवा यान्ति धर्मस्तमनुगच्छति॥१॥

'काष्ठमृत्पिंडवत् प्रेतास मूठमाती देऊन नातलग मागें परततात. एकटा धर्मच त्याचे मागून जातो.'

हें कधींही विसरूं नये. मग अंतःकरण मोहित होणार नाहीं, व नित्यानित्य संबंध सदा ध्यानांत रहातील. सर्व संबंध शृंखलेचा मूळ दुवा परमेश्वर, तोच एक सर्वांचा आधार, त्याच्याशीं संबंध तुटला कीं, सर्व एका क्षणांत घडघडलें. आपण एका झोंपाळ्यावर बसलों आहों. त्याची चौकट व फळें हीं कितीही मजबूद असोत, त्याच्या कड्या केवढ्याही लठ्ठ असोत, व आह्मी नळकट असून जवळ बसलेले आह्मासाठीं प्राण देणार अशा प्रेमिक असोत. वाहलाचा मूळ आंकडा सुटला कीं तेथें मग ठाव नाहीं. तस्मात् प्रपंच तर करावा, मोठ्या उत्साहानें करावा; पण विषयलंपट होऊं नये. त्यांतच गर्क राहूं नये. अज्ञानें त्याची विटंबना होते. दान, दाक्षिण्य, तप, अनुष्ठान, शांति, क्षमा, सर्वप्रकारचें लोक कल्याण करण्याचा हेतु व प्रयत्न यांचा संसारांत नित्य निरंतर अभ्यास असावा. अज्ञानामुळें अंतःकरण मोहित होतें, तर सावध रहावें व दया आणि धर्म हेच सर्वांत प्रधान ह्मणून देवाची आराधना करावी व धर्माच्याच आधारानें संसार मार्ग क्रमावा. सारांश, सकल धर्मप्रद जो गृहस्थाश्रम त्यांत राहून विरक्त, व निर्विकार वृत्ति धरावी.

सु. प.

---


हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १५ माहे सप्तंबर सन १८७८ इसवी. अंक ३७


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ०६ |
| महामारीवरील गोळी | ०१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| सादारीचे नियम. | ०८ |

सदर्हू किमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

## जाहिरात.
## कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांतकौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टिपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ दऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तिपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरणें चालू असून क्रियापदाचा आरंभ केला आहे. शिवाय दोनशे शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प; ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया. टपालखर्च एक आणा. पण एक वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाठविल्यास टपाल खर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मास 'पोष्टपेड' पत्रीं कळवावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८ } रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कौमुदीमहोत्साह कर्ते.

## जाहिरात.

वऱ्हाडाकरितां नवीन दिवाणी कायद्यांत वहिवाटीच्या संबंधानें आ. रेसिडेंट साहेबांनीं केलेल्या नियमांचें भाषांतर.

नवीन दिवाणी कायद्यांतील ज्या कलमांत कांहीं वहिवाटीचे वगैरे संबंधानें स्थानिक सरकारानें नियम करावे ह्मणून हवाला दिला आहे, त्या संबंधानें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं नियम करून तारीख १५ माहे आगष्ट सन १८७८च्या "रेसिडेन्सी आर्डर" मध्ये छापून प्रसिद्ध केले आहेत. त्याचप्रमाणें नवीन कायद्यांत वऱ्हाडच्या संबंधानें झालेला फेरफार तारीख १८ माहे जुलै सन १८७८ च्या "रेसिडेन्सी आर्डर" मध्यें आला आहे ह्या सर्वांचे भाषांतर करून आह्मी छापण्यास सुरुवात केली आहे. वकील, मुकत्यार व इतर दुसऱ्या लोकांस ह्या पासून फार उपयोग होणार आहे. याचीं सुमारें पृष्ठें २० होतील याची किंमत ८ आणे दर प्रतीस व बाहेर गावचे लोकांस या खेरीज टपाल हशील पडेल. प्रती सध्या थोड्या काढल्या आहेत ह्मणून ज्यास घेणें असेल त्यानीं लवकर घ्याव्या. प्रती आठ दिवसांत तयार होतील. उमरावती ता. २ सप्तंबर १८७८ इसवी.

म्यानेजर प्र. सि.

## दिवाणी कामाच्या वहिवाटीच्या जाहिराती.

नव्या दिवाणी कायद्याच्या आधारें कामाच्या वहिवाटीकरितां जाहिराती अलीशान रेसिडेंट साहेबांनीं प्रसिद्ध केल्या त्यांचें खरें मराठी भाषांतर मे. जुडिशियल कमिशनर साहेबांच्या आफिसांत तयार झालेले सर्व कोर्टाच्या उपयोगाकरितां छापत आहे त्यावरून विक्रीसाठीं कांहीं प्रति आह्मी तयार करीत आहो त्या लवकरच छापून निघतील व सहा आणे किमतीस दिल्या जातील. सर्वांस कळावें ता. १४ सप्तंबर सन १८७८ इसवी.

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## विक्रीस तयार.
### महामारीवर नवीन पुस्तक

मिरजेचे दवाखान्यावरील मेडिकल आफिसर डा. त्रिंबक सखाराम सिरवलकर यानीं जाहिरात दिल्याप्रमाणें महामारी, तिचीं कारणें, निवारण व उपाय याजवर पुस्तक छापलेलें आह्माकडे विक्रीस आलें आहे. त्याची किंमत सहा आणे व बाहेर गावीं डाक हशील अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

देऊळघाटाहून विनंती विशेष पत्रकर्ते महाराज पावसानें चांगली ऊघाडी दिली आहे. शेतें निंदण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चाललें आहे. रबीकरितां वावरें तयार होत आहेत. पिकें चांगलीं आहेत. कोठें कोठें जमिनीच्या मानानें पाणी फार झाल्यामुळें पिकें किंचित नासलीं परंतु हा प्रकार सर्वत्र लागू नाहीं. धारणेचे मान मध्यें बरें होतें. रुपयास २० शेर जवारी मिळत होती व याहून स्वस्त होईल असें वाटत होतें परंतु तसें न होतां कालच्या बाजारीं १८ शेर जवारी विकली. याचें कारण काय असेल तें असो. इतकें ह्मणतात कीं कोणा एका देशास जवारी खरेदी होऊन चालली आहे त्यामुळें महागाई होत चालली आहे. ह्या गावीं मापें बहुतेक खोटी व एक एकापाशीं दोन दोन संच अशीं आहेत. याचें प्रत्यंतरास प्रमाण थोडक्या दिवसा पूर्वीं एथील एका व्यापारी मुसलमानास बुलढाणें मुकामीं अशा मापाबद्दल २० रुपये दंड झाला अशी वार्ता आहे. घेण्याचें माप एक व देण्याचें माप एक अशीं दोन मापें प्रत्येक इसम बाळगितो. बाजारांत रुपयाचें धान्य खरेदी केलें व घरीं आणून खऱ्या मापानें मोजून पाहिलें ह्मणजे अर्धा अगर पाऊण शेर तुटतें. इकडे सरकारचें व गावचे अधिकारी पाटील पांडे यांचें निःपक्षपातानें लक्ष पोचल्यास गावचे एकंदर हित होणार आहे. व तेणेंकरून पाटील पांडे यांचा दर्जा गावांत विशेष वाढणार आहे.

तारीख ६ रोजीं एथील भगु शिंपी ह्मणून कोणी इसम वर्ष दीड वर्षांपासून बाहेरें गावाहून येऊन एथील प्रसिद्ध नरसराम शिंपी साहुकार याचे आश्रयानें रहात आहे त्याचे बायकोनें आत्महत्या करण्याचे इरादानें विहिरींत उडी घातली अशा आरोपावरून पोलिसानें तिला पकडलें होतें. कोणी ह्मणतात सासवा सुनांचीं कुरबूर झाली. ह्मणून असें झालें व कोणी ह्मणतात ती पाण्याला गेली होती. तिचा पाय घसरून ती विहिरींत पडली. खरें कारण काय असेल तें असो. इतकें खरें आहे कीं, कित्येक वेळां सासवाच्या दुःसह जाचानें सुना निवास वैतागून असें घोर कृत्य करण्यास प्रवृत्त होतात. यासाठीं सासवांनीं चांगले रीतीनें सुनांनां वागवावें हें अवश्य आहे.

लिहिण्यास फार आनंद वाटतो कीं, ह्या गावचा महामारीचा उपद्रव चांगला कमी झाला आहे. एकादे वेळीं मध्येच एकादें उमटतें. परंतु आतां चिंता करण्यासारखें कांहीं नाहीं. जातां जातां ह्या बाईनें रा. रा. अमृतराव देशपांडे चिखलीकर हे ह्या गावीं बरेच दिवसांपासून रहात होते त्यांचा बळी घेतला. हे गृहस्थ व्यापार वगैरे करीत होते. दोन वर्षांपासून एथील ब्रह्मवृंदामध्यें चाललेल्या तटाचे हे उत्पादक होत. यांच्या मरणाची फार लोक हळहळ करितें आहेत. महामारीनें या गावीं फार कहर केला होता. कित्येक अज्ञान बालकें मातेविराहित झालीं आहेत. कित्येक पुरुषांच्या स्त्रिया जाऊन त्यांचे संसार बुडाले. कित्येक तरुण स्त्रिया धवाविराहित झाल्या. असो. प्रभुसत्तेनें जें होईल तें रास्तच समजलें पाहिजे.

दोन तीन दिवसांपासून ह्या गावचे पांडे रा. रा. लक्ष्मण पांडुरंग यांणीं गावदुरुस्तीकडे फार लक्ष्य दिलें आहे. पाटील जागले बरोबर घेऊन त्यांस मदत देतात. याबद्दल त्यांची तारीफ जितकी करावी तितकी थोडीच. पाटील व कुळकर्णी यांणीं काम करणें योग्य आहे तितकें त्यांनीं चालविलें आहे. परंतु आपल्या पत्रांत म्युनेसिप्यालिटीबद्दल लेख आले असून म्युनिसिप्यालिटीस कांहीं चळवळ नाहीं हें पाहून मोठें आश्चर्य वाटतें. रस्त्यावरून गवत वाढलें आहे. हें भंगी पगारदार आहेत यांणां काढणें रास्त आहे. परंतु आतांशी भंगी दिसत नाहींत. ह्याना सरकारांतून पगार मिळत असून हे कां गांव दुरुस्तीचें काम नीट ठेवित नाहींत; पाटील पांडे आरंभलेल्या कामाप्रमाणें नेहेमीं वहिवाट ठेवतील तर खरोखर गांवांत व सरकारांत त्यांचा चांगला बोज वाढेल. पत्र विस्ताराची माफी करावी. कळावें हे विनंती

आपला सेवक
एक देउळघाटस्थ.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. खालीं लिहिलेल्या च्यार ओळीस आपण आपल्या सुंदर पत्रीं जागा देऊन प्रसिद्ध कराल ही आशा धरून कळवितो कीं,

वणी हा गाव मूर्त वऱ्हाडांत आहे. एथें एका गृहस्थानें आग्रहपूर्वक आशौच दशाहात्मक शवसंबंधी प्राप्त झालें असतां स्वगृहीं श्रावणप्रयुक्त अभिषेक व ब्राह्मण भोजन आपण त्या घराचे एका भागांत राहूनें चालविलें. त्यास एथें शंभर घरें ब्राह्मणाचीं आहेत त्यांतील कित्येकांचे धर्मसिंधु वगैरे ग्रंथाधारें असें मत आहे कीं सुतकी जो त्याचे घरीं ब्राह्मणभोजन होणें बरोबर नाहीं व या मासप्रयुक्त कार्याबद्दल

विधिपूर्वक संकल्प झाला नाहीं अथवा संकल्प केला तरी आमान्न देऊन अन्यस्थळीं करणें असल्यास करावें ह्याही गौणपक्ष. कारण धर्मसिंधु आदिग्रंथांत अशौचा पवाद पांच प्रकारचे ते अनन्यगति व आर्त असल्यास ग्रहण करावे असे आहेत. तसें संकट नसतां या ग्रहस्थानीं आग्रहानें केलें हें बरोबर नाहीं. त्याच्याच बंधूनें ब्राह्मणानीं सांगतांच दुसरे ब्राह्मणाचे घरीं आमान्न पाठवून भोजन कराविलें हें कसें? तत्पक्षीय ब्राह्मण बरोबर केलें असें ह्मणतात त्यास हें पत्र आपले पत्रीं प्रसिद्ध होऊन विद्वान लोकांकडून या प्रश्नाचें उत्तर वाक्याधारासह येईल व झालेलें कृत्य सशास्त्र हे या सेवकास पत्रद्वारां समजल्यास आपले फार आभार होतील. कारण या खेडे गांवांत ज्याचे मनास जसे आले तसे शास्त्रार्थ ते करितात यास्तव जरूर आहे हे विज्ञापना मिति श्रावण वद्य १२ रोज रविवार शके १८००

एक
धर्महितेच्छु.

---

नोटिस.

रा. रा. सखाराम वल्लद दत्तनाथ रहाणार मौजे कळंबीमहीगाव ता. बाळापुर यास खालीं सही करणार यानकडून नोटिस देण्यांत येतें कीं, रामजी पाटील कसुरकर याचे दुकानाहून आह्मी तुह्मास रुपये १७५ सन १२७५ फसली सालीं आषाढ महिन्यांत ६ महिन्यांचे करारानें देवविले होते सदरील रुपये साहु मजकुरास तुह्मीं करारावर न दिल्यावरून आह्मी खुद्द जातीनें त्याचे रुपयांचा निकाल केला. त्यावर तुह्मास रुपये मागितले असतां देऊं दिलीऊच्या गोष्टी करतां सबब तुह्मास ही नोटिस मुद्दाम देण्यांत येते कीं, नोटिस पावल्या तारखेपासून ८ दिवसांचे आंत व्याजासुद्धां सर्व रकमेचा निकाल केल्यास उत्तम, नाहीं पेक्षां योग्य कोर्टांत नोटिशीच्या खर्चासुद्धां दावा करून रुपये घेण्यांत येतील. कळावें. तारीख १३ माहे सेपटेंबर सन १८७८ इसवी.

( सही ) मारुती वल्लद भिवसेन
पाटील वस्ती कळंबी महागांव.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ४ शके १८००

---

## वऱ्हाडांतील पब्लिकवर्क्स खातें.

मोठमोठाल्या सडका, नद्यांचे पूल, कचेऱ्या वगैरे कामें सरकारच्या ज्या खात्याकडून होतात त्यास पब्लिक वर्क्स ह्मणजे सार्वजनिक कामाचें खातें असे ह्मणतात. यावरून हें उघड आहे कीं, या खात्याकडून जीं कामें व्हावयाचीं तीं सर्व लोकांच्या उपयोगाचीं व सोईचीं पाहिजेत. व लोक जो सरकारास कर देतात त्या सार्वजनिक पैशांतून तीं कामें व्हावयाचीं ह्मणून त्याचा खर्चही बातबेतानें झाला पाहिजे. पण चोहोंकडे बोभाटा आहे कीं पब्लिकवर्क्स खात्यांत पैशाची फार नासाडी होऊन कामें व्हावी तशीं होत नाहींत. याचप्रमाणें वऱ्हाडांतील पब्लिकवर्क्स खात्याचा बोभाटा झाला आहे. गेल्या आठवड्यांतील मुंबई टाइम्स पत्रामध्यें इकडील या खात्याविषयीं दोनदा लेख आले ते केवळ या खात्याविरुद्ध आहेत सबब त्यांतील थोडी माहिती प्रथम कळवून मग आह्मी आपलें त्या संबंधी मत कळवितों.

टाइम्सकर्ते ह्मणतात कीं वऱ्हाडांतील पब्लिकवर्क्स खात्याकडे नेमणुकी खर्च अफाट आहे. चालू सालांत खर्चाकरितां बजेटांत ७,८३,१४८ रुपये मंजूर झाले आहेत पण यांत २,१८,५८० रुपये नेमणुकी खर्च ह्मणजे आफिसर व त्यांचे हाताखालचे नोकर वगैरेचा खर्च आहे. ह्मणजे शेकडा २८ रुपये खर्च झाला. हाच खर्च गुदस्त सालीं ३२॥। रुपये व तिगस्त सालीं ३६॥ रुपये शेकडा झाला आहे हा फार बंभाळ आहे. दुसऱ्या ठिकाणीं पब्लिकवर्क्स खात्यांतून शेकडा १८ रुपये खर्च बस होतो. असें असतां वऱ्हाडांत त्याच्या दुप्पट खर्च होणें हें किती फाजील व रयतेला आणि निजाम सरकाराला बुडविणें आहे याचा हिंदुस्थान सरकारानें विच्यार करावा.

ज्या भागांतील सडकांचा विशेष उपयोग नाहीं अशा भागांत मैलास ८००० रुपयांहून अधिक खर्चानें पहिले प्रतीच्या सडकां तयार करीत आहेत. इलिचपुर जिल्ह्यांत पिलीची सडक ३५ मैल आहे तिला तीन लक्ष रूपयांचें सांगशन आहे. तो रस्ता जंगलांतून लाकडे आणण्या साठीं आहे. व आज दहा वर्षें उत्तम सडका नसतांही लोकांचीं खाचरें तिकडून हमेशा येत असतात सबब ही पैशाची व्यर्थ नासाडी आहे व याचा उपयोग फक्त थोडे साहेब लोक फिरावयास निघतात तेव्हां त्यांनीं मात्र होतो.

पब्लिकवर्क्स खात्याचे वऱ्हाडांत आजपर्यंत पूर्व पाश्चिम असे दोन भाग होते त्यांत आतां सेंट्रल ( मध्य भाग ) एक आणखी करून एकंदर तीन भाग केले आहेत इतक्यांचा कांहीं उपयोग नाहीं. मध्य भागाला ५५० रुपये पगाराचे इंजिनियर नेमले आहेत त्यांना काम सारे २० मैल सडकेच्या दुरुस्तीचें आहे. हें एकादा ओव्हरसियर करूं शकेल. व दुसरीही इकडील कामें मोठमोठाल्या पगाराचे आफिसर व त्यांच्या हाताखालील कामदार जीं करितात त्यांतही कांहींच अर्थ नाहीं. त्यांच्या तिजाई पगारांत दुसरे लोक तीं कामें सहज करूं शकतील. असें असतां निजाम सरकारचा पैसा व्यर्थ खर्चीं घालून हें जगडव्याळ खातें माजविलें आहे.

इरिगेशन ह्मणजे पाटबंधाऱ्याचेंही खातें एथें कित्येक वर्षें स्थापन केलेलें आहे पण त्याकडून काम मात्र ह्मणण्यासारखें कांहींच झालें नाहीं एक इंजिनियर व त्याचे हाताखालील कामदार दहा वर्षें सरकारांतून पगार खातोहेत पण त्यांचा उपयोग कांहीं नाहीं. गेल्या साऱ्या वर्षांत एक रुपया देखील कामाचे संबधानें खर्चीं पडला नाहीं. या वर्षीं देखील १९५६४ रुपये इरिगेशन खात्याकडे मंजूर झाले आहेत पण त्यांतून पगाराशिवाय कांहीं खर्च होणार किंवा कसें तें न कळे.

याप्रमाणें कित्येक ठोकळ ठोकळ गोष्टी या खात्याच्या संबधानें मुंबईचे टाइम्स पत्रांत आल्या आहेत व त्यांतील पुष्कळ भाग तंतोतंत खरा आहे सबब त्यांकडे हिंदुस्थान सरकारचें मन वळणें अति अवश्यक होय असें आह्मास वाटतें.

गेल्या महिन्याची तारीख २७ व २८ या दोन दिवशीं पब्लिकवर्क्स खात्याकडील रकमा सांगशन करण्याच्या विचाराकरितां उमरावतीस कानफरन्स भरलें होतें त्या प्रसंगीं हैदराबादेहून सुपरइंटेंडेंट इंजिनियर आले होते. सर्व डिपुटी कमिशनर, इंजिनियर व उभयतां कमिशनर हजर होते. त्या प्रसंगीं मि. जोन्स साहेब कमिशनर यानीं या खात्याकडे हा इतका अफाट खर्च नसावा अशा बाबद पुष्कळ आग्रह धरिला होता पण बहुमतानें पुढें त्यांचें ह्मणणें मंजूर झाले नाहीं त्यास इलाज नाहीं. मध्यभागास निराळा इंजिनियर नेमिला त्याजबद्दल कमिशनर साहेबास कोणी विचारलेंच नाहीं असे कळतें. आमचे ऐकण्यांत आहे कीं प्रस्तुत या खात्याकडे कामें वाढलीं आहेत ह्मणून तिसरा इंजिनियर नेमण्याचें अगत्य पडलें. त्याच्याकडे फक्त २० मैल सडकेच्या दुरुस्तीचें काम आहे असें टाइम्समध्यें लिहिलें आहे तें मात्र खरें नाहीं. मूर्तिजापुरापासून कारंजापर्यंत, मेहकरापासून इंगोलीपर्यंत, वाशिमापासून पुसदपर्यंत, जालन्यापासून औरंगाबाद पर्यंत सडका व औरंगाबादचे लष्करी छावणींतील काम मध्यभागच्या इंजिनियर कडे आहे. सबब तें थोडें ह्मणण्यासारखें नाहीं.

इलिचपुर जिल्ह्यांतील पिलीचा रस्ता ८००० रूपये मैली खर्च करून पहिले क्लासचा कराविला याचें कांहीं कारण नव्हतें असें आह्मासही वाटतें. मग सांगशन मागवितेवेळेस काय फायदा दाखविला असेल तो असो. एथून वाशमास जाणरा रस्ता सेकंड क्लास आहे त्याला मैली सुमार ६००० रुपये लागले आहेत. तो बिलकूल वाईट नाहीं. असे रस्ते आणखी बहुत ठिकाणीं पाहिजेत. बाळापुर, जळगाव, वगैरे मोठमोठाल्या गावाहूनही येण्यास रस्ते किती वाईट आहेत व त्यापासून लोकांस किती त्रास होतो याचा विचार चांगल्या मनानें केल्यास पहिल्या प्रतीचे निवडक जागीं रस्ते न करितां दुसऱ्या निदान तिसऱ्या प्रतीचे तरी रस्ते जागोजाग करावेत असें कोणासही वाटणार आहे. व तसें असावें ही गोष्ट कमिशनर साहेबांचे मनांत बिंबली आहे. त्याअर्थीं पुढेंमागें रेसिडेंट साहेबांच्या व हिंदुस्थान सरकारच्याही नजरेपुढें हें प्रकरण जाऊन आमच्या वऱ्हाडी रयतेची दाद लागेल असें आह्मी इच्छितों.

इरिगेशन खात्याचे आफिसर एथें बरीच वर्षें आहेत व त्यांनीं ह्मणण्यासारखें विशेष काम केलें नाहीं ही गोष्ट खरी आहे. व असें दिसूं लागल्यामुळेंच कांहीं वर्षें हें खातें वेगळें न ठेवितां एक्झिक्युटिव इंजिनियरच्या सुपूर्द केलें होतें असें वाटतें. पण अलीकडे पुन्हा तें स्वतंत्र करून त्या खात्याकडून सरकारानें कांहीं कामें करून घेतलीं आहेत असें समजतें. फत्तेखेलड्याचा तलाव, रिसोडचा तलाव, वाकदचा तलाव, अंबोऱ्याचा तलाव यांच्या दुरुस्तीचें व बंधाऱ्याचें काम इरिगेशन खात्याकडून झालें आहे. व या तलावांपासून पाट काढून बागाइताच्याही सोयीचा विचार चालविला आहे. आतां काम किती रकमेचें झालें व त्याला पगार किती खर्चीं पडले हें पहाण्याचें व त्यांत दोष असल्यास सुधारण्याचें काम वरिष्ठ सरकारचें आहे तें त्यांनीं आजपर्यंत केलें नसल्यास या पुढें तरी करावें ह्मणजे लोकांचा उपयोग होईल.

वऱ्हाडांत पब्लिक वर्क्स खात्याकडे नेमणुकी खर्च फार आहे. एकादि युरोपियन कंपनी व्यापार आरंभील तर असा अफाट खर्च कधीं ठेवणार नाहीं, व हा खर्च तर दुपटीच्या जवळ जवळ आहे असे टाइम्सकर्त्यांचे उद्गार आहेत, पण त्यानें वऱ्हाडांतील सर्व खात्यांवर नजर फेकली असती तर कामें कोणत्या स्वरूपाचीं व त्यांवर कामदार किती व ते केवढ्या खर्चाचे आहेत हें त्यास दिसून आलें असतें व एकट्याच याच खात्याला हा दोष लावून तो स्वस्थ राहिले नसते. अस्तु. हा विषय बराच लांबला सबब आतां आवरला पाहिजे.

---

## वऱ्हाड.

पुढील महिन्याचे पहिले तारखेस एथें हायर व लोअर स्टांडर्डच्या परीक्षा होणार आहेत.

व्याक्सिनेशन ह्मणजे देवी काढण्याच्या खात्याकडे जागा भरावयाच्या आहेत त्यासाठीं स्यानिटरी कमिशनर यांजकडे उद्या कांहीं उमेदवारांची निवड होणार आहे.

मे० गनत्राप साहेब २० दिवसांची रजा घेऊन मुंबई कडे गेले आहेत त्यांचे जागेवर उमरावतीहून मि. हावसन साहेब असिस्टंट पोलिस सु. हे येऊन काम पाहूं लागले आहेत.

हैदराबादचे रेसिडेंट कर्नल मीड साहेब फर्लो रजा घेऊन विलायतेस जाणार व त्यांचे जागेवर ग्वालेरचे रेसिडेंट कर्नल वाटसन साहेब सायप्रस कडे गेलेले यांची नेमणूक होणार असें टाइम्स पत्रांत वर्तमान लिहिलें आहे.

एथील तुरुंगांत महामारीचा संसर्ग फैलावूं नये ह्मणून कांहीं कैदीस मौजे मलकापुर एथें नेलें आहे असें कळतें.

जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी यवतमाळाकडून गुरुवारीं एथें आली

व आज मलकापुराकडे जाऊन एक दोन दिवसांत पुन्हा परत येणार आहे.

---

उमरावतीस व अकोल्यास युरोपियन लोकांचा व्हालंटियर पलटण भरण्याचा बेत आहे. शुक्रवारी एथें त्यांची तयारी होणार होती ती कांहीं कारणानें राहिली. एक दोन दिवसांत होणार आहे.

---

निजाम सरकारच्या रेलवेचें गेल्या सालचें उत्पन्न ८३०७६८ रुपये झालें. व खर्च ६४४०८० रुपये लागला. ह्मणजे या रेलवेला या सालां १८६६८८ रुपये नफा झाला. ही रेलवे तयार होण्याला एकंदर ११६०१३८९ रुपये खर्च लागला होता त्या मानानें शेकडा दीड रुपयाहून थोडा अधिक नफा झाला असें दिसतें. गुदस्त सालच्या दुष्काळामुळें जें पुष्कळ धान्य निजाम सरकारच्या मुलखांत गेलें तेणेंकरून हा नफा झाला. रेसिडेंट साहेब रिपोर्टांत लिहितात कीं, एवढा फायदा पुढें कोणत्या सालीं या रेलवेस होण्याला बराच काल पाहिजे. जी. आय. पी रेलवेनें या रेलवेवर काम केलें तिला उत्पन्नांतून शेकडा ६२ रुपये स्टेट रेलवेनें दिलें.

---

या आठवड्यांत हवा कित्येक दिवस साभ्र राहून एक दोन दिवस पावसाचे तुषारेंही आले व नदीसही थोडें अधिक पाणी आलें होतें. कधीं उकाडा मनस्वी होतो व कधीं चांगली थंड हवा असते असें हवेचें मान चमत्कारीक झालें आहे व तींत रोगबीजही बरेंच आहे. महामारीचा आजार २१३ दिवसांत तिसऱ्यानें पुन्हा उद्भवला आहे. तो तुरळक आहे पण दुसरेही आजार आणखी पुरवण्यास आले आहेत. मनुष्यास सून येते. ह्मणजे एकदम पाय सुजतात किंवा डोक्याकडून सूज येते. तापाचाही आजार आहे, ठकणा आहे व आमांश आहे अशी हवेंत चलबिचल झाल्यानें लोकस्थिति उद्विग्न झाली आहे. कलकत्ता पर्यंतही असे आजाराची घजल गेल्याविषयीं कळतें. तें असें.

कलकत्ता एथें डेंगू फीवर ( गुडघेमोडी ) सारख्या दुसऱ्या एक दोन आजारांची सांत आली आहे. पहिला प्रकार हा कीं, मनुष्य सकाळीं निजून उठल्याबरोबर त्याचे पाय सुजलेले असतात व ती सूज हळूहळू कंबरेपर्यंत वाढत जाते, व दुसरा असा कीं, मनुष्याच्या सर्व अंगांस व सांध्यांस ठणका लागतो; अन्नपचन बरोबर होत नाहीं; तोंडास रुची नसते व भूकही लागत नाहीं. हा आजार बरेच दिवस असतो व यावर औषधोपचारही चालत नाहीं.

---

कमिशनर साहेबांची स्वारी अजून आली नाहीं.

---

एथील मिडलक्लास स्कुलाचे हेडमास्तर रा. रा. पांडुरंग दामोदर हे वारंवार रजा वाढवू लागल्यानें शाळेच्या सुस्थिती करितां डायरेक्टर साहेबांनीं रा. रा. गोविंद नारायण चिकाटे यांस त्यांचे जागेवर नेमे पगारावर तूर्त नेमिलें आहे. हे गृहस्थ वऱ्हाडांत शिकले असून म्याट्रिक्युलेशन पास झाले आहेत.

---

खामगाव व उमरावती स्टेट रेलवेच्या गुदस्त सालच्या उत्पन्नांची माहिती पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. खामगाव रेलवेला १९५१७ रुपये नफा झाला. या रेलवेला भांडवल ४८५०५४ रुपये लागलें आहे त्यावर शेकडा ४ रुपये मिळाले. तिगस्त सालीं दोन रुपये शेकडा नफा झाला होता. व त्या वर्षी पावसाळ्यांत गाडी बंद होती व सन १८९७ सालीं चालू होती ह्मणून इतकें अंतर पडलें. उमरावती रेलवेला गुदस्त सालीं ५२७०९ रुपये नफा झाला, तिचें भांडवल रुपये ४३७२७८८० आहे. त्या मानानें शेकडा १२ रुपये नफा झाला. सन १८७१ सालीं शेकडा साडेचार रुपयांहून किंचित अधिक झाला होता. तिगस्ता पासुन पावसाळ्यांत ही रेलवे बंद केली नव्हती व खर्च भागला पाहिजे ह्मणून मालावर मणास तीन पै अधिक आकार घेत होते तो आतां कमी करण्याचा विचार झाला आहे. परंतु जी आय पी कंपनीला तो विचार अनुकूळ वाटला नाहीं व तिनें सरकारावरच ती गोष्ट सोपली ह्मणजे सरकार आतां आपले वहिवाटींत सर्व स्टेट रेलवे घेणार आहे तेव्हां त्यांनीं काय पाहिजे तें करावें असें कंपनीनें ह्मटलें.

---

११वे तारखेस अकोल्याच्या म्युनीसिप्यालिटीची जनरल सभा भरली होती त्या वेळीं मि. फ्लेमिंग साहेब, हार्वे साहेबाचे क्लार्क, व बहुतेक व्यापारी लोक कमिटीपुढें आले होते. कापसाचें मार्केट आहे याच ठिकाणीं रहावें असें सर्वांचें ह्मणणें पडल्यावरून तीच जागा मुक्रर केली व तिचे उत्तरेस मोची लोकांची झोपडी होती ती जागा रिकामी करवून फ्लेमिंग साहेबाचे कारखान्यास द्यावी असें ठरलें. जागा ६०० फूट लांब व ४०० फूट रुंद आंतील विहिरीसुद्धां १५० रुपये दरसाल भाडें घेऊन वीस वर्षांचे करारानें द्यावी असें ठरलें. व हार्वे साहेब या जागेच्या शेजारी आपले कारखान्यास जागा मागतील तर याच नियमानें द्यावी असें ठरलें. स्टेशन व गाव यांचे दरम्यान ही जागा असून हे दोन कारखाने एथें राहून आणखी हो एक दोन कारखाने कोणी आणिल्यास त्यांस पुरेसी आहे. व जागा मोठी सोईची आहे. व या ठिकाणास व येणेंकरून अकोल्यास आतां मोठी शोभा येणार आहे व हे कारखाने चांगले चालल्यास एथील व्यापारासही चांगली तेजी येणार आहे. आतां लवकरच सदरील उभयतां कारखानदारांच्या इमारतीचीं कामें सुरू होतील. हार्वे आणि सभापति यांची तर यंत्रेंही एथें येऊन दाखल झालीं आहेत. हा व्यापार सुरू झाला ह्मणजे एथें ब्यांकेचीही एक शाखा स्थापन होण्याची जरूरी पडेल व त्या प्रमाणें तीही येईल. असें आह्मांस वाटतें.

---

मूर्तिजापुरचे रा. रा. ... नराव गोविंद जमादार यांजवर कुकाजी यास त्यांनीं मारल्याबद्दल फौजदारी मुकदमा तेथील तहशिलदारापुढें होऊन त्यांनीं त्यांस १५ दिवसांची सक्त मजुरीची शिक्षा दिली होती तिजवर उमरावतीचे डिपुटी कमिशनर कर्नल मेनिस साहेब यांजपुढें अपिल होऊन शिक्षा रद्द झाली या संबंधाची हकीकत मुंबईच्या टाइम्स पत्रांत कोणी सविस्तर छापविली आहे व अपिल कोर्टानें ठराव केलेल्यांतील मतलब इतका आहे कीं तहशिलदारानीं अपुऱ्या पुराव्यावरून गुन्हा शाबीद केला व त्यांच्या समोर जमादारावर पूर्वीं जे आरोप मागें आले होते ते पुराव्याचे आक्टाचे ५४ वे कलमाप्रमाणें जमेस धरून त्यांनीं शिक्षा दिली परंतु ते आरोप अपिलांतून नाशाबीद झालेले सबब तो पुरावा योग्य नव्हता व तहशिलदार व जमादार यांचा सलुखा दिसला नाहीं सबब त्याच मुकदम्यांत डिपुटी कामिशनरांनीं ठराव लिहिला आहे कीं या पुढें वामनराव जमादार व त्यांची घरमंडळी यांवर कांहीं आरोप तहशिलदारापुढें आल्यास त्यांची चौकशी त्यांनीं करीत जाऊ नये. असा मजकूर आहे. पण हा मजकूर मुकदम्याचे प्रोसिडिंग रूपानें आलेला दिसत नाहीं. व त्याच्या खरेपणाविषयीं आह्मास कांहीं ठाऊक नाहीं ह्मणून या बाबतींत विशेष लिहितां येत नाहीं. आमचे प्रिय बंधू उर्दूअखबारकर्ते यांनीं काल प्रसिद्ध केलें आहे कीं टाइम्समध्यें हा मजकूर येण्याचा हेतु व त्या संबंधी दुसरे कित्येक गुप्त प्रकार आह्मी पुढें लिहू. त्याप्रमाणें ते लवकर लिहितीलच व त्यावरून वाचकांस सर्व कळेल.

---

देवी येऊन डोळ्यावर वडस आलेल्यास उपाय:— गेले आठवड्यांत चांदोळचे देशमुखानीं दोन मुलांचे डोळ्यांवर वडस वाढलेले कोणी बरे करील तर त्यास इनाम दिलें जाईल. अशी जाहिरात प्रसिद्ध केली होती ती वाचून एका उद्योगी माहितगार गृहस्थानें आमच्या एका मित्राचे मार्फत त्यावर उपाय लिहून आह्माकडे पाठविला आहे तो आह्मी प्रसिद्ध करितो.

देवापुढें शंख पुजितात त्याचा फुटका तुकडा गारेच्या खलबत्यांत कूटून त्याचे वस्त्रगाळ चूर्ण करून बाटलींत भरून ठेवावें व शिशाच्या सळईनें सकाळीं ५।६ वेळां व सायंकाळीं ५।६ वेळां डोळ्यांत घालावें. प्रथम कोरडी सळई बुबुळावरून फिरविली ह्मणजे ती ओली होते व ती बाटलींत बुडविली ह्मणजे तिला औषध लागते. तसीच ती सळई मग डोळ्यांत बुबुळावरून फिरवावी. व संध्याकाळीं ताज्या लोण्याचें तूप करून तें थंड झालें ह्मणजे मस्तकाला चोळावें. शंखचूर्णानें डोळ्याला चरका बसतो त्या साठीं मस्तकाला सदईू थंडावा राखणें जरूर आहे.

दुसरें औषध:— उपलसरी ह्मणून वेल आहे तिचीं पानें तसूभर लांब व ३ गव्हा इतकी रुंद असतात व तीं तोडलीं असतां झाडांतून दूध सारखा चीक येतो. व तिच्या मुळीचा अनिरा सारखा वास येतो ती मुळी आदितवारीं ओढोटीच्या वेळीं आणून डाव्या कानास बांधावी व उगाळून डोळ्यांत अंजन करावें ह्मणजे फूल देखील झडतें.

---

## वर्तमानसार.

त्रिचनापल्ली एथे दोन युरोपियनांनीं आपला धर्म सोडून मुसलमान धर्म स्वीकारला

अमीर शेरअली यांचा आप्त सयद अबदुल करीमखान गाजी यानें खोकंद एथें रशियन सरकारा विरुद्ध बंड केलें होतें व काबुलांत जाऊन दोन वर्षे तेथें आश्रा धरिला होता. तो हल्लीं २५ मनुष्यानिशी इंग्लिश मुलखांत आला आहे.

अकयाब एथें ४ थे तारखेस धरणीकंपाचा धचका बसला तो इतका कीं घड्याळें चालू होतीं त्यांची गति बंद झाली व दिवे पालथे पडले.

मुंबईचा भाऊ्या लखमसी पुंसी ज्यानें रेलवे कडील मि. डयुई साहेबावर लाचाचा आरोप आणिला होता त्यावर खोटे प्रतिज्ञेचे निरनिराळे ५ मुकदमे होऊन ते सेशन कमीट झाले आहेत.

दुष्काळ कमिशनाच्या चौकशीचा प्रकार विलायत सरकारानीं मंजूर केला. त्या शिवाय ते आणखी असें सुचवितात कीं उपाशी मरणारे लोक मजूर काम मागण्या साठीं सरकारांत आलेले सशक्त ह्मणून परत लाविले, तसें करण्यास काय विशेष कारण होतें हेंही कमिशनानें लक्ष लावून पाहावें.

भामो एथें किसनाशिंग नावाच्या शिपायानें तेथील पोलिटिकल एजंट मि. कूपर हे आपले खासगी बंगल्यावर गाचीत बसलेले असतां त्यांनां गोळी घालून ठार मारलें. त्याची चौकशी होऊन त्याला फाशीची शिक्षा झाली.

इराणचे शहा देशपर्यटणास निघाले होते ते आगष्टचे ९वे तारखेस आपले राजधानी शहर तेहरान एथें परत येऊन दाखल झाले.

म्हैसुराकडे पीकपाणी उत्तम प्रकारचें आहे. धान्याच्या किमती उतरत चालल्या आहेत. व पाऊस फार चांगला झाला आहे.

जानेवारी ता. एप्रिल या चार महिन्यांत सुएझच्या कालव्यांतून ६२० तारवें गेलीं व आलीं आणि त्याबद्दल कंपनीला ४६४८७८० रुपये मिळाले.

श्रीनगरचा बातमीदार लिहितो कीं काश्मीरकडे दुष्काळ कशा प्रकारचा आहे हें पजाबांत अजून चांगलें ठाऊक नाहीं. शेकडा पंचवीस पासून पन्नासपर्यंत मनुष्यें पश्चिम भागांत मरण पावलीं असा अनमान आहे. कांहीं गावचेगाव बेचिराक झाले आहेत. परगण्याचे परगणे ओस पडल्यासारखे झाले आहेत. ही गोष्ट खरी असेल तर जे लोक जिवंत राहिले आहेत त्यांची तरी योग्य काळजी घेणें इंग्लिश सरकारास अवश्य आहे. काश्मिरांत बाहेरून धान्यच येत नाहीं. तें सरकारानें चहूकडून तेथें पोचविलें पाहिजे.

नेपाळाकडे पाऊस चांगला पडून शेतकी उत्तम स्थितींत आहे.

ले. कर्नल लाच्य यांस नागपुर ( सेंट्रल, प्रांतांत पोलिसचे व जेलचे इन्स्पेक्टर जनरल नेमिलें.

सिमल्यास असें वर्तमान आलें आहे कीं काबुलच्या अमीराचा मुलगा मरण पावला त्या गडबडींत याकुबखानानें प्रतिबंधांत होता तो निसटून गेला.

बरेली एथील जज्जाचा खून करण्याकारितां गोपिनाथ नावाचा मनुष्य यानें प्रयत्न केला होता त्याची चवकशी होऊन त्यास जन्मपर्यंत काळ्यापाण्याची शिक्षा झाली.

नेक नामदार गवरनर जनरल साहेबांचे कायदे कौन्सिलची नुक्तीच सभा भरली होती त्या वेळेस सर आलेक्झांडर आर्बथनाट यांनीं एत्तद्देशीय वर्तमानपत्राच्या कायद्यांत सुधारणा करण्याकारितां सभेपुढें बिल आणलें. त्याचप्रमाणें मि. काकरेल यांनीं स्टयांप व कोर्ट फीचे बिलावरील सिलेक्ट कमेटीचा प्रिलिमिनरी रिपोर्ट सादर केला.

चीन देशांत बुध ज्ञातीच्या उपाध्यायाची स्थापना करण्याचा प्रकार मोठा चमत्कारिक आहे. फुच्यूहेरल्ड पत्राचा एक बातमीदार त्याविषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें लिहितो:—

ज्या लोकांस उपाध्याय करणें असेल त्यांचे बरोबर दोन उपाध्याय असून त्यांस देवळासमोर टेबलें मांडलेली असतात. त्या टेबलांपुढें गुडघे टेकावे लागतात व त्यांचे क्षौर केलेले डोक्यावर एका पात्रांत कापूर वगैरे घालून तो त्याचे सर्व शरीरांत भिनेतोंपर्यंत जळत ठेवावा लागतो व त्यावेळीं इतर उपाध्य कांहीं धर्मसंबंधीं वाक्यें वगैरे वाचतात व हा सर्व समारंभ वीस मिनिटांत खलास होतो. दुसरा प्रकार असा कीं ज्यास स्वत: बुध होण्याची इच्छा असते तो तेथें मांडलेल्या तीन देवतांपुढें उभा राहून आपलें बोट जळूं देतो व सावकास दोन तीन बोटें जळालीं ह्मणजे तो पूर्ण बुध झाला अशी त्या लोकांत समजूत आहे.

एका मराठी वर्तमानपत्रावरून कळतें कीं, शाळाखात्याचे डायरेक्टरांचें मुंबई एथें असलेलें हपीस मोडणार व मुंबई इलाख्यांतील एजुकेशनल इन्स्पेक्टरांस त्या संबंधानें कांहीं विचारपूस करणें. झाल्यास त्या तुकडीचे जे इन्स्पेक्टर असतील त्यांणीं जिल्ह्याच्या कलेक्टरांकडे त्यांनीं संबंध ठेवावा.

खालीं लिहिलेले गृहस्थांस मुंबईचे गव्हर्नरांचे कायदे कौन्सिलचे सभासद नेमल्याविषयीं मुंबई ग्याझेटच्यां ता० ३१ आगष्टच्या जादापत्रकांत प्रसिद्ध झालें आहे:—आनरेबल म्यांकिंटाश बालफोर, आनरेबल सय्यद हसन एलएड्रोस, सी. एस. आय., कर्नल चार्लस जेम्स मेरिमन, सी. एस. आय., मुरारजी गोकुळदास एस्कायर व माधोजीराव जानराव ऊर्फ बापूसाहेब नाईक निंबाळकर.

मुंबई एथील प्रसिद्ध व्यापारी केशवजी नाईक यांनीं गेल्या गणेश चतुर्थीचे सणानिमित्त तेथील दिवाणी तुरुंगांतील २८ कैदीस त्यांच्या कर्जाबद्दल १३०० रुपये सरकारांस भरून बंदींतून सोडविलें असें कळतें.

श्रीमंत महाराज शिंदे सरकार यांनीं काशीस जे धर्मार्थ पैसे वाटले त्यावेळीं तेथें व्यवस्था नीट नसल्यामुळें लोकांची इतकी गर्दी झाली कीं, त्यापैकीं दहा लोक चिरडून मेले व पुष्कळांस वरीच इजा झाली.

फेरोजपुर जिल्ह्यांत सतलज नदीस पूर आल्यामुळें १००' चौरस मैल जमीन पाण्यांत बुडून गेली व त्यामुळें अतिशय नुकसान झालें. ममदोद नांवाच्या जुन्या किल्ल्यांत पुष्कळ पैसा या पुरामुळें सांपडला असें ह्मणतात. ने. ओ.

---

## रशिया, काबुल, व हिंदुस्थानसरकार.

काबूलच्या अमिराचा वडील मुलगा सरदार याकुबखान हा तुरुंगांतून पळून गेल्याची बातमी पुन्हा सिमल्यास आली आहे. तो गिझनीकडे गेला असून तिकडे कांहीं गडबड सुरू झाली असें ह्मणतात. या गोष्टीस कांहीं प्रमाण नसल्यामुळें ती खोटी आहे असें हिंदुस्थान सरकारचें ह्मणणे आहे, पण आतां लवकरच याचा निर्णय होणार आहे. तिकडे रशियाची काय गडबड चालली आहे हें कांहींच समजत नाहीं, अमीर आपली संमती देवो अगर न देवो हिंदुस्थान सरकाराकडून जाणारें वकील मंडळ सक्तीनें आपला कार्यभाग करून घेणार अशी बोलवा आहे; व त्या अनुरोधानें सर्व तयारी झाली आहे व आमचें मंडळ हिरातेकडे चाल करणार असें ह्मणतात. सिविलमिलिटरी ग्याझेटची ही बातमी खरी मानली तर, हिंदुस्थान सरकाराकडून जे लोक काबुलास रवाना होत आहेत ते वकील ह्मणून जात नसून काबुलावर स्वारी करणार ह्मणून जात आहेत असें होतें; अगर स्वारी करण्याच्या ह्मणजे अफगाणिस्थानाशीं लढाई करण्याच्या तयारीनें जात आहेत असें होतें. थोड्या काळापूर्वीं रशियानें युरोपांत जी गडबड चालविली होती तिच्या योगानें आमच्या सरकारास काळजी लागली होतीच व त्या प्रकरणाची शांतता झाली न झाली तोंच आमच्या सरकारास अफगाणिस्थानच्या संबंधाची काळजी लागली हें पाहून व या नव्या काळजीसही रशियाच कारण झाला हे पाहून वाइट वाटतें. बर्लीनचा तह पुरा होण्यापूर्वींच रशियानें आपली एक टोळी काबुलाकडे पाठविली व काबुलच्या अमीराचें मन वळवून रशियन वकिलास आपल्या दरबारांत घेण्याचें अमिराकडून कबूल करविलें ह्मणूनच आमच्या सरकारास हल्लींची स्वारी करण्याचें भाग झालें आहे. एशिया खंड हें एक निबिड अरण्य असून इंग्लंड व रशिया हे दोन गुराखी आपलीं गुरें चारण्याकरितां त्या जंगलांत दोहीकडून दोघे शिरले आहेत व त्यांणी बराच कालपर्यंत यथेच्छ वर्तन केल्यावर ते दोघेही एकमेकांच्या जवळ येऊन पोचले, तेव्हां अर्थातच त्या उभयतांत बोलणें सुरू होऊन एकमेकांच्या ताब्यांत असलेल्या जमिनीवर एकमेकांनीं अतिक्रमण करूं नये असें ठरून त्या उभयतांच्या मतें अफगाणिस्थान ही दोघांच्या दरम्यानचा एक भिंत आहे असें समजून त्या भिंतीस दोघांनीही स्पर्श करूं नये असें ठरलें. हा असा ठराव होणे हें त्या दोघांच्याही हिताचेंच असल्यामुळें तो ठराव झाला हें फार चांगलें झालें होतें व आतां त्या दोघांत तंटा होऊन आह्मा झाडापाडांचें मरण होण्याची भीति नाहीं असें समजून आह्मा सर्वांस आनंद झाला होता, पण तो ठराव फार दिवस कायम न रहातां तो रशियानें मोडला व त्याणें अफगाणिस्थानांत प्रवेश करून आपलें ठाणें स्थापन केलें तेव्हां अर्थातच इंग्लंडासही पुढें सरणें भाग झालें व इंग्लंडच्या आणि आह्मासारख्या झाडापाडांच्या हिताकरतां इंग्लंडानें स्वारी करण्याचा आरंभलेला उद्योग स्तुत्य आहे असेंही ह्मणावें लागतें व त्या करितां त्या कामांत इंग्लंडास यश येवो अशी आह्मी आशाही करतों, पण तें यश मिळविण्यांत वगैरे जे अनेक प्रकार होणार आहेत त्यांतून आमचा बचाव कसा होतो याचा आह्मास मोठी काळजी पडली आहे. आज इंग्लडानें आपलीं गुरें एशियाच्या या भागांत चारणीस सोडलीं असून तीं आमच्यावरील पाला वगैरे खात आहेतच व उद्यां इंग्लंडचा पाडाव करून रशिया शिरजोर झाला तरी त्याचीं गुरेंही आमच्या वरील पाला वगैरे खातीलच तेव्हां इंग्लंड जेर होऊन रशिया शिरजोर होण्यांत आमची कांहीं फायदा नसून चुराडा होणार असल्यामुळें ही लढाईच्या तयारीची स्वारी पाहून आह्मास फार भय वाटूं लागलें आहे. आतां ही मंडळी काबुलांत जाऊन पोचल्यावर या गोष्टीचा काय तो निर्णय होणार आहे अमीरानें इंग्रज सरकारचें ह्मणणें कबूल केलें तर सर्व ठीक झालेंच. पण त्याणें नाकबूल केल्यास मात्र लढाईचा प्रसंग येऊन त्याचा खर्च वगैरेचे अनेक बोजे आमच्यावर लादले जाणार आहेत. आतां अमिरावर हा प्रसंग फार चमत्कारिक आला आहे हें खरें व त्याचा रशियाशीं कांहीं करार मदार झाला असेल तर त्याच्या विरुद्ध वागणें अमिरास मोठें कठीण ही पडेल, पण आह्मास वाटतें कीं, त्याणें इंग्लंडाशीं लटकून रहावें हें चांगलें आहे. लटकून राहिल्यानेच आमचें हित असल्यामुळें ईश्वरानें अमिरास तशी बुद्धी द्यावी अशी आह्मी त्याची प्रार्थना करितों.

अ. द.

---

## नोटिसा.

लक्ष्मण वल्लद संभू ताले वस्ती शाहापुर प्रगणे बाळापुर तालुके खामगाव यास कवसाल मर्द लक्ष्मण पाटील रहाणार मौजे चतारी प्रगणे बाळापुर तालुके मजकुर इजकडून नोटिस देण्यांत येते कीं मला ऋतु प्राप्त होऊन अजमाससात आठ वर्षें झालीं असून अद्यापपावेतो तुह्मी मला आपले घरीं नेले नाहीं व तुह्मी फरारी होऊन कोठे गेले याचा शोध नाहीं तुमचा धाकटा भाऊ ह्मणजे माझा दार नामें जाणू वल्लद संभूजी हा मौजे शहापुरात कोणाचे घरीं नोकरीस आहे आणि तुमचा शोध तुमचे भावास असेल यामुळें मी आपणास नोटिसीनें कळवितें कीं मला तारीख १५ सप्तंबर सन १८७८ इसवीपासून ता. ३० सप्तंबर या १५ दिवसांत तुह्मी मला घेऊन जाणें. नाहीं पेक्षां मी दुसरा नवरा करीन आणि आज सात आठ वर्षें झालीं तर मी आपले भावाचे घरीं गणुजी ढोरे याचे कर्जाऊ रुपये घेऊन गुजराण केली याचे ४०० रुपये आपण घेऊन येऊन मला सदरी मुदतींत तुह्मी घेऊन जाणे. वरील मुदतींत आपण न आल्यास मी इच्छिला नवरा करीन व मग तुमचा लग्नाचा हक्क संबंध कांहींच राहिला नाहीं अगाऊ आपणास नोटिस दिली आहे. जबाब याचा न आल्यास कायदेशीर रीतीनें दुसरा नवरा करीन कळावे तारीख १२ सप्तंबर सन १८७८ इसवी.

( सही ) कवसाल मर्द लक्ष्मण
निशाणी हातची बांगडी

---

नोटिस.

निळोबा वल्लद मुरारबुवा मानभाव मुक्काम मेहेकर ता. मजकूर यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यास सुमार पधरा वर्षें झालें तितक्या काळांत तुह्मी मला जनरीतीप्रमाणें प्रापंच्यादि सुखाचा उत्तम प्रतीचा उपभोग दिला परंतु अलीकडेस माझे बापाचें व बंधुचें ( ऊर्जित असलेमुळे ) द्वेष करून जाती संबधी त्यांचेवर आरोप आणतात त्या लोकांच्या सल्लेत तुह्मी सामील होऊन माझे आई बापाच्यानें न पाहण्या सारख्या छळणा [ बापाचा व बंधुचा ] उपमर्द चौघांत करता व त्याकारितां नेहमी मला पुष्कळ मारहाण करून छळणूक करिता असतांही उभय कुळाच्या लौकिकारितां मी पुष्कळ सहन केलें परंतु तुमचे कृतीची दिवस दिवस चढती कळा असल्या मुळें माझे फार हाल होतात तुह्मी मला छळून ता० ८।९।७८ इसवी रोजी जो मार दिला त्यामुळें मी फार श्रम पावलें व मारल्याने ( लाकडाचे ) वळ माझे अंगावर जे आले ते मी मेहेकर एथील सभ्य लोकांस दाखविले. त्या दिवशीं तर माझे प्राणोत्क्रमण व्हावें परंतु आयुष्यमर्यादेमुळें मी वाचलें याकारितां मी तुह्माला कळवितें कीं, नांदावेंणे असल्यास मला खात्री लायक तिऱ्हाईत द्यावा. तसें न होईल तर खावटी बद्दल नोटिसीचे तारखेपासून मुलाबाळा सुद्धा रुपये दरमहा १० दहा पावते करीत जावे दोहींतून एकही न पत्कराल तर मला जें कायदा प्रमाणें वाटेल तें करीन मग लग्न संबधीं तुमचा हक्क मजवर कोणत्या प्रकारें रहाणार नाहीं व तुमचे कांहीं ह्मणणें असल तर नोटिशीनें कळवावें असें. करण्यास चुकूं नये. कळावे तारीख १० माहे सप्तंबर सन १८७८ इसवी.

( सही ) बायजी मर्द निळोबा मानभाव
रहाणार मेहेकर इचे हातचा
निशाणी बांगडी
खुद्द असे.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापुन प्रसिद्ध केलें.

व आज मलकापुराकडे जाऊन एक दोन दिवसांत पुन्हा परत येणार आहे.

---

उमरावतीस व अकोल्यास युरोपियन लोकांचा व्हालंटियर पलटण भरण्याचा बेत आहे. शुक्रवारी एथें त्यांची तयारी होणार होती ती कांहीं कारणानें राहिली. एक दोन दिवसांत होणार आहे.

---

निजाम सरकारच्या रेलवेचें गेल्या सालचें उत्पन्न ८३०७६८ रुपये झालें. व खर्च ६४४०८० रुपये लागला. म्हणजे या रेलवेला या सालाला १८६६८८ रुपये नफा झाला. ही रेलवे तयार होण्याला एकंदर ११९०१३८९ रुपये खर्च लागला होता त्या मानानें शेकडा दीड रुपयाहून थोडा अधिक नफा झाला असें दिसतें. गुदस्त सालच्या दुष्काळामुळें जें पुष्कळ धान्य निजाम सरकारच्या मुलखांत गेले तेणेंकरून हा नफा झाला. रेसिडेंट साहेब रिपोर्टांत लिहितात कीं, एवढा फायदा पुढें कोणत्या सालीं या रेलवेस होण्याला बराच काल पाहिजे. जी. आय. पी रेलवेनें या रेलवेवर काम केलें तिला उत्पन्नांतून शेकडा ६२ रुपये स्टेट रेलवेनें दिलें.

---

या आठवड्यांत हवा कित्येक दिवस साभ्र राहून एक दोन दिवस पावसाचे तुषारेंही आले व नदीसही थोडें अधिक पाणी आलें होतें. कधीं उकाडा मनस्वी होतो व कधीं चांगली थंड हवा असते असें हवेचें मान चमत्कारीक झालें आहे व तींत रोगबीजही बरेंच आहे. महामारीचा आजार २।३ दिवसांत तिसऱ्यानें पुन्हा उद्भवला आहे. तो तुरळक आहे पण दुसरेही आजार आणखी पुरवण्यास आले आहेत. मनुष्यास सूज येते. म्हणजे एकदम पाय सुजतात किंवा डोक्याकडून सूज येते. तापाचाही आजार आहे, ठकणा आहे व आमांश आहे अशी हवेंत चलबिचल झाल्यानें लोकस्थिति उद्विग्न झाली आहे. कलकत्या पर्यंतही असे आजारांची थजल गेल्याविषयीं कळतें. तें असें.

कलकत्ता एथें डेंगू फीवर (गुढघेमोडी) सारख्या दुसऱ्या एक दोन आजारांची साथ आली आहे. पहिला प्रकार हा कीं, मनुष्य सकाळीं निजून उठल्याबरोबर त्याचे पाय सुजलेले असतात व ती सूज हळूहळू कंबरेपर्यंत वाढत जाते, व दुसरा असा कीं, मनुष्याच्या सर्व अंगास व सांध्यांस ठणका लागतो; अन्नपचन बरोबर होत नाहीं; तोंडास रुची नसते व भूकही लागत नाहीं. हा आजार बरेच दिवस असतो व यावर औषधोपचारही चालत नाहीं.

---

कमिशनर साहेबांची स्वारी अजून आली नाहीं.

---

एथील मिडलक्लास स्कुलाचे हेडमास्तर रा. रा. पांडुरंग दामोदर हे वारंवार रजा वाढवू लागल्यानें शाळेच्या सुस्थिती करितां डायरेक्टर साहेबांनीं रा. रा. गोविंद नारायण चिकाटे यांस त्यांचे जागेवर निमे पगारावर तूर्त नेमिलें आहे. हे गृहस्थ वऱ्हाडांत शिकले असून म्याट्रिक्युलेशन पास झाले आहेत.

---

खामगाव व उमरावती स्टेट रेलवेच्या गुदस्त सालच्या उत्पन्नांची माहिती पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. खामगाव रेलवेला १९५१७ रुपये नफा झाला. या रेलवेला भांडवल ४८५०५४ रुपये लागलें आहे त्यावर शेकडा ४ रुपये मिळाले. तिगस्त सालीं दोन रुपये शेकडा नफा झाला होता. व त्या वर्षीं पावसाळ्यांत गाडी बंद होती व सन १८७७ सालीं चालू होती म्हणून इतकें अंतर पडलें. उमरावती रेलवेला गुदस्त सालीं ५२७०९ रुपये नफा झाला, तिचें भांडवल रुपये ४३७२७८ रु० आहे. त्या मानानें शेकडा १२ रुपये नफा झाला. सन १८७६ सालीं शेकडा साडेचार रुपयांहून किंचित अधिक झाला होता. तिगस्ता पासून पावसाळ्यांत ही रेलवे बंद केली नव्हती व खर्च भागला पाहिजे म्हणून मालावर मणास तीन पै अधिक आकार घेत होते तो आतां कमी करण्याचा विचार झाला आहे. परंतु जी आय पी कंपनीला तो विचार अनुकूळ वाटला नाहीं व तिनें सरकारावरच ती गोष्ट सोपली म्हणजे सरकार आतां आपले वहिवाटींत सर्व स्टेट रेलवे घेणार आहे तेव्हां त्यांनीं काय पाहिजे तें करावें असें कंपनीनें म्हटलें.

---

११वे तारखेस अकोल्याच्या म्युनीसिप्यालिटीची जनरल सभा भरली होती त्या वेळीं मि. फ्लेमिंग साहेब, हार्वे साहेबाचे क्लार्क, व बहुतेक व्यापारी लोक कमिटीपुढें आले होते. कापसाचें मार्केट आहे याच ठिकाणीं रहावें असें सर्वांचें म्हणणें पडल्यावरून तीच जागा मुक्रर केली व तिचे उत्तरेस मोची लोकांची झोपडी होती ती जागा रिकामी करवून फ्लेमिंग साहेबाचे कारखान्यास द्यावी असें ठरलें. जागा ६०० फूट लांब व ४०० फूट रुंद आंतील विहिरीसुद्धां १५० रुपये दरसाल भाडें घेऊन वीस वर्षांचे करारानें द्यावी असें ठरलें. व हार्वे साहेब या जागेच्या शेजारी आपले कारखान्यास जागा मागतील तर याच नियमानें द्यावी असें ठरलें. स्टेशन व गाव यांचे दरम्यान ही जागा असून हे दोन कारखाने एथें राहून आणखी हो एक दोन कारखाने कोणी आणिल्यास त्यांस पुरेसी आहे. व जागा मोठी सोईची आहे. व या ठिकाणास व येणेंकरून अकोल्यास आतां मोठी शोभा येणार आहे व हे कारखानें चांगले चालल्यास एथील व्यापारासही चांगली तेजी येणार आहे. आतां लवकरच सदरील उभयतां कारखानदारांच्या इमारतींचीं कामें सुरू होतील. हार्वे आणि सभापति यांची तर यंत्रेंही एथें येऊन दाखल झालीं आहेत. हा व्यापार सुरू झाला म्हणजे एथें ब्यांकिचीही एक शाखा स्थापन होण्याची जरूरी पडेल व त्या प्रमाणें तीही येईल. असें आम्हांस वाटतें.

---

मूर्तिजापुरचे रा. रा. वामनराव गोविंद जमादार यांजवर कुकाजी यांस त्यांनीं मारल्याबद्दल फौजदारी मुकदमा तेथील तहशिलदारापुढें होऊन त्यांनीं त्यांस १५ दिवसांची सक्त मजुरीची शिक्षा दिली होती तिजवर उमरावतीचे डिपुटी कमिशनर कर्नल मॅनिस साहेब यांजपुढें अपिल होऊन शिक्षा रद्द झाली या संबंधाची हकीकत मुंबईच्या टाइम्स पत्रांत कोणी सविस्तर छापविली आहे व अपिल कोर्टानें ठराव केलेल्यांतील मतलब इतका आहे कीं तहशिलदारानीं अपुऱ्या पुराव्यावरून गुन्हा शाबीद केला व त्यांच्या समोर जमादारावर पूर्वीं जे आरोप मागें आले होते ते पुराव्याचे आक्टाचे ५४ वे कलमाप्रमाणें जमेस धरून त्यांनीं शिक्षा दिली परंतु ते आरोप अपिलांतून नाशाबीद झालेले सबब तो पुरावा योग्य नव्हता व तहशिलदार व जमादार यांचा सलुखा दिसला नाहीं सबब त्याच मुकदम्यांत डिपुटी कमिशनरानीं ठराव लिहिला आहे कीं या पुढें वामनराव जमादार व त्यांची घरमंडळी यांवर कांहीं आरोप तहशिलदारापुढें आल्यास त्यांची चौकशी त्यांनीं करीत जाऊ नये. असा मजकूर आहे. पण हा मजकूर मुकदम्याचे प्रोसिडिंग रूपानें आलेला दिसत नाहीं. व त्याच्या खरेपणाविषयीं आम्हास कांहीं ठाऊक नाहीं म्हणून या बाबदींत विशेष लिहितां येत नाहीं. आमचे प्रिय बंधू उर्दूअखबारकर्ते यांनीं काल प्रसिद्ध केलें आहे कीं टाइम्समध्यें हा मजकूर येण्याचा हेतु व त्या संबंधी दुसरे कित्येक गुप्त प्रकार आम्ही पुढें लिहू. त्याप्रमाणें ते लवकर लिहितीलच व त्यावरून वाचकास सर्व कळेल.

---

देवी येऊन डोळ्यावर वडस आलेल्यास उपाय:— गेले आठवड्यांत चांदोळचे देशमुखानीं दोन मुलांचे डोळ्यांवर वडस वाढलेले कोणी बरे करील तर त्यास इनाम दिलें जाईल. अशी जाहिरात प्रसिद्ध केली होती ती वाचून एका उद्योगी माहितगार गृहस्थानें आमच्या एका मित्राचे मार्फत त्यावर उपाय लिहून आम्हाकडे पाठविला आहे तो आम्ही प्रसिद्ध करितों.

देवापुढें शंख पुजितात त्याचा फुटका तुकडा गारेच्या खलबत्यांत कुटून त्याचे वस्त्रगाळ चूर्ण करून बाटलींत भरून ठेवावें व शिशाच्या सळईनें सकाळीं ५।६ वेळां व सायकाळीं ५।६ वेळां डोळ्यांत घालावें. प्रथम कोरडी सळई बुबुळावरून फिरविली म्हणजे ती ओली होते व ती बाटलींत बुडविली म्हणजे तिला औषध लागते. तसीच ती सळई मग डोळ्यांत बुबुळावरून फिरवावी. व संध्याकाळीं ताज्या लोण्याचें तूप करून तें थंड झालें म्हणजे मस्तकाला चोळावें. शंखचूर्णानें डोळ्याला चरका बसतो त्या साठीं मस्तकाला सदहू थंडावा राखणें जरूर आहे.

दुसरें औषध:— उपलसरी म्हणून वेल आहे तिचीं पानें तसूभर लांब व ३ गव्हा इतकी रुंद असतात व तीं तोडलीं असतां झाडांतून रुई सारखा चीक येतो. व तिच्या मुळीचा अनिरा सारखा वास येतो ती मुळी आदितवारीं ओंकोटीच्या वेळीं आणून डाव्या कानास बांधावी व उगाळून डोळ्यांत अंजन करावें म्हणजे फूल देखील झडतें.

---

## वर्तमानसार.

त्रिचनापल्ली एथे दोन युरोपियनांनीं आपला धर्म सोडून मुसलमान धर्म स्वीकारला

अमीर शेरअली यांचा आप्त सयद अबदुल करीमखान गाजी यानें खोकंद एथें रशियन सरकारा विरुद्ध बंड केलें होतें व काबुलांत जाऊन दोन वर्षे तेथें आश्रा घेतला होता. तो हल्लीं २९ मनुष्यांनिशी इंग्लिश मुलखांत आला आहे.

अकयाब एथें ४ थे तारखेस धरणीकंपाचा धचका बसला तो इतका कीं घड्याळें चालू होतीं त्यांची गाति बंद झाली व दिवे पालथे पडले.

मुंबईचा भाट्या लखमसी पुंसी ज्यानें रेलवे कडील मि. ड्युई साहेबावर लांचाचा आरोप आणिला होता त्यावर खोटे प्रतिज्ञेचे निरनिराळे ५ मुकदमे होऊन ते सेशन कमीट झाले आहेत.

दुष्काळ कमिशनाच्या चौकशीचा प्रकार विलायत सरकारानीं मंजूर केला. त्या शिवाय ते आणखी असें सुचवितात कीं उपाशी मरणारे लोक मजूर काम मागण्या साठीं सरकारांत आलेले सशक्त म्हणून परत लाविले, तसें करण्यास काय विशेष कारण होतें हेंही कमिशनानें लक्ष लावून पाहावें.

भामो एथें किसनाडींग नावाच्या शिपायानें तेथील पोलिटिकल एजंट मि. कूपर हे आपले खासगी बंगल्यावर नाचीत बसलेले असतां त्यांनां गोळी घालून ठार मारलें. त्याची चौकशी होऊन त्याला फाशीची शिक्षा झाली.

इराणचे शहा देशपर्यटणास निघाले होते ते आगष्टचे ९वे तारखेस आपले राजधानी शहर तेहरान एथें परत येऊन दाखल झाले.

म्हैसुराकडे पीकपाणी उत्तम प्रकारचें आहे. धान्याच्या किमती उतरत चालल्या आहेत. व पाऊस फार चांगला झाला आहे.

जानेवारी ता. एप्रिल या चार महिन्यांत सुएझच्या काल्व्यांतून ६२० तारवें गेलीं व आलीं आणि त्याबद्दल कंपनीला ४६४८७८० रुपये मिळाले.

श्रीनगरचा बातमीदार लिहितो कीं काश्मीरकडे दुष्काळ कसा प्रकारचा आहे हें पजाबांत अजून चांगलें ठाऊक नाहीं. शेकडा पंचवीस पासून पन्नासपर्यंत मनुष्यें पश्चिम भागांत मरण पावली असा अनमास आहे. कांहीं गावचेंगाव बेचिराक झाले आहेत. परगण्याचे परगणे ओस पडल्यासारखे झाले आहेत. ही गोष्ट खरी असेल तर जे लोक जिवंत राहिले आहेत त्यांची तरी योग्य काळजी घेणें इंग्लिश सरकारास अवश्य आहे. काश्मिरांत बाहेरून धान्यच येत नाहीं. तें सरकारानें चहूकडून तेथें पोचविलें पाहिजे.

नेपाळाकडे पाऊस चांगला पडून शेतकी उत्तम स्थितींत आहे.

ले. कर्नल लाच्य यांस नागपुर (सेंट्रल, प्रांतांत पोलिसचे व जेलचे इन्स्पेक्टर जनरल नेमिलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० २२ माहे सप्तंबर सन १८७८ इसवी. अंक ३८

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ८६ |
| महामारीवरील गोळी | ८१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ८६ |
| वैद्यप्रकाश. | २८८ |
| नादारीचे नियम. | ८८ |

सदर्हू किमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

## जाहिरात.
## कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांतकौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तिपूर्वभाग इतके संपूर्ण झाले. पुढील प्रकरणें चालू असून क्रियापदांचा आरंभ केला आहे. शिवाय दोनशे शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया. टपालखर्च एक आणा. पण एक वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाठविल्यास टपाल खर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मास 'पोष्टपेड' पत्रीं कळवावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८ } रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कौमुदीमहोत्साह कर्ते.

## दिवाणी कामाच्या वहिवाटीच्या जाहिराती.

नव्या दिवाणी कायद्याच्या आधारें कामाच्या वहिवाटीकरितां जाहिराती अलिशान रेसिडेंट साहेबांनीं प्रसिद्ध केल्या त्यांचें खरें मराठी भाषांतर मे. जुडिशियल कमिशनर साहेबांच्या आफिसांत तयार झालेलें सर्व कोर्टांच्या उपयोगाकरितां छापत आहे त्यावरून विक्रीसाठीं कांहीं प्रति आह्मी तयार करीत आहों त्या लवकरच छापून निघतील व सहा आणे किमतीस दिल्या जातील. सर्वांस कळावें ता. १४ सप्तंबर सन १८७८ इसवी.

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## विक्रीस तयार
### महामारीवर नवीन पुस्तक

मिरजेचे दवाखान्यावरील मेडिकल आफिसर डा. त्रिंबक सखाराम सिरवलकर यानीं जाहिरात दिल्याप्रमाणें महामारी, तिचीं कारणें, निवारण व उपाय याजवर पुस्तक छापलेलें आह्माकडे विक्रीस आलें आहे. त्याची किंमत सहा आणे व बाहेर गावीं डाक हशील अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.
### उपयुक्त ज्ञानसार

आह्मी गेल्या जानेवारीपासून "उपयुक्त ज्ञानसार" नावाचें मासिक पुस्तक काढून, त्यांत शेतकी, कारागिरी आणि इंजिनियरिंग ह्या तीन प्रकरणांची माहिती लिहित आहों. पहिल्या विषयांत भूमिपरीक्षा, खतांचे गुणधर्म व यांचा उपयोग. पिकांचे मान आणि वनस्पतीपासून व्यापारोपयोगी पदार्थ, स्वदेशांतील व परदेशांतील कारागिरी विद्या, व शिल्पसंबंधीं आणि इंजनेरचे कामाची वेंचक माहिती देत असतों. पुस्तकाची आगाऊ किंमत घेण्याचें सुरू केल्यापासून एक महिन्याचे आंत ५ रुपये व बाहेरचे लोकांत पोस्टेज सहा आणे पडेल. हें पुस्तक संग्रह करण्या माफक आहे.

नवीन पुस्तकें तयार आहेत तीं,— साहित्यमालिका १–२, सार्थपांडवगीता ८ आणे, सार्थगणेशगीता ३ रुपये, सार्थ सप्तशति रेशमी ३८८, सार्थ सत्यविनायक पूजाकथासहित ८११; या पुस्तकांबद्दल पत्रव्यवहार ठेवणें तो पुणें एथें ज्ञानचक्षूंत, ज्ञानप्रकाशांत मुंबई एथें इंदुप्रकाशांत आणि वऱ्हाडांत अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत ठेवावा.

पुणें हसबनिसांचा वाडा घर नंबर ३३४
काशिनाथ महादेव थत्ते.

## जाहिरात.

वऱ्हाडाकरितां नवीन दिवाणी कायद्यांत वहिवाटीच्या संबंधानें आ. रेसिडेंट साहेबांनीं केलेल्या नियमांचें भाषांतर.

नवीन दिवाणी कायद्यांतील ज्या कलमांत कांहीं वहिवाटीचे वगैरे संबंधानें स्थानिक सरकारानें नियम करावे ह्मणून हवाला दिला आहे त्या संबंधानें अलीशान रेसिडेंट साहेबांनीं नियम करून तारीख १९ माहे आगष्ट सन १८७८ च्या रेसिडेन्सी आर्डर' मध्यें छापून प्रसिद्ध केले आहेत. त्याचप्रमाणें नवीन कायद्यांत वऱ्हाडच्या संबंधानें झालेला फेरफार ता० १८ माहे जुलै १८७८ च्या "रेसिडेन्सी आर्डर" मध्यें आला आहे. या सर्वांचें भाषांतर करून आह्मी छापण्यास सुरवात केली आहे. वकील मुकत्यार व इतर दुसऱ्या लोकांस ह्या पासून फार उपयोग होणार आहे ह्याचीं पृष्ठें सुमारें २० होतील. याची किंमत आठ आणे दर प्रतीस व बाहेर गावचे लोकांस या खेरीज टपाल हशील पडेल. प्रती सध्या थोड्या काढल्या आहेत ह्मणून ज्यांस घेणें असेल त्यांनीं लवकर घ्याव्या. प्रति आठ दिवसांत तयार होतील.

म्यानेजर

ता. २ सप्तंबर १८७८ इसवी. } प्र. सि. छा.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. यांस

कृतानेक नमस्कार वि. वि. लिहावयास कारण कीं. कैलासवासी वामनराव बाळाजी ओझरकर ह्या लोकप्रिय, परोपकारी, व स्नेहाकरितां जिवापलीकडे झटणाऱ्या गृहस्थाविषयीं वऱ्हाडांतील व इतर प्रांतांतील बऱ्याच लोकांनां माहिती आहे. ह्या सभ्य गृहस्थाच्या अल्पवयांतील अकालिक मरणाचें दुःखकारक वर्तमान ऐकून त्यांच्या मित्रमंडळीच्या अंतःकरणावर जोबखप्राय घाला पडला. त्यापासून आमच्या मित्रांचीं अंतःकरणें अद्याप परावृत्त झालीं नसतील ! ! ! लहानापासून तों थोरांपर्यंत ह्या गृहस्थांचें सारखें प्रेमयुक्त वर्तन, गरीब अनाथ लोकांनां आश्रय देण्याविषयीं त्यांची सद्वासना व सदोदीत शांत आणि संतोष वृत्ति हीं त्यांच्या मित्रमंडळीच्या नेत्रापुढें अद्याप मूर्तिमंत उभीं रहात असतील; व त्या त्या प्रसंगीं त्याच्या नेत्रावाटे अश्रुपात ढळल्या वांचून रहात नसतील यांत संशय नाहीं. अस्तु, हा दुःखविलापाचा विस्तार जितका करावा तितका थोडाच. ह्याकरितां तो एकीकडेस ठेवून आजच्या ह्या पत्राचें उद्दिष्टकार्य आपणास कळवितो. ह्या सद्गुहस्थांच्या चिरकालिक स्मरणाकरितां व त्यांच्या आपल्यावरील अ... व निष्कपट प्रेमाची कृतज्ञतापूर्वक ... करण्याकरितां अकोल्यास मित्रमंडळ... कांहीं पैसा जमविण्याचा विचार केला. ... संबंधानें झालेल्या एथील सभेची हकीकत उर्दूअखबार पत्राच्या तारीख ४ माहे मेच्या अंकांत सावंत प्रसिद्ध झाली आहे. तरी, आपणास विनंती करीतों कीं. आपण कृपा करून सदर्हू सत्कृत्याकरितां स्वतां व आपले मित्राकडून उदार आश्रय द्यावा सर्वांच्या सहाय्यानें हें कृत्य सिद्धीस जाणार आहे ह्याकरितां प्रत्येकानें या कामीं झटून आपलें प्रेम प्रगट करावें हें आपलें कर्तव्य होय. पैसा पाठविणें तो खालील पत्यावर पाठवावा. सुज्ञास अधिक लिहिणें नको. लोभ करावा हो विनंति.

भाउराव यादव जोशी
या फंडाचे सेक्रेटरी.

### श्रद्धाजाड्य

वि. वि. जेथें शास्त्रानें विशेष नियम सांगितले आहेत तेथें डोळेझांक, व जेथें पुष्कळ मोकळीक असेल तेथें कल्पित नियमांची दाटी, हा गोंधळ काय? विवाहास गोत्र, प्रवर, नक्षत्र, नाडीकूट वगैरे १८ तरी गुण; रजस्वला माता नसणें, दिवसास मुहूर्त इत्यादि बहुत नडी असतां केवळ द्रव्यावर नजर देऊन माता रजस्वला असतां सख्या बंधू बंधूचीं किंवा तशा बहिणी बहिणींचीं लग्नें, अथवा मुंजी गोरज किंवा एका मुहूर्तावर प्रशस्तपणीं होतात, आणि गणपति दोन प्रहरीं पुजून संध्याकाळीं किंवा दुसरे दिवशीं प्रातःकाळीं पोंचाविण्याचा असें असून त्यास पोंचाविण्यास तिथि, वार, नक्षत्र, उत्तम असून व व्यतिपात, भद्रा, विषमदिवस नसून प्रयाणमुहूर्त (घबाड) चंद्र, राहू अनुकूळ, निष्पंचक लग्न इत्यादि असलीं पाहिजेत, ह्या नडी कोठून आल्या ? या गणपतीला जाण्यास जर मुहूर्त पाहिजे तर अष्टमीचा कृष्ण, पंचमीचा नागोबा, तृतीया हरितालिकेच्या बाया, पंचमीचे बाबा यांस कां मुहूर्त नको!

अनंत सापडला ह्मणजे व्रत घ्यावें, व तें घेतलेंच पाहिजे. हा जुलूम कोठला ? जशीं इतर व्रतें तसेंच हें अनंतव्रत. कोणी तरी रस्त्यानें जात असतां धोतरांतून अनंताची वृष्टि केली तर मग पुढें अनंत व्रताची रेलचेल ! हें कसें लक्षांत येत नाहीं ? एकदां 'चाल, चाल' ह्मणून जो चालीनें बोभाटा केला, त्याबरोबर सर्व शा

र्से भिऊन कोपऱ्यांत नसलीं. हें सर्व माझें मत खरें असल्यास आपण व इतर विद्वान् स्वमत प्रदर्शन करून गरीब लोकांस खऱ्या मार्गास लावितील. अशा गोष्टी आणखी पुष्कळ आहेत, परंतु विस्तारभयानें थोडें निवेदिलें, हे विनंती.—मुकाम वेंगुर्ले, ता. ७ सेप्तंबर १८७८ इसवी.

बाळकृष्ण भट्ट ठळवे.

---


## वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ११ शके १८००


---

## सुरतेचा फौजदारी मुकद्दमा.

सुरतेचे नामांकित वकील रा. रा. गुलाबदास, व दोन वर्तमानपत्रकर्ते रा. मंचाराम व किकाभाई व आणखी तीन गृहस्थ यांजवर दंग्यास उत्तेजन दिल्याचा मोठा मुकद्दमा स्पेशल नेमलेले जाइंट जडज मि० पोलन साहेब यांपुढें सुमार महिनाभर चालला आहे. याची आरंभीची हकीकत आह्मी आपले वाचकांस कळविली आहेच. त्यापुढें २३ दिवस सरकार तर्फेच्या जबान्यांचें काम चाललें. त्यांत सुमार ७६ असामीच्या साक्षी झाल्या. कित्येक साक्षीदारांनीं स्पष्ट सांगितलें कीं, पोलिसाचे जुलमामुळें आह्मी माजिस्त्रेटापुढें आरोपीविरुद्ध साक्षी दिल्या. वेळोवेळ जामिनावर आरोपीस खुलें करण्याविषयीं त्यांच्या बारिष्टरांनीं अर्ज केले होते. पण प्रथम त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मध्यंतरी खालच्या नंबरचे दोन गृहस्थांस जामिनावर खुले केलें. पुढें कांहीं दिवसांनीं गुलाबदास यांस त्यांच्या तर्फेच्या मनुष्यांशीं दररोज दोन तास सकाळीं तुरुंगावर जाऊन बोलण्याची परवानगी दिली. व हल्लीं सर्वांस जामीनावर खुलें केलें आहे. कित्येक साक्षीदारांच्या जबान्या व मोतीलाल पोलिस इन्स्पेक्टर यांची जबानी व आरोपीचे बारिस्टरांनीं त्यांची केलेली छळणा वाचण्या जोगीं आहे. पण तें सर्व प्रकरण दोन तीनशें पृष्ठांचा ग्रंथ होईल एवढें मोठें झालें आहे सबब आमच्या या छोट्या वर्तमानपत्रांतून तें वाचण्याचा लाभ वाचकांस होणें दुर्घट; त्यास निरुपाय आहे. सरकार तर्फेच्या सर्व साक्षी झाल्यावर प्रत्येक आरोपिताच्या जबान्या झाल्या. त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं अपराधयुक्त असें या मुकद्दम्या पैकीं कांहींच कृत्य आह्मांकडून झालें नाहीं. कित्येक लोकांची अदावत, पोलिसाचा जुलूम, व आफिसर लोकांनी आह्मास बरें न पहाणें याजमुळें हें सर्व प्रकरण तर्कटी उत्पन्न झालेलें आहे. व याजविषयीं आमचे बारिस्टर सविस्तर कळवितील. नंतर आरोपीचे नामांकित बारिस्टर मि. जोल साहेब यांनीं सबंद दोन दिवस उत्तम भाषण करून डिफेन्स दिला. दुसरे पार्शी बारिस्टर मि. फिरोज शहा यांनीं सरकार परवानगीनें आपलें भाषण पुढें प्रसंगानुसार करण्यासाठीं तकुब ठेविलें, नंतर सरकार तर्फे बारिस्टरचें भाषण सुरू झालें व तेंही दोन दिवस चाललें. पण अजून पहाण्यास मिळालें नाहीं. हें झाल्यावर आपले साक्षीदार घ्यावे ह्मणून आरोपींनीं सुमार २५० साक्षीदारांचीं नावें लिहून दिलीं आहेत पण तितक्यांच्या साक्षी होण्याचें कारण पडेल असें दिसत नाहीं. मध्यंतरींच सरकारी पुरावा संपल्यावर खालच्या नंबरच्या दोन आरोपीवर कांहीं पुरावा नाहीं सबब त्यांस सोडून द्यावें असें त्यांचे बारिस्टरानीं सेशन जडजास कळविलें होतें पण एक दोन मुद्यांचा खुलासा झाल्यावर पाहू असें ते ह्मणाले व त्या नंतर सर्व आरोपी जामीनावर खुले झाले आहेत याप्रमाणे इतक्या मजलेवर हें प्रकरण आलें व एकंदरींत रंग बरा दिसतो मग पुढें काय होतें तें पहावें.

हा एवढा मोठा खटला बारिष्टरमार्फत पुष्कळ दिवस चालविल्यानें हजारो रुपये खर्च होऊन आरोपींनीं त्यासाठीं आपलीं भांडीं कुंडीं, डागडागिने व हरयेक चीज वस्त विकली व ते कफल्लक होऊन गेले. त्यांजवळ आतां बारिष्टर लोकास देण्यास कांहीं राहिलें नाहीं इतके ते दीन होऊन गेले आहेत व त्यांसाठीं वर्गणीच्या यादी चालू झाल्या आहेत असें कळतें व त्यासाठीं आह्मांस अतिशय दुःख वाटतें. जर खरोखरी हा मुकद्दमा तर्कटी असला तर दुष्ट लोकांनीं ही त्यांवर केवळ आग पाखडली असें ह्मटलें पाहिजे. परमेश्वर कृपा करो व कसोटीस लागलेलें सत्य उजेडांत येवो व दुर्जनांचे दांत पडून इतर लोकांस हें बोध घेण्यास व सावध रहाण्यास उदाहरण होवो.

सदरील मजकूर लिहून पुरा झाल्यावर शुक्रवारचा टाइम्स आमचे पहाण्यांत आला त्यावरून समजतें कीं, आरोपी तर्फेचे कित्येक साक्षिदार होऊन त्यांत त्यांनीं दंग्याकरितां सभा भरविल्या भाषणें केलीं, व उत्तेजन दिलें वगैरे सरकार तर्फेच्या पुराव्यास सर्वथैव दूषण आणिलें व असेसरचे अभिप्रायही सर्व आरोपी निर्दोष असें पडले. जडज साहेब आपला ठराव शनिवारीं सांगणार होते. त्याप्रमाणें त्यांनीं काल सांगितला असेल व सर्व आरोपी मुक्त झाले असतील असें वाटतें.

---

## लोकास्थिति कशी सुधरेल?

हल्लीं आपले देशाची स्थिति अशी चमत्कारीक झाली आहे कीं, ती ताळ्यावर आणण्याकरितां कित्येक देशहितैषि लोक मनोभावें सतत् परिश्रम करित आहेत व तेणेकरून लोक स्थितींत पुष्कळ फेरबदल होत आहेत तरी त्यापासून सुस्थिति थोडीच प्राप्त होते व तिचें कांहीं पट दुर्व्यसनांचा रिघाव होतो असें सुज्ञ जनांचे लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. तशांतून आपला देश कित्येक वर्षांपूर्वीं भरभराटीस येऊन गेलेला असल्या मुळें सुधारलेल्या, वरच्या पायरीच्या, श्रीमंतीच्या, व ऐशआरामाच्या. पुष्कळ रीति भाति लोकांचे आंगवळणीं पडून गेल्या आहेत; परंतु देशाची ती उत्तम स्थिति व तो काळ निघून गेल्यामुळें त्या पूर्वीच्या रीति भाति सुद्धां जागोजाग नडूं लागल्या आहेत. ऐहिक सुख तुच्छ मानून सर्व भार परमेश्वरावर टाकणें व त्याचे ठायीं तल्लीन होणें या सिद्धतेवर अतीत, फकीर, गोसावी, बैरागी हे बनले असावे पण त्यांचे मनाची दुस्थिति जशीची तशीच राहून ते फक्त बाहेरून मात्र वेषधारी झाले आहेत असें पुष्कळ लोक दारावर येऊन सतावतात त्यावरून उघड दिसतें. स्त्रियांनीं पातिव्रत्य धर्मानें वागून काल क्रमावा तशांत दुर्दैवानें पति गत झाला असतां त्याबरोबर सहगमन करावें अथवा ब्रह्मचर्यव्रत धारण करावें या सिद्धतेवर पुनर्विवाह निषेध झाला असावा. पण ब्रह्मचर्य व्रत मनोभावें पाळिलें जातें अशा अबला थोड्याच, मग इहपरत्र त्रासदायक अशी वैधव्य दशा अबलांकडून भोगाविण्यांत काय हशील? पण करतां काय? "बाबावाक्यप्रमाणं" आमच्या पूर्वजांनीं पुनर्विवाहाचा निषध मानिला आहे तेव्हां तो आह्मी कसा नवीन सुरू करावा!!

घरीं यथेच्छ खाण्यापिण्यास व भोगविलासास समृद्धि असली ह्मणजे देशांतरास जांण्याचें काय प्रयोजन आहे? या सिद्धतेवर "हिंदूनीं अटक नदीचे पलीकडे जाऊं नये व जलप्रयाण करूं नये" हे नियम बांधिले असावेत. व ते त्या जुनाट काळीं सुयुक्तिक होते. पण हल्लीं आमची इमारत कोसळून पडली व तेणेकरून वडिलानीं पैदा केलेले सुखसोयीचे पदार्थ व्यवस्थित रीतीनें मांडून ठेविले होते त्यांचा विघाड झाला अर्थात वडिलांनीं मांडून ठेविले त्या ठिकाणांचे स्थित्यंतर झालें मग ते पदार्थ जेथील तेथें कोठून सापडणार; तेव्हां तेच शोधित बसण्यापेक्षां बाह्य प्रदेशीं फिरून साहित्य मिळवावें व पायाशुद्ध इमारत उभारावी हें चांगलें. नाहींपेक्षां त्या पडलेल्या इमारतीपासून थंडी वाऱ्याच्या तडाक्यांतुन आपलें संरक्षण तर होणार नाहींच पण उलट तिचे खालीं दबून मरण्याचा मात्र प्रसंग येईल. ह्मणून आतांही अटकची अटक धरून बसणें कालाच्या मानानें अप्रशस्त झालें आहे. एक देव, एक धर्म एक निष्ठापरतप अशा प्रकारचीं, धर्म भोळे पणाचीं व खऱ्या ज्ञानास सोडून अशीं आमच्या पूर्वजांचीं अनेक ठिकाणीं वाक्यें असूनही पुष्कळ प्रकारें आमच्या प्रचारांत आहेत आणि ते जातिभेद द्वैताद्वैतापणें आदिकरून प्रकारानीं सर्वत्र प्रसिद्धही आहेत ह्मणून तें एथें वर्णन करण्याची गरज नाहीं.

अलीकडे चाणाक्ष्य व हुशार इंग्रज लोकांचे सहवासानें या देशांतील लोकस्थितींत बराच फेरबदल झाल्याचें दिसून येतें. व होतकरू तरुण लोक चढाओढीनें त्यांचे विद्येचें, हुशारीचें व कलाकौशल्याचें अनुकरण करूं लागले आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. व हा क्रम असाच कांहीं दिवस चालू राहिला असतां आज नाहीं तर कालांतरानें तरी आपल्या देशास लाभ झाल्यावांचून रहाणार नाहीं. मात्र आमची श्रीमंती व ऐश आरामी निःशेष झाली पाहिजे व त्याचप्रमाणें या नवीन सहवासानें, ज्या गोष्टीची आपल्या देशास, आपल्या स्थितीस व आपल्या प्रकृतीस कांहीं गरज नाहीं अशी नवीनें संवय जडणार नाहीं या विषयीं सावधगिरी राखिली गेली पाहिजे. आपली प्रकृति आपणच सांभाळली व राखली पाहिजे; वैद्यांचे हातून ती किती राखली जाणार? तशांतून मानवास बुद्धि ज्ञान ह्मणून जी अगाध देणगी दिली. आहे तिचे योगानें प्रत्येक जणास बरें वाईट, योग्यायोग्य, हिताहित जाणतां येतें ह्मणून व हल्लीं जरी आपल्या पुढें पाणी मिसळलेले दुधाचा पेला आला आहे तरी राजहंसाचे रीतीप्रमाणें त्यांतून दुधाचेंच ग्रहण केलें पाहिजे. तरच परिणाम गोड होईल. चांगलें हें स्वतंत्र सापडावयाचें नाहीं; तर तें वाईटाचेच पोटीं घालून ठेविलें आहे असें परमेश्वराचे सृष्टिरचनेवरूनसुद्धां दिसून येतें. हिरा गारेच्या पोटीं सापडतो, त्रासदायक माशांपासून मध मिळतें. तरी सुज्ञ साराचाच अंगीकार करून असाराचा त्याग करितात. नाहींपेक्षां एरंडाचे पुंगीतून इकडून फुंकला वारा तिकडून निघाला याप्रमाणें एका हातानें धनादि मिळवावें व एका हातानें घालवावें असें होणार आहे "प्रातःकाले शिवंदृष्ट्वा निशीपापं विन. इयति" हें जरी खरें असलें तरी रात्रभर मुद्दाम पापाचरण करून सकाळीं शिवाचें दर्शन केल्याने कधींही त्या पापाचा परिहार होणार नाहीं व अशानें लोकस्थिति कालांतीही सुधारणार नाहीं ह्मणून अज्ञान जाऊन सज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे इतकेंच सांगून हा लांबत आलेला लेख आह्मी सोंपवितों.

---

## मद्रास पत्रावर चमत्कारिक फिर्याद.

मद्रासेस टाइम्स नावाचें एक इंग्रजी वर्तमानपत्र निघत असतें त्यांत जून महिन्याच्या ४ थे तारखेस एक मजकूर आला होता तो असा:—

मद्रास रेलवेचे असिस्टंट ट्राफिक म्यानेजर मि. हिल यांस रेलवे कंपनीची नोकरी सोडण्याविषयीं नोटिस मिळाली. कारण नागेरी एथील अपघाताचे प्रकरणांतील त्यांचें वर्तन डायरेक्टरास नापसंत झालें.

पुढें दुसरे दिवशीं एडिटर यांस खासगी रीतीनें असें कळविलें गेलें कीं ती बातमी खोटी आहे. तेव्हां लागलीच त्यांनीं पुढें लिहिलेला मजकूर छापला.

काल संध्याकाळीं आह्मास असें समजलें कीं इंग्लंडांत डायरेक्टर यानीं नागेरी एथील अपघाताचे प्रकरणांत स्टेशनमास्तरास निर्दोषी ठरवून मि. हिल साहेब यांस त्याजबद्दल जबाबदार धरिलें या संबंधानें जो मजकूर कालचे पत्रांत आह्मी लिहिला तो आह्मांस भरवशासारखा समजल्यावरून

लिहिला होता परंतु तो खोटा आहे. हें पत्र छापण्यापूर्वी मि. हिल साहेबांस किंवा रेलवेच्या दुसऱ्या कोणा कामदारास कळविण्यास आह्मास अगदीं अवसर झाला नाहीं. परंतु हल्लीं मिळालेल्या माहितीवरून आह्मी सर्वांस कळवितों कीं पाहिली बातमी आह्मांस मिळालेली खोटी होती. व त्यावरून या लेखानें आह्मी मि. हिल साहेब यांचे अब्रूस धक्का लागण्याजोगें जें पूर्वी लिहिलें गेलें तें कांहीं काटकसर न करतां सर्व रद्द करितों. व ह्या लेखापासून त्यांस कांहीं नुकसान होण्याजोगें वाटल्यास त्याजबद्दल खरोखर दुःख प्रदर्शित करितों. त्यांची अब्रू खराब करावी किंवा त्यांस त्रास द्यावा अशी आमची कांहींमात्र इच्छा नव्हती सबब तो खोटा मजकूर छापला गेल्याबद्दल पुन्हाही आह्मी आपलें दुःख प्रदर्शित करितों.

याप्रमाणें हा माफीचा मजकूर छापूनच एडिटर स्वस्थ बसले नाहींत तर त्यांनीं मि. हिल साहेब यांस अशा मजकुराचें खासगी पत्रही पाठविलें पण त्या वेळीं ते मद्रासेस नसून कडापा एथें होते. पुढें अशी गोष्ट झाली कीं ज्या दिवशीं हा माफीचा मजकूर प्रसिद्ध झाला त्याच दिवशीं हिल साहेबांचे सालिसिटर यांजकडून एडिटर यांस लिहून आलें कीं तुमच्या एवढ्या लिहिण्यावर स्वस्थ बसण्यास हिल साहेब राजी नाहींत. सविस्तर व तपशीलवार मजकुराची तुह्मी माफी मागावी. व ती त्यांजकडे पाठवून द्यावी. व साऱ्या मद्रास शहरांत जितकीं वर्तमानपत्रें आहेत तितक्या सर्वांतून सतत तीन वेळां ही माफी न मागाल व तो खोटा मजकूर तुह्मास कळविणारा त्याचें नावही न सांगाल तर तुह्मावर दिवाणींत व फौजदारींत फिर्यादी केल्या जातील.

यांचे उत्तर देतांना एडिटरानीं लिहिलें कीं पूर्वी आह्मी प्रसिद्ध केलेली माफी बस व्हावी असें आह्मांस वाटतें. तथापि तुह्मी शिवाय हस्त लिखित माफी मागण्याविषयीं इच्छित असाल तर ती आह्मी देण्यास व आपले स्वतांचे पत्रांत छापण्यास तयार आहों व तिचा तुह्मी पाहिजे तसा उपयोग करावा परंतु मद्रासेंतील इतर वर्तमानपत्रांतून तो मजकूर छापविण्याची तुमची मागणी केवळ निरर्थक आहे इतकेंच नव्हे पण ती फाजील व अयुक्तिक आहे व त्या तुमच्या आग्रहा बद्दल आह्मास फार आश्चर्य वाटतें. व कोणत्याही रीतीनें ती तुमची मागणी कबुल करणें आह्मास अशक्य आहे.

तसेंच बातमीदाराचें नाव तुह्मी मागता पण आमचे एडिटर लोकांच्या बाण्याला व सन्मानाला तसें नाव कळविण्यांत मोठा बट्टा आहे सबब तीही तुमची मागणी आह्मी नाकबूल करितों.

पुढें आणखी पत्रव्यवहार झाल्यांत सालिसिटर ह्मणाले कीं तुमच्या ह्मणण्या इतक्या सुलभ उपपानीं हिल साहेबाची समजूत होणार नाहीं कारण तो लेख विलायतेंचे डाकेंतूनही गेला आहे. एडिटर ह्मणाले आह्मी आपल्या समजींत तो दाखल केला नाहीं. पुढें त्यांनीं बातमीदाराचें नाव न दिल्यास फिर्याद करितों असें कळविलें व यांनीं नाव देत नाहीं असें सांगितलें. पुढें ही गोष्ट या पल्यावर येऊन सुमार एक महिनाभर तशीच राहिली. नंतर सालिसिटरनीं पुन्हा एडिटरास लिहिलें कीं हिल सा. लेखी माफी घेण्यास कबूल आहेत. त्यास ती पाठवावी; तेव्हां एडिटर यांनीं मधल्या अवकाशांत अधिक विचार करून ठेविला होता त्याजवरून सालिसिटरांस उत्तर दिलें कीं आतां आह्मी नवीन कांहींच करूं इच्छित नाहीं. पहिलें जें आह्मी माफीदाखल लिहिलें आहे तेंच आमच्या मतें बस आहे. शेवटीं हिल साहेब त्यास नाराजी होऊन त्यांनीं हायकोर्टांत २५००० रुपयांचा अब्रूच्या नुकसानीचा दावा लाविला आहे. त्याचा निकाल अजून झाला नाहीं.

## वऱ्हाड.

मे० जोन्स साहेब कमिशनर गेले रविवारीं इकडून परभोरें मुंबईकडे गेले होते ते बुधवारीं अकरा वाजतां एथें आले. महिनाभर रहाणार असें वर्तमान आहे.

जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी मंगळवारीं मलकापुराहून आली. व ती हल्लीं एथेंच आहे.

हवा— एथील हवा अलीकडे अगदीं नाकारी झाली आहे, पाऊस सगळा आठवडा दररोज आहे. व रोगांचें प्राबल्यही विशेष आहे. पायास सूज येऊन ती वर चढते व तिच्या योगानें मनुष्यें मरण पावतों असे पाच पन्नास लोक या आठवड्यांत मेल्याची वार्ता आहे. हा रोग व इतर रोग मिळून सर्वांच्या सपाट्यानें ३१४ दिवस १२।१५ प्रमाणे दररोज मनुष्यें मेलीं. महामारीनेंही पुन्हा सिंव्हावलोकन केलें आहे. ही हवा कधीं सुधरेल व लोक निष्काळजी होतील तो दिवस सुदीन.

सुजेच्या आजारानें या आठवड्यांत रा. रा. राजारामपंत रिविन्यु सर्व्हेकडील कारकून पत्नीसहवर्तमान एके रात्रीं मरण पावले. तसेंच रा. रा. गोविंद लक्ष्मण बाळापुरकर डिपुटी कमिशनर कडील क्लार्क हे आपले बंधू सहीत एके दिवसाचे अंतरानें मरण पावले. याजबद्दल आह्मांस फार दुःख वाटतें. या उभयतांच्याही घरीं अजून कांहीं माणसें या रोगानें आजारी आहेत.

गावांत सुजेच्या नव्या रोगाची सांत आली आहे. तिचें स्वरूप पहाण्यासाठीं व उपायासाठीं डा० ब्रिटल साहेब सिव्हिल सर्जन हे या आठवड्यांत कित्येक वेळां गावांत आले होते व त्यांनीं आजाऱ्यांचे घरीं जाऊन त्यांचे रोगाची चांगली चिकित्सा केली.

कैलासवासी वामनराव बाळाजी ओकरकर यांचे संबंधानें फंड जमविण्याकरितां तजवीज चालू आहे. त्या बाबदींत त्या कामाचे सेक्रेटरी रा. रा. भाऊराव यादव जोशी यांणीं मंडळीस पत्रें पाठविलीं त्याची प्रत आह्मी आपले पत्रांत दुसरीकडे प्रसिद्ध केली आहे ती आमचे वाचक पहातील व त्या फंडास उदारपणें मदत देतील असें आह्मी इच्छितों. वामनरावासारखा बिनमोल मोहोरा सर्वांच्या स्मृतिपर्यांतून जाणें नाहींच, व प्रतिआठवणीस त्याबद्दल दुःख झाल्यावांचून रहाणें नाहींच, सबब त्यांच्या चिरंजीवाच्या विद्याभ्यासाकरितां फंड जमविण्याची योजना आहे तिला सढळ हातानें सहाय्य दिल्यास मंडळींनीं आपलें अवश्य कर्तव्यकर्म केल्यासारखें होईल.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं पुण्याचे ट्रेनिंग कालेजाकडील मराठी मास्तर रा. रा. नारो रघुनाथ मोहोळकर यांनीं " अंक मनोरमा " नावाचें गणितसंबंधी चमत्कारिक पुस्तक ६।७ वर्षांपूर्वी केलें असून इकडील दक्षिणा प्राइज कमिटीकडे दिलें होतें त्याचा अखेर विचार होऊन राव बहादुर डायरेक्टर साहेबानीं व अलिशान रेसिडेंट साहेबानीं त्या पुस्तका बद्दल ७५ रुपये बक्षीस देण्याचा ठराव केला व मोहोळकर यांनीं सदहू पुस्तक छापिल्यास त्याच्या १०० प्रति सरकारांत घेऊं असेंही त्यांस आश्वासन दिलें. त्या प्रमाणें त्यांस ७५ रुपये रोख मिळाले. आतां तें पुस्तक लवकरच छापण्याचा त्यांचा मनोदय आहे. हे गृहस्थ गणितामध्यें फार हुशार आहेत व यांनीं त्यासंबंधीं ३।४ नवीं पुस्तकेंही केलेलीं आहेत. तीं व सदहू मनोरमा हें पुस्तक आह्मी पाहिलें त्यावरून गणित संबंधीं त्यांचे मार्मिक ज्ञानाची आह्मी तारीफ करितों व उमेद बाळगतों कीं सरकारांतून व लोकांकडून त्यांस अशीच मदत वारंवार मिळेल तर ते आपला त्या कामाविषयींचा प्रयत्न सतत जारी ठेवितील.

बारशी टाकळी एथील स्कूलमास्तर रा. रा. नामाजी वामन यांजकडे १२०० रुपयांची चोरी झाली.

व्हालंटियर पलटण भरविण्याचे संबंधानें एथें सोमवारीं व शनिवारीं टौनहालांत युरोपियन लोकांच्या दोन सभा झाल्या. त्या विषयींची हकीकत आह्मी पुढें लिहूं.

अकोल्याहून ९ व उमरावतीहून ७ विद्यार्थी म्याट्रिक्युलेशनचे परिक्षेस जाणार आहेत.

डिपुटी कमिशनर आफिसांतील क्लार्क रा. रा. वासुदेव जगन्नाथ हे आजारी असून त्यांनीं सहा महिन्यांची रजा घेतली आहे. त्यांच्या जागेवर त्याच आफिसांतील वर्गावर्गीनें नेमणुका झाल्या. व गोविंदराव बाळापुरकर यांची ४० रुपयांची जागा रा. रा. वामन गणेश यांस दिली व त्यांची २५ ची जागा रा. रा व्यंकट कृष्ण देसाई म्युनिसिप्यालिटीकडील कारकून यांस दिली.

रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट उमरावतीचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर यांनीं दोन महिन्यांची रजा घेतली आहे. व ते आज मुंबईकडे जाणार आहेत.

वणी—इकडे सुमार महिन्यापूर्वी महामारीचा रोग सुरू झाला होता परंतु हल्लीं कांहींएक नाहीं. पर्जन्याचीही अतिशय झड लागली होती. परंतु सुमार १५ दिवस झालें उघाड पडली आहे. त्यामुळें हल्लीं नोंधळ्याच्या पेरण्या झपाट्यानें सुरू आहेत. एथील चीफ कान्स्टेबल मि. मोहोकसिंग यांची बदली पांढरकवड्यास होऊन तेथील चीफ कान्स्टेबल मि. विंदाप्रसाद यांची बदली वणीस झाली आहे. तसेच पोलिस इन्स्पेक्टर मि. शामहमद हे चार महिन्याचे हक्काचे रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर काल रोजीं रुजू झाले. व त्यांचे बदलीवर आलेले अकोला एथील चीफ कान्स्टेबल रा. रा. रामजी शाळिग्राम हे पुन्हा अकोल्यास आपले कामावर गेले.

मेहेकर (मित्राकडून) — ता. १८ सेप्टेंबर सन १८७८ इसवी. अलीकडे पंधरा दिवसांत एथील हवेंत फारच फरक दिसत आहे, यंदा पर्जन्यानें मात्र गेले दोन वर्षांची कसर काढिलीसें वाटतें. पण धान्योत्पत्तीस त्यापासून कितपत हित होईल याचा मात्र विचारच आहे. एथील डाक्टर मि. मेलाराम पंजाब प्रान्ताकडे बदलल्यामुळें त्यांचे जागीं मि० बलदेवप्रसाद आग्रा एथील रहाणार आले आहेत.

मेजर बुशबी साहेब लेफटनेंट कर्नल झाले.

मि. यासिनखा अल्याची यांनां तालुक्यांतील ५०० रुपयेपर्यंत दिवाणी व तिसरे वर्ग माजिस्त्रेटचा अधिकार मिळाला असें कळतें.

मे. कमिशनर साहेब यांचे आफिसांत इंग्रजीकडील दोन जागा रिकाम्या होत्या यामुळें त्याच आफिसांतील मंडळीस खालीं लिहिल्याप्रमाणें बढती झाली. रा. रा. कृष्णराव यांस ८० रुपये, मि. सुबराव यांस ७० रुपये, मि० अल्बर्ट ६० रुपये, रा. रा- रामराव बापूजी ५०, व मि. बिरास्वामी यांस ४० रुपये होऊन मि० अबदुल कुदुस यांस२० रुपयांचे जागी कायम केलें व एक जागा कमी केली.

## जाहिरखबर

श्री व्यंकटेशजी स्वामी संस्थान पेठ देऊळगाव राजा ता० चिखली जिल्हा बुल्डाणें, विद्यमान राणी अहिल्याबाई वालेदा राजे मानसिंग राव जाधवराव जमीदार सरकार दौलताबाद यांजकडून

कौलनामा जिल्हा अकोला— साहु व व्यापारी व कासार, मन्यारी आणि हलवाई जन समूह सन १८७८ इसवी. कौलनामा जाहीर केला जातो कीं, मामुलप्रमाणें आश्विन मासीं विजयादशमी रोज शनिवारचा श्रीजींचा उत्साह आहे करितां आपण सहकुटुंब सहपरिवार दुकानदारीचे मालासहित श्रीजींचे चरणापाशीं येऊन दर्शनाचा लाभ घ्यावा. जगावरूप येण्याचें करावें पूर्वील संप्रदाय निर्दीत आहे त्याप्रमाणें बाबगी तोशीस लागणार नाहीं. कळावें मिती भाद्रपद शुद्ध १३ तारीख ९ माहे सप्टेंबर सन १८७८ इसवी.

## वर्तमानसार.

सयाम देशाचा वसूल सारा १६ लक्ष रुपये आहे व त्यांतून सरकार संबंधी खर्च सारा ६ लक्ष रुपये आहे असें ह्मणतात.

जुलाई महिन्यांत विलायेतहून २४९१६ टन कोळसे हिंदुस्थानांत आले. व हिंदुस्थानांतून २५०६३१ हंड्रेडवेट कच्चा कापूस, आणि १०८८८ हंड्रेडवेट आफु परदेशांत गेली.

बाबु सत्येंद्रनाथ टागोर अमदाबादचे अकाटिंग जडज यांनीं २० वे तारखेपासून दोन वर्षांची फर्लो रजा घेतली.

रत्नागिरीचे कलेक्टर मि० क्राफर्ड साहेब यांचे चिरंजीव सिव्हिल सरव्हिसचे परिक्षेंत पास होऊन इकडे आले.

मि० चाटफिल्ड मुंबई इलाख्याचे विद्याखात्याचे डायरेक्टर विलायतेस रजेवर आहेत त्यांस हिंदुस्थानांत परत जाण्याविषयीं स्टेट सेक्रेटरी यांची परवानगी झाली.

मुंबईचे मि० एदलजी माणकजी हे विलायतेस जाऊन वैद्यक शास्त्रांतील परीक्षेंत पास होऊन आले.

ग्रीस देशच्या राजानें युरोपांतील राष्ट्रांस विनंती केली आहे कीं, तुर्कस्थानचा आमचा हद्दीचा तंटा आपण मध्यस्थ होऊन मिटवावा.

जर्मनीच्या बादशहास मारण्याचा प्रयत्न करणारा डा० नोबिलिंग हा मरण पावला.

वेल्स प्रांतांत अबरकार्न एथें खाणीला कांहीं अपघात होऊन ३७१ मनुष्यें काम करीत होतीं त्यांतील २८० मरण पावलीं.

विलायत सरकारानें तुर्कस्थानच्या सुधारणे साठीं ज्या तजविजी योजिल्या आहेत त्या सुलतानास पसंत आहेत असें सावित पाच्छा यानीं बोलून दाखविलें.

हिंदुस्थान सरकारानें केलेल्या प्रेस कमिशनची नेमणूक विलायत सरकारनें मंजूर केली.

मुंबई इलाख्यांत लायसेन्स ट्याक्सचा कर पेढीवर बसवून तिचे प्रत्येक भागीदारावरही वेगळा बसवीत असत त्या विषयीं ठराव झाला कीं पेढीवर बसविलेला कर पुरें आहे. त्याशिवाय तिच्या प्रत्येक भागीदारावर वेगळा कर बसवूं नये.

वेसुवियस पर्वतांतून ज्वाला व रस फार सोसाट्यानें निघूं लागला आहे.

आईची लीला व मुलाचा उपदेश

अशा मासल्याचा एक खटला रा. रा. दिनकर जनार्दन सोलापुरचे स. मा. यांपुढें आला, तो असा कीं, एक स्त्री विषयांध होऊन आपले जाराशी विषयसंबंधी लिला करीत असतां ते तिच्या १०।१२ वर्षांच्या वयाच्या पोरानें पाहिलें. व ही लीला न करण्याविषयीं उपदेश केला, आईनें चूप बैस असें सांगितलें असूनही मुलगा बोभाट करतो असें पाहून त्यास शासन केलें. मुलास फार वाईट वाटून त्यानें तें सर्व आपले मामास सांगितलें. मामानें मुलास मारल्याबद्दल फिर्याद केली. चौकशींत गुन्हा शाबीत सबब त्या आईस एक महिना सक्त मजुरीची शिक्षा झाली. कें०

हिंदुस्थान सरकारानें असा ठराव केला आहे कीं जे रुपये कात्रीनें घांसले असतील अथवा दुसऱ्या रीतीनें खराब झाले असतील ते रुपये सरकारी खजिन्यांतून बदलून मिळतील. असल्या रीतीचे रुपये सरकारी खजिन्यांत ज्या तारखेपासून घेतले जाणार नाहींत ती तारीख पुढें प्रसिद्ध करण्यांत येईल.

इंदुर— व्हाइसराय लार्ड गव्हर्नर जनरल यांची स्वारी लौकरच माळव्यांत येणार. तारीख २० नवंबरच्या सुमारास निमच छावणीस येऊन डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत इंदुरास येतील असें आहे.

युनाइटेड स्टेट मध्यें लाख व मध दिवसें दिवस जास्त उत्पन्न करूं लागले आहेत. दरसाल लाख सुमार २ कोटि पौंड उत्पन्न होते व मेण आणि मध मिळून एकंदर उत्पन्न सुमारें १॥ कोटि होतें. मामाशास कांदा तयार करण्यास स्वल्प जावें ह्मणून व त्यांचा वेळ व्यर्थ जाऊनये ह्मणून यंत्राच्या द्वारानें कृतीचे कांदे बनवून मध व मेणाची लागवड होऊं लागली आहे. सदर्हू राज्यांतून गुदस्त सालीं सुमारें १ कोटि पौंड वजन खिळे युरोपखंडांत गेले.

अमेरिकेंत कापसाचे खालेखाल उत्पन्न ग्यासलाइट तेलाचें आहे. सन १८७७ सालीं पाऊण कोटि रुपयांचें तेल परदेशीं गेलें.

धान्य दळण्याच्या कामाकरितां दगडाबद्दल कांचेच्या तळ्यांचा उपयोग होऊं लागला आहे.

पदार्थ ठेवण्याकरितां न्यूयार्क एथें गवताचा पातळ पदार्थ बनवून त्यांचीं पिंपें होऊं लागलीं आहेत. हीं पिंपें लांकडापेक्षां हलकी असून कमी किंमतीस पडतात.

लढाईंत कैद झालेले ६७०००. तुर्कस्थानचे शिपाई रशियाच्या कैदेंत आहेत. कैद्याबद्दल दीड कोटि फ्रांक दिल्या खेरीज त्यांस मुक्त करणार नाहीं असें रशिया सरकारचें ह्मणणें आहे.

अमेरिकेंत कानडा प्रांतीं चक्कादही अथवा पनेर ( ज्यास इंग्रजींत चीज ह्मणतात ) करण्याचा कारखाना आहे. या कारखान्यांत सदर्हू पदार्थाचा ७ हजार पौंड वजनाचा एकच गठ्ठा बनविला होता. या गठ्याचा व्यास ७ फूट असून परीघ २१ फूट होता. हा गठ्ठा बनविण्यास ७००० गाईंचें ३५ टन वजन दूध लागलें.

ने. ओ-

लोकरीच्या कापडांतून कापसाचे धागे ओळखून काढण्याची रीतिः—

लोकरीच्या कापडांतील संशय आलेला धागा किंचित बाहेर काढून तो ज्वाळेवर धरावा ह्मणजे कापूस असल्यास एकदम जळेल व लोकर असल्यास त्या धाग्यास कुरळ्या पडून जळकट वाईट घाण सुटेल. अथवा एका चिनीच्या ताटांत संशय आलेले कांहीं धागे ठेवावे आणि त्यावर नाइट्रीक आसीडचे दोन चार थेंब टाकावे, कापूस असल्यास त्या धाग्यांत कांहीं एक फरक होणार नाहीं परंतु लोकर असल्यास धाग्याचा रंग फिरून पिवळा होईल. सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिले असतां कापसाचा धागा चपटा, कमजास्त पीळ पडलेला पुष्कळ अंशीं केसाप्रमाणें दिसतो परंतु लोकरीच्या धाग्यावर वेड्यावाकड्या आडव्या रेषा दृष्टीस पडतात.

बडोद्याच्या तिजोरींतून दीड कोटि रुपये आपणांस मिळणे वाजवी आहे असें मद्रास एथें राजकीय कैदेंत असलेल्या मल्हाररावांचें ह्मणणें असून त्याकरतां मल्हाररावांच्या तर्फेनें मद्रासचे तरुण बारिस्टर मि. अवनाघ हें खटपट करीत आहेत.

किरण.

## सत्य.

सत्य एक परब्रह्म आहे आणि असत्य हें महापातक आहे. सत्य सर्वांस प्रिय आहे आणि तें ईश्वरासही प्रिय आहे. असत्य हें केवळ महानर्क आहे. यास्तव त्याचा स्वीकार करणें रास्त नाहीं. असत्य मनुष्यास कोणी चांगलें ह्मणत नाहीं व मान देत नाहीं. सर्व त्याचा धिःकार करितात. जो मनुष्य खरा व आपले सर्व व्यवहारांत सत्याशीं स्नेह करून चालतो त्यासच सर्व मान देतात, लबाड मनुष्याची लबाडी कांहीं दिवस उघडकीस न आली तरी लबाडी हें पाप आहे तें ईश्वरास सहन होणार नाहीं व त्याबद्दल आपल्यास ईश्वर दंड केल्यावांचून कधींही रहाणार नाहीं. वाईट मार्गाचा वाईटच परिणाम यांत संशय नाहीं.

सत्यास सोडूं नये आणि असत्यास स्वीकारूं नये हेंच उत्तम असे आह्मी तोंडानें मात्र ह्मणतों. परंतु त्या बोलण्याप्रमाणें आह्मी सर्व वर्तणूक ठेवतो काय? आपले करण्यापासून किंवा दुसरे कांहीं कारणानें आपला कांहीं नुकसानीचा अगर काल्पित नुकसानीचा प्रसंग येतो आहे असें संभवतांच सत्यास स्मरून वर्तन ठेवणार खरोखर फार थोडे निघतील. मग आपण कोण, आपलें कर्तव्य काय, आपण सत्याचा बाणा मिरवणारे आहोंत व असत्य हें पाप आहे या साठीं "ईश्वरइच्छेनें जें होणें तें होवो परंतु सत्य न सुटो असा निश्चय न होतां असत्याचा अंगीकार अशा समयीं होतो. अशीं बरींच उदाहरणें आपल्या पहाण्यांत येतात. या साठीं आपण असा दृढ निश्चय केला पाहिजे कीं हित होवो अगर अनहित होवो परंतु खोटें भाषण कधींही करावयाचे नाहीं. खोटें बोलणें हें पाप आहे, तें करून ईश्वराची अवकृपा करून घेण्यापेक्षां प्रामाणीकपणानें त्याची कृपा संपादन करून रहाणेंच उत्तम, असें मानून त्या प्रमाणें सतत सारखें वर्तन ठेवणें हें ईश्वरास आणि सज्जनास प्रिय आहे या स्तव कोणत्याही लाभासाठीं अगर सुखासाठीं आपण कधींही सत्यास सोडून असत्यास स्वीकारूं नये व असें केलें तरच त्यांत आपलें कल्याण होऊन ईश्वराची प्रीति साध्य होणार आहे.

सु. प.

## मद्रास इलाख्यांतील शिदापेंट एथील शेतकी शाळा.

सदर्हू कालेजाबद्दल हकीकत आह्मीं वाचकांस वारंवार कळविली असून सदरील विद्यालयाप्रमाणें विद्यालय या इलाख्यांत असण्याविषयीं कित्येक वेळ सूचना केल्या. सदरील प्रकारचें विद्यालय असण्याची जरूर आहे, व तें असल्यापासून फार हितावह होईल हें मद्रास एथील कालेजाची अलीकडील जी हकीकत समजली आहे तिजवरून लक्षांत येतें. सदर्हू कालेजाबद्दल मि० राबर्टसन या कालेजाचे मुख्य गुरू यांनीं मद्रास सरकारास रिपोर्ट केला आहे त्यावरून कळतें कीं, ह्या कालेजाची सन १८७६ च्या नोवेंबर महिन्यांत सुरुवात झाली; परंतु सुमारें एक वर्षाच्या आंतच १४५ मुलांकडून कालेजांत शिकण्याची परवानगी मिळण्याविषयीं अर्ज आले; परंतु इतक्या विद्यार्थ्यांस कालेजांत जागा नसल्यामुळें फक्त २७ विद्यार्थी मात्र घेतले. सदर्हू अर्जापैकीं ३१ अर्ज मद्रासेहून, १६ चिंगलपट एथून, ६० तंजावर, ३१ मुंबई इलाखा, ९ कोईमटूर, ८ उत्तर अर्काट, व बाकीचे सिंहलद्वीप, अयोध्या, पंजाब, वगैरे प्रांतांतून आले. सदर्हू अर्जापैकीं ६३ अर्ज ब्राह्मणांचे होते, २९ पार्शांचे होते, १२ वाणी लोकांचे व बाकी इतर दुसऱ्या जातींचे होते. या इलाख्यांतून एकंदर ३१ अर्ज गेले व सर्व अर्जापैकीं ६३ ब्राह्मणांचे व २० पार्शांचे होते यावरून स्पष्ट दिसून येत आहे कीं, शेतकीचा धंदा शिकण्याची पुष्कळ लोकांची इच्छा आहे इतकेंच नाहीं परंतु तो शिकण्याची चांगल्या स्थितींतील लोकांचीही इच्छा आहे. शेतकीच्या धंद्यास विशेष पैसा लागत नाहीं, तथापि अगदीं लागत नाहीं असें नाहीं. विहिरी खणणें, तलाव बांधणें, व बांध घालणें, हीं कामें पैशावांचून होत नाहींत. युरोपखंडांत ज्या प्रकारचा शेतकीचा धंदा चालतो त्यासही बराच पैसा लागतो. थोड्या पैशांच्या लोकांस हल्लीं धंदे रोजगाराची मोठी अडचण आहे. तर मद्रास इलाख्यासारखें या इलाख्यांत कालेज स्थापन केलें असतां एक नवीन प्रकारचा धंदा उत्पन्न झाल्यासारखें होणार आहे. ज्या प्रकारच्या लोकांकडून सदर्हू अर्ज झाले आहेत ते लोक आमचे इकडील हल्लींच्या पुष्कळ शेतकऱ्यांप्रमाणें अगदीं निर्द्रव्य नसतात, नव्या तऱ्हेच्या शेतकीस प्रथमतः लागणारें सामान घेण्यापुरती त्यांस शक्ति असते. तर अशा प्रकारच्या लोकांचे हातून नव्या प्रकारच्या शेतकीच्या धंद्यास सुरुवात झाली तर जमिनीची सुधारणा होईल इतकेंच नाहीं परंतु इतर शेतकरी लोकांसही शिक्षण दिल्यासारखें होणार आहे. हिंदुस्थानच्या एकंदर उत्पन्नापैकीं सुमारें ५क त्रितियांश उत्पन्न जमिनीपासून आहे, तर या उत्पन्नांतून दर वर्षास प्रत्येक इलाख्यांत लाख दोन लाख रुपये खर्च केले असतां फार आहेत असें नाहीं. अशा प्रकारचे खर्च झालेले रुपये व्यर्थ जावयाचे नाहींत. कारण प्रथम जमीन सुधारेल, जमीन सुधारली ह्मणजे माल पुष्कळ उत्पन्न होईल. माल पुष्कळ उत्पन्न झाला ह्मणजे अर्थातच शेतकऱ्यांची स्थिति सुधारेल व असें झालें ह्मणजे राज्याचें उत्पन्न सहज वाढेल.

इं. ओ.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

सयाम देशाचा वसूल सारा १६ लक्ष रुपये आहे व त्यांतून सरकार संबंधी खर्च सारा ६ लक्ष रुपये आहे असें ह्मणतात.

जुलाई महिन्यांत विलायेतहून २४९१९ टन कोळसे हिंदुस्थानांत आले. व हिंदुस्थानांतून २५०६३१ हंड्रेडवेट कच्चा कापूस, आणि १०८८८ हंड्रेडवेट आफु परदेशांत गेली.

बाबु सत्येंद्रनाथ टागोर अमदाबादचे अकटिंग जड्ज यानीं २० वे तारखेपासून दोन वर्षांची फर्लो रजा घेतली.

रत्नागिरीचे कलेक्टर मि० क्राफर्ड साहेब यांचे चिरंजीव सिव्हिल सरव्हिसचे परिक्षेंत पास होऊन इकडे आले.

मि० चाटफिल्ड मुंबई इलाख्याचे विद्याखात्याचे डायरेक्टर विलायतेस रजेवर आहेत त्यांस हिंदुस्थानांत परत जाण्याविषयीं स्टेट सेक्रेटरी यांची परवानगी झाली.

मुंबईचे मि० एदलजी माणकजी हे विलायतेस जाऊन वैद्यक खात्यांतील परीक्षेंत पास होऊन आले.

ग्रीस देशच्या राजानें युरोपांतील राष्ट्रांस विनंती केली आहे कीं, तुर्कस्थानचा आमचा हद्दीचा तंटा आपण मध्यस्थ होऊन मिटवावा.

जर्मनीच्या बादशहास मारण्याचा प्रयत्न करणारा डा० नोबिलिंग हा मरण पावला.

वेल्स प्रांतांत अबरकार्न एथें खाणीला कांहीं अपघात होऊन ३७१ मनुष्यें काम करीत होतीं त्यांतील २८० मरण पावलीं.

विलायत सरकारानें तुर्कस्थानच्या सुधारणे साठीं ज्या तजविजी योजिल्या आहेत त्या सुलतानास पसंत आहेत असें सांवत पाच्छा यानीं बोलून दाखविलें.

हिंदुस्थान सरकारानें केलेला प्रेस कमिशनरची नेमणूक विलायत सरकानें मंजूर केली.

मुंबई इलाख्यांत लायसेन्स ट्याक्सचा कर पेढीवर बसवून तिचे प्रत्येक भागीदारावरही वेगळा वसूल होत असत त्या विषयीं ठराव झाला कीं पेढीवर बसविलेला कर पुरें आहे. त्याशिवाय तिच्या प्रत्येक भागीदारावर वेगळा कर बसवूं नये.

वेसुवियस पर्वतांतून ज्वाला व रस फार सोसाट्यानें निघूं लागला आहे.

आईची लीला व मुलाचा उपदेश

अशा मासल्याचा एक खटला रा. रा. दिनकर जनार्दन सोलापुरचे स. मा. यांपुढें आला, तो असा कीं, एक स्त्री विषयांध होऊन आपले जाराशी विषयसंबंधी लिला करीत असतां ते तिच्या १०।१२ वर्षांच्या वयाच्या पोरानें पाहिलें. व ही लीला न करण्याविषयीं उपदेश केला, आईनें चूप बैस असें सांगितलें असूनही मुलगा बोभाट करतो असें पाहून त्यास शासन केलें. मुलास फार वाईट वाटून त्यानें तें सर्व आपले मामास सांगितलें. मामानें मुलास मारल्याबद्दल फिर्याद केली. चौकशींत गुन्हा शाबीत सबब त्या आईस एक महिना सक्त मजुरीची शिक्षा झाली. के०

हिंदुस्थान सरकारानें असा ठराव केला आहे कीं जे रुपये कान्हीनें घांसले असतील अथवा दुसऱ्या रीतीनें खराब झाले असतील ते रुपये सरकारी खजिन्यांतून बदलून मिळतील. असल्या रीतीचे रुपये सरकारी खजिन्यांत ज्या तारखेपासून घेतले जाणार नाहींत ती तारीख पुढें प्रसिद्ध करण्यांत येईल.

इंदूर— व्हाइसराय लार्ड गव्हर्नर जनरल यांची स्वारी लौकरच माळव्यांत येणार. तारीख २० नवंबरच्या सुमारास निमच छावणीस येऊन डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत इंदुरास येतील असें आहे.

युनाइटेड स्टेट मध्यें लाख व मध दिवसें दिवस जास्त उत्पन्न करूं लागले आहेत. दरसाल लाख सुमार २ कोटि पौंड उत्पन्न होते व मेण आणि मध मिळून एकंदर उत्पन्न सुमोरें १॥ कोटि होतें. माशास कांदा तयार करण्यास स्वल्प जावें ह्मणून व त्यांचा वेळ व्यर्थ जाऊनयें ह्मणून यंत्राच्या द्वारानें कृतीचे कांदे बनवून मध व मेणाची लागवड होऊं लागली आहे. सदर्हू राज्यांतून गुदस्त सालीं सुमारें १ कोटि पौंड वजन खिळे युरोपखंडांत गेले.

अमेरिकेंत कापसाचे खालोखाल उत्पन्न ग्यासलाइट तेलाचें आहे. सन १८७७ सालीं पाऊण कोटि रुपयांचें तेल परदेशीं गेलें.

धान्य दळण्याच्या कामाकरितां दगडाबद्दल कांचेच्या तळ्यांचा उपयोग होऊं लागला आहे.

पदार्थ ठेवण्याकरितां न्युयार्क एथें गवताचा पातळ पदार्थ बनवून त्यांचीं पिंपें होऊं लागलीं आहेत. हीं पिंपें लांकडापेक्षां हलकी असून कमी किंमतीस पडतात.

लढाईंत कैद झालेले ६७००० तुर्कस्थानचे शिपाई रशियाच्या कैदेंत आहेत. कैद्याबद्दल दीड कोटि फ्रांक दिल्या खेरीज त्यांस मुक्त करणार नाहीं असें रशिया सरकारचें ह्मणणें आहे.

अमेरिकेंत कानडा प्रांतीं चक्कादही अथवा पनेर ( ज्यास इंग्रजींत चीज ह्मणतात ) करण्याचा कारखाना आहे. या कारखान्यांत सदर्हू पदार्थाचा ७ हजार पौंड वजनाचा एकच गठ्ठा बनविला होता. या गठ्ठ्याचा व्यास ७ फूट असून परीघ २१ फूट होता. हा गठ्ठा बनविण्यास ७००० गाईचें ३५ टन वजन दूध लागलें.

ने. ओ-

लोकरीच्या कापडांतून कापसाचे धागे ओळखून काढण्याची रीतिः—

लोकरीच्या कापडांतील संशय आलेला धागा किंचित बाहेर काढून तो ज्वालेवर धरावा ह्मणजे कापूस असल्यास एकदम जळेल व लोकर असल्यास त्या धाग्यास कुरळ्या पडून जळकट वाईट घाण सुटेल. अथवा एका चिनीच्या ताटांत संशय आलेले कांहीं धागे ठेवावे आणि त्यावर नाइट्रीक आसीडचे दोन चार थेंब टाकावे, कापूस असल्यास त्या धाग्यांत कांहीं एक फरक होणार नाहीं परंतु लोकर असल्यास धाग्याचा रंग फिरून पिवळा होईल. सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिले असतां कापसाचा धागा चपटा, कमजास्त पीळ पडलेला पुष्कळ अंशीं केसाप्रमाणें दिसतो परंतु लोकरीच्या धाग्यावर वेड्यावाकड्या आडव्या रेषा दृष्टीस पडतात.

बडोद्याच्या तिजोरींतून दीड कोटि रुपये आपणांस मिळणें वाजवी आहे असें मद्रास एथें राजकीय कैदेंत असलेल्या मल्हाररावांचें ह्मणणें असून त्याकरतां मल्हाररावांच्या तर्फेनें मद्रासचे तरुण बारिस्टर मि. अवनाघ हें खटपट करीत आहेत.

किरण.

## सत्य.

सत्य एक परब्रह्म आहे आणि असत्य हें महापातक आहे. सत्य सर्वांस प्रिय आहे आणि तें ईश्वरासही प्रिय आहे. असत्य हें केवळ महानर्क आहे. यास्तव त्याचा स्वीकार करणें रास्त नाहीं. असत्य मनुष्यास कोणी चांगलें ह्मणत नाहीं व मान देत नाहीं. सर्व त्याचा धिःकार करितात. जो मनुष्य खरा व आपले सर्व व्यवहारांत सत्याशीं स्नेह करून चालतो त्यासच सर्व मान देतात, लबाड मनुष्याची लबाडी कांहीं दिवस उघडकीस न आली तरी लबाडी हें पाप आहे तें ईश्वरास सहन होणार नाहीं व त्याबद्दल आपल्यास ईश्वर दंड केल्यावांचून कधींही रहाणार नाहीं. वाईट मार्गाचा वाईटच परिणाम यांत संशय नाहीं.

सत्यास सोडूं नये आणि असत्यास स्वीकारूं नये हेंच उत्तम असें आह्मी तोंडानें मात्र ह्मणतों. परंतु त्या बोलण्याप्रमाणें आह्मी सर्व वर्तणूक ठेवतो काय ? आपले करण्यापासून किंवा दुसरे कांहीं कारणानें आपला कांहीं नुकसानीचा अगर काल्पित नुकसानीचा प्रसंग येतो आहे असें संभवतांच सत्यास स्मरून वर्तन ठेवणोर खरोखर फार थोडे निघतील. मग आपण कोण, आपलें कर्तव्य काय, आपण सत्याचा बाणा मिरवणारे आहोंत व असत्य हें पाप आहे या साठीं "ईश्वरइच्छेनें जें होणें तें होवो परंतु सत्य न सुटो असा निश्चय न होतां असत्याचा अंगीकार अशा समयीं होतो. अशीं बरींच उदाहरणें आपल्या पहाण्यांत येतात. या साठीं आपण असा दृढ निश्चय केला पाहिजे कीं हित होवो अगर अनहित होवो परंतु खोटें भाषण कधींही करावयाचें नाहीं. खोटें बोलणें हें पाप आहे, तें करून ईश्वराची अवकृपा करून घेण्यापेक्षां प्रामाणीकपणानें त्याची कृपा संपादन करून रहाणेंच उत्तम, असें मानून त्या प्रमाणें सतत सारखें वर्तन ठेवणें हें ईश्वरास आणि सज्जनास प्रिय आहे

या स्तव कोणत्याही लाभासाठीं अगर सुखासाठीं आपण कधींही सत्यास सोडून असत्यास स्वीकारूं नये व असें केलें तरच आंत आपलें कल्याण होऊन ईश्वराची प्रीति साध्य होणार आहे. सु. प.

## मद्रास इलाख्यांतील शिदापेंट एथील शेतकी शाळा.

सदर्हू कालेजाबद्दल हकीकत आह्मीं वाचकांस वारंवार कळविली असून सदरील विद्यालयाप्रमाणें विद्यालय या इलाख्यांत असण्याविषयीं कित्येक वेळ सूचना केल्या. सदरील प्रकारचें विद्यालय असण्याची जरूर आहे. व तें असल्यापासून फार हितावह होईल हें मद्रास एथील कालेजाची अलीकडील जी हकीकत समजली आहे तिजवरून लक्षांत येतें. सदर्हू कालेजाबद्दल मि० राबर्टसन या कालेजाचे मुख्य गुरू यांनीं मद्रास सरकारास रिपोर्ट केला आहे त्यावरून कळतें कीं, ह्या कालेजाची सन १८७६ च्या नोवेंबर महिन्यांत सुरुवात झाली; परंतु सुमारें एक वर्षाच्या आंतच १४९ मुलांकडून कालेजांत शिकण्याची परवानगी मिळण्याविषयीं अर्ज आले; परंतु इतक्या विद्यार्थ्यांस कालेजांत जागा नसल्यामुळें फक्त २७ विद्यार्थी मात्र घेतले. सदर्हू अर्जांपैकीं ३१ अर्ज मद्रासेहून, १६ चिंगलपट ...न, ६० तंजावर, ३१ मुंबई इलाखा, ९ कोईमटूर, ८ उत्तर अर्काट, व बाकीचे सिंहलद्वीप, अयोध्या, पंजाब, वगैरे प्रांतांतून आले. सदर्हू अर्जांपैकीं ६३ अर्ज ब्राह्मणांचे होते, २९ पार्शांचे होते, १२ वाणी लोकांचे व बाकी इतर दुसऱ्या जातीचे होते. या इलाख्यांतून एकंदर ३१ अर्ज गेले व सर्व अर्जांपैकीं ६३ ब्राह्मणांचे व २० पार्शांचे होते यावरून स्पष्ट दिसून येत आहे कीं, शेतकीचा धंदा शिकण्याची पुष्कळ लोकांची इच्छा आहे इतकेंच नाहीं परंतु तो शिकण्याची चांगल्या स्थितींतील लोकांचीही इच्छा आहे. शेतकीच्या धंद्यास विशेष पैसा लागत नाहीं, तथापि अगदीं लागत नाहीं असें नाहीं. विहिरी खणणें, तलाव बांधणें, व बांध घालणें, हीं कामें पैशावांचून होत नाहींत. युरोपखंडांत ज्या प्रकारचा शेतकीचा धंदा चालतो त्यासही बराच पैसा लागतो. थोड्या पैशांच्या लोकांस हल्लीं धंदे रोजगाराची मोठी अडचण आहे. तर मद्रास इलाख्यासारखें या इलाख्यांत कालेज स्थापन केलें असतां एक नवीन प्रकारचा धंदा उत्पन्न झाल्यासारखें होणार आहे. ज्या प्रकारच्या लोकांकडून सदर्हू अर्ज झाले आहेत ते लोक आमचे इकडील हल्लींच्या पुष्कळ शेतकऱ्यांप्रमाणें अगदीं निर्द्रव्य नसतात, नव्या तऱ्हेच्या शेतकीस प्रथमतः लागणारें सामान घेण्यापुरती त्यांस शक्ति असते. तर अशा प्रकारच्या लोकांचे हातून नव्या प्रकारच्या शेतकीच्या धंद्यास सुरुवात झाली तर जमिनीची सुधारणा होईल इतकेंच नाहीं परंतु इतर शेतकरी लोकांसही शिक्षण दिल्यासारखें होणार आहे. हिंदुस्थानच्या एकंदर उत्पन्नापैकीं सुमोरें ५क त्रितियांश उत्पन्न जमिनीपासून आहे, तर या उत्पन्नांतून दर वर्षास प्रत्येक इलाख्यांत लाख दोन लाख रुपये खर्च केले असतां फार आहेत असें नाहीं. अशा प्रकारचे खर्च झालेले रुपये व्यर्थ जावयाचे नाहींत. कारण प्रथम जमीन सुधारेल, जमीन सुधारली ह्मणजे माल पुष्कळ उत्पन्न होईल. माल पुष्कळ उत्पन्न झाला ह्मणजे अर्थांतच शेतकऱ्यांची स्थिति सुधारेल व असें झालें ह्मणजे राज्याचें उत्पन्न सहज वाढेल. ने. ओ.

हे पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापुन प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुतस्क १२ | अकोला, रविवार ता० २९ माहे सप्तंबर सन १८७८ इसवी. | अंक ३९


## विनंति

कांहीं आजारसंबधोंन-घरगुती व कांहीं कामाच्या संबंधानें छापखान्याकडील विशेष हरकतींमुळें आजचें पत्र निघण्यास पुष्कळ अवकाश झाला यानबद्दल आश्रयदात्यानीं माफी करावी,

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

---


## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | . |
| वर्षाचें अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणांर लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

---

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

---

## विक्रीस तयार दिवाणी कामाच्या वहिवाटीच्या जाहिराती.

नव्या दिवाणी कायद्याच्या अनुरोधानें वहिवाटांकरितां अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं वऱ्हाडास लागू करावयाच्या जाहिराती रेसिडेंट आर्डरमध्यें छापून प्रसिद्ध केल्या व त्याचें मराठी भाषांतर मे. जुडिशीयल कमिशनर साहेब यांनीं ताब्यांतील सर्व कोर्टांकरितां आपले आफिसांत तयार करवून छापिलें त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. त्यांची किंमत सहा आणे व बाहेर गांवीं मागणारास अर्धा आणा डाक हशील पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक


---

## नोटिसा.

गोविंद रामचंद्र उर्फ रघुनाथराव मुखत्यार रहाणार पेठ उमरावती यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे तुह्माकडे कर्ज रोख्यावरून रुपये १०० घेणें होतें तें आह्मांस न देतां तुह्मी वसूल दिल्याची प्रमोदसिंधु छापखान्यांतून मला बुडविण्याचे इरादानें व लबाडीनें खोटी नोटिस तारीख १९ माहे आगष्ट सन १८७७ इसवीचे अंकांत दिली आणि तारीख २८ मिनहू रोजीं मी दिलेली नोटिस खोटी आहे असें तुह्मी आह्मास स्वदस्तुरचे सहीसुद पत्र पाठविलें परंतु ती नोटिस प्रसिद्ध झाल्यानें सर्व लोकांत माझी बदनामी झाली सबब मला त्याजबद्दल योग्य तजवीज करणें आहे.

दुसरें, वर लिहिलेले रुपयाबद्दल मी उमरावती एथील स्मालकाज कोर्टांत फिर्याद केली नंतर तुह्मी त्याजबद्दल कांहीं एक उत्तर न करतां रुपये कोर्टांत भरले ते मीं कोर्ट मार्फत घेतले आणि बालाजी व मी मिळून तुह्मास कुलमुखत्यारपत्र दिले होते परंतु तुह्मी मोफिसल कंपनींत नोकर असून व शिवाय कृष्णाजी भुसारी, लुलाजी आसरेकर, परशरामराव वल्लद बापूजी पाटील पुसदेकर वगैरे आणिक लोकांचेही सालियानें ठरवून कुलमुखत्यारपत्रें घेतलीं आणि त्यांचीं कामें कमिशनर साहेब बहादूर यांचे कोर्टांत सुद्धां चालवीत आहा असा तुह्मी सारा घोटाळा केल्यामुळें माझ्या कामावर अगदी मेहनेत घेतली नाहीं. आमचे कडून जानोजीचे मुकदम्यांत करारनाम्याप्रमाणें तुह्मी पुढें दोन कोर्टांत मुळींच हजर झाला नाहीं सबब वेळवर आह्मास दुसरा वकील करावा लागला हा करार तुह्मी मोडल्यामुळें या कामाबद्दल अगोदर तुह्मी रुपये आह्मापासून शंभर घेतले ते वापस चार दिवसांत देऊन आमची रसीद घ्यावी याप्रमाणें तुह्मी न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज करीन.

आह्माकडून तुह्मी मुखत्यार असल्यामुळें आमचा तुह्मावर फार भरवसा होता परंतु तुह्मी आह्मास धोके देऊन गैरशिस्त रीतीनें विनाकारण पुष्कळ रुपये खाऊन गेलात याजबद्दल ठकबाजी केल्याची फिर्याद करीत आहों कळावें तारीख २९ सप्तंबर सन १८७८ इसवी.

( सही ) परशराम दवलतजी देशमुख
मुकद्दम प्रगणें पुजद
दस्तुर खुद्द

---

नोटिस.

सरदारखा वल्लद उमरखा मुसलमान रहाणार मौजे एकलासपुर प्रगणें रिसवड तालुके वाशीम जिल्हे मजकूर यास सनईराम दुलीचंद मारवाडी साहू दुकान मोटेगाव प्रगणें रिसवड तालुके वाशीम जिल्हे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मास संवत १९३३ सालीं कुसुंबा एक मण देऊन दाम घेऊन गेला त्यास आज दोन वर्षें झालीं अद्याप पावेतो दिला नाहीं तर सदर्हू कुसुंब्याचे वाढीबद्दल एक मण व एक मण मुद्दल एकुण दोन मण याचे १२ रुपये नोटिस पावले तारखेपासून आठ दिवसांच आंत येऊन निकाल करावा नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज करून नोटिसीचे खर्चासुद्धां सर्व पैसा घेतला जाईल कळावें तारीख २ सप्तंबर सन १८७८ इसवी.

( सही ) सनईराम दुलीचंद वहिवाटदार रघुनाथ दस्तुर खुद्द

---

नोटिस.

लोडजी ( बापाचें नांव माहित नाहीं) आडनाव ह्मणक रहाणार मौजे मांगूळ प्रगणे सिरपुर तालुके वाशिम यास सनईराम दुलीचंद मारवाडी साहू दुकान मौजे मोटेगांव प्रगणे रिसवड तालुके वाशिम याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मास दोंडगाव मापाचे गहू •११ अक्षरी अकरा मण विकत दिले पैकी दहा मण आह्मास मोजून देऊन एक मण तुह्माकडे येणें राहिले व त्याची वाढ आठ पायली येकूण दीड मण गहू येणें आहेत ते ही नोटिस पावले तारखेपासून आठ दिवसांचे आंत उलगडा करून द्यावा. नाहीं तर रीतीप्रमाणें तुमचेवर फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां पैसा घेतला जाईल. कळावे. तारीख २ माहे सेप्तेंबर सन १८७८ इसवी.

[सही ] सनईराम दुलीचंद
वहिवाटदार रघुनाथ

---

नोटिस.

नयाजी ( बापाचें नांव माहित नाहीं ) आडनाव साभळे रहाणार मौजे गोभणी प्रगणे रिसवड तालुके वाशिम यास सनईराम दुलीचंद मारवाडी साहू दुकान मौजे मोटिगाव प्रगणे रिसवड तालुके वाशिम याजकडून देण्यांत येते कीं, तूह्मी आह्मास गहू मण पांच विकत दिले व नगदी रोख रुपये घेऊन जाऊन वाढीनें देऊं ह्मणून सांगितलें ते गहू अद्यापपावेतो दिले नाहींत तरी सदर्हू गहू वाढीसुद्धां साडेसात मण दोंडगांव मापी ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत रीतीप्रमाणें व्याजासुद्धां द्यावे न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज करून नोटिसीच्या खर्चासुद्धां पैसा घेतला जाईल. कळावें तारीख २ माहे सेप्तेंबर सन १८७८ इसवी.

( सही ) सनईराम दुलीचंद मारवाडी
वहिवाटदार रघुनाथ.

---

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. मोझरी हा गाव सुमारें ४०० घरांची वस्ती असून यांत सरकारी शाळा आहे. या शाळेला कमिटी नाहीं तरी गावांतील कांहीं संभावित लोकांचे शाळेकडे बरेंच लक्ष आहे. यांनीं जुलै महिन्यांत शाळेंत सभा करून शाळेला कांहीं सामान घेण्याचे उद्देशानें ३० रुपये वर्गणी करून दिली. या कामांत रा. रा. गोविंद नागोराव मुससरीम प्रगणें कुऱ्हे व एथील पाटील रा. रा. चंद्रभान रावजी यांणीं पुढारीपणा केला हें त्यांस भूषण आहे. याच प्रमाणें ते शाळेंत मुलांची संख्या जास्त वाढवतील तर त्यापासून लोकांचा ( अज्ञानांत बुडालेल्या ) विशेष फायदा होणार आहे. शाळेला उत्तम सामान असल्यापासून दिखाऊ शोभा चांगली येते. परंतु वास्तवीक पाहिलें असतां शाळेंत मुलांची संख्या चांगली असून त्यांचा अभ्यास जर चांगला मार्मीक असला तर खरोखर शाळेस शोभा येणार आहे. परंतु अलीकडे वर्गणी करून नावें छापून आलीं ह्मणजे कित्येक लोक संतोष मानून स्वस्थ बसतात, त्यानीं या गोष्टीकडे विशेष लक्ष्य द्यावें

पूर्वींचा दोन वर्षाच्या अगोदरची व हल्लींची शाळाखात्याची स्थिति पहातां बरेंच अंतर पडलें आहे. लोकांस शिक्षण चांगलें समजुतीचें व विचाराचें मिळूं लागलें आहे. लोकांस विद्येची गोडी लागून शाळेंत मुलांची संख्या वाढण्याची व वक्तशीर हजर रहाण्याची कांहींसी तजवीज झाली आहे परंतु सर्वत्र जशी व्हावी तशी होत नाहीं. पाटील कुळकर्णी जे पुढें नेमिले जातील त्यांची शाळाखात्याची ४थी ५वी यत्ता झाल्याचा दाखला असल्याशिवाय त्यांस कामावर नेमू नये असी जर सरकार तजवीज करील तर कांहीं जास्ती फायदा होण्यासारखा आहे. वऱ्हाडचे शाळाखात्याचे अधिकारी इकडे लक्ष्य देतील अशी आशा आहे.

आपला सेवक क्ष.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

बाळापुर एथील शाळेंच कमिटीचे अध्यक्ष रा. रा. अच्युतराव पुरुषोत्तमराव देशपांडे यांनीं तेथील शाळेंत बंद झालेलें इंग्रजी शिकणें पुन्हा सुरू करण्याविषयीं मे० गोविंदराव यशवंत तहशिलदार यांजकडेस रिपोर्ट केल्यावरून त्यांनीं तो आपल्या अभिप्रायासह लोकाहितार्थ बुद्धीने आपले वरिष्ठाकडे केल्यावरून त्याजबद्दलचा पोक्तविच्यार आमचे विद्याखात्याचे कनवाळु रा. ब. नारायण भाई डायरेक्टर साहेब यांनीं करून येथील शाळेंत पुन्हा इंग्रजी शिकणें तारीख १ माहे अक्टोबर सन मजकूर पासुन सुरू करण्याविषयीं हुकूम फरमाविल्याचे व तेथील शाळेवर हेड मास्तर नेमल्याचें ऐकून संतोष झाला, त्याचप्रमाणें शाळेंतील मुलांनीं आभार मानून ज्या दिवशीं ही बातमी ऐकिली त्या दिवशीं त्यांनी आपले शक्त्यनुसार आनंद प्रदर्शित केल्याचेंही ऐकतों.

ग्रामहितेच्छु एक बाळापुरकर क्ष.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. पत्रकर्ते महाराज महामारीचा पुनः ऊद्भव झाला असें वाटत आहे. आमचे गावचे जुने जुने लोक असें ह्मणतात कीं, अशी पर्जन्यवृष्टि आज पन्नास वर्षांत झाली नाहीं व असा महामारीचा उपद्रव ह्या गांवीं कधींच झाला नव्हता. सन १८७५ सालांत एथे वेचा फैलाव झाला होता. व तो फार कडाक्याचा असे लोक ह्मणत होते पण सालमजकूरच्या रोगानें त्यावर वर्चस्व मिळविलें. तात्पर्य पुढें येणारा दिवस मागें गेलेल्यास सुखाचा ह्मणवू लागतो अशी सांप्रतची स्थिति आहे. पांच सहा दिवसांपासून पावसानें पुनः सुरुवात केली. गारांचा वर्षाव व्हावा तसा मोठ्या जोरानें पाऊस पडतो. शेतें अगदीं बिघडत चाललीं. जवारी, बाजरी, उडीद वगैरेचे पिकांचा येण्याचा रंग दिसत नाहीं. पाऊस पडूनही पुढें दगदग भोगावी लागते कीं काय अशी लोकांनां भीति उत्पन्न झाली आहे. दिवसें दिवस फार महागाई होत चालली आहे. या गांवांत पंचांग पहातां आलें ह्मणजे आह्मी उत्तम ज्योतिषि आहोत असें समजणारे ब्राम्हण पुष्कळ आहेत. हे नानाप्रकारच्या कंड्या उठवितात कीं, आश्विन मासीं मनुष्यांनां फार फार यातना भोगाव्या लागणार आहेत. या पंचांगजोशांच्या सांगण्यावर भरवसा ठेवून लोक विनाकारण भयाभीत होतात. मागें आपल्या पत्रांत एका महाविद्वान चिफानीं या वर्षीं पाऊस पडणार नाहीं म्हणून ज्योतिष सांगितलें होतें. तें कांहीं तरी खरें झालें काय? त्यांच्या अशा सांगण्यामुळें लोक मात्र बरेच भ्याले होते. पूर्वीं या गांवीं १८ शास्त्री शास्त्रांत निपूण पूर्वपक्ष उत्तरपक्ष करण्यासारखे हाते. तसेच वैदिकही चांगले होते. आतां तो विद्येचा प्रभाव जाऊन नुसते नांवाचे शास्त्री राहिले आहेत. ब्राम्हणकर्माचा तर अगदीं ऱ्हास झाला, हें आमचें दुर्दैवच समजलें पाहिजे. सालमजकुरीं श्रावणी म्हणून श्रावणी पौर्णिमेस वर्षामध्यें केलेल्या पापाचें क्षालन होण्यासाठीं प्रायश्चित घेतात, तें मंत्रतंत्र चालविण्यास कोणी नस त्यामुळें राहिलें. एथें ब्राह्मण ज्ञातीचीं घरें ३०—३५ आहेत. ह्यांत कांहीं गृहस्थांचीं व कांहीं भिक्षुक लोकांचीं आहेत असें असतां श्रावणी संबंधीचे याज्ञिक न येणें ह्मणजे किती दुःखाची गोष्ट आहे बरें? छचोरपणा करण्यांत हरएक इसम पुढारी होतो, परंतु आपल्या धर्माच्या कामात कोणीच चित्त घालीत नाहीं. या विषयीं आमच्या बंधुवर्गाला कांहीं सूचना करावयाच्या आहेत, त्या सवडीअंतीं पुढें पाहूं.

बाजारबैठकीच्या भाडे देण्याघेण्याबद्दल गेल्याच्या मागल्या सोमवारीं मारामारी झाली असें ह्मणतात. ज्यानें बाजाराचें लिलाव घेतलें तो बैठकीचें एका स्त्रीपाशीं भाडें मागत होता. तिनें तें दिलें नाहीं. सबब मक्तेदारानें तिच्या तोंडांत मारली अशी गुल उठली आहे. या आरोपाबद्दल तिनें तहशिलदार, तालुके चिखली यांचेकडे फिर्याद केली आहे, निकाल अजून झाला नाहीं.

दुःखाची गोष्ट— रा. रा. रामकृष्ण नाना देशपांडे हे २० वे तारखेस मरण पावले. यांचें वय सुमार ६४ वर्षांचें होतें. १५ दिवसपासून यांस ताप व हगवणीचा उपद्रव झाला होता. तरी मरण कालपर्यंत हे खडखडीत बोलत होते. यांचा अंत मोठ्या शांततेनें व शुचिर्भूतपणानें झाला. हे मोठे नेकीचे, नाव लौकिकास जपणारे, गरीबांचे कनवाळु व हिम्मतवान असून उत्तम धर्मनिष्ठ होते. मोगलाई अमलांत देऊळघाट परगण्याची मोहरिरी यांजकडेस होती. हें काम वदुसरीं कित्येक कामें यांनीं नेकीनें करून वरिष्ठाची मर्जी चांगल्या प्रकारें संपादिली होती. ववऱ्हाडांतच काय पण हैदराबादपर्यंत त्यांचा चांगला नावलौकिक होता. यांच्या हातून कधीं कोणाचें नुकसान झालें नाहीं. इंग्रजी अमलांतही यांचा चांगला वोज असे. यानां युरोपियन अधिकाऱ्यांकडे खुर्ची मिळण्याचा मान होता, व विद्येच्या कामीं यांनां फार गोडी होती. आलीकडे २।३ वर्षें यांचें सर्व चित्त ईश्वराकडे लागलें होतें. सर्वकाल जपजाप्य करून पोथ्या पुस्तकें वाचीत असत. यांनां ३ पुत्र आहेत त्यांतील वडील चिरंजीव योग्य असून कामाकाजांत वाकबगार आहेत.

या देऊळघाटांत हेव नबाबबिसमिल्लाखान व जयाजी देशमुख हे तीन पुरुष चांगले विद्वांत असे च्यार महिन्यांत मरण पावले. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

आपला सेवक
एक देऊळघाटस्थ.

# वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन शुक्ल ३ शके १८००

## काबूलप्रकरण.

आह्मास वाटतें कीं सर्वत्र शांतता असावी, कोठें दंगा धोपा असू नये, गडबड असू नये, कोणी कोणाच्या हक्कास व्यत्यय आणू नये, व सर्व सुरळीत चालावें, पण असें थोडेच घडतें! अपमतलबानें व अन्यायाने मनुष्यें भांडण कधीं कधीं उकरून काढतात व तेणेंकरून आपण बुडून संसर्गानें दुसऱ्यासही बुडवितात!

मनुष्याप्रमाणेंच राष्ट्रांची स्थिति आहे व ती तशी कशी नसेल? मनुष्यांचा जमाव हेंच राष्ट्र आहे तेव्हां त्यांचेच नियम त्यांत चालणारे. कांहीं राष्ट्रें लढाया उकरून काढतात, मग स्वस्थ बसण्यांत अपकीर्ती, नामर्दी व नुकसान असतें ह्मणून दुसऱ्या राष्ट्रास त्यासी सामना करणें भाग पडतें. रशिया देशाची सांप्रतची स्थिति सदरील प्रमाणें दिसते. युरोपांत तुर्कस्थानाशी कळ काढून त्यानें मोठेंच युद्ध केलें व शेवटीं साऱ्या राष्ट्रांस मध्यस्थींत पडून त्याची मिटवामिटव करावी लागली. त्याला थोडे दिवस झाले नाहींत तोंच हें अलीकडे काबूलप्रकरण उपस्थित झालें. व यांत रशियाचेंच अंग आहे असें बहुत लोकांचें ह्मणणें आहे.

काबूलचा अमीर शहाणा असावा असें त्याच्या कर्तबगारीवरून कांहीं दिसत नाहीं, त्यानें मागें तुर्कस्थानच्या सुलतानास पत्र लिहिलें होतें व सुलतानानें त्याचा जबाब दिलेला प्रसिद्ध झाला होता त्यावरून तो इंग्लिश सरकाराशी विरोध करितो व रशियन सरकार त्याला फार आवडतें असें दिसतें. व एवढें तो मनांत वागवूनच स्वस्थ बसता तर इंग्लिश सरकारास त्याचें नांव काढण्याची आज कांहीं गरज नव्हती, पण तो उघडाळीच्या प्रकरणांत शिरला व तसें त्यास वागूं दिलें असतां आपल्या हिंदुस्थानांतील राज्यास त्याचा संसर्ग लागणार आहे सबब तो नाचवील तसें थेर त्यास नाचूं द्यावयाचें नाहीं ह्मणून इंग्लिश सरकार प्रस्तुत त्यावर कंबर बांधीत आहे.

काबुलांत इंग्लिश सरकारचा रेसिडेंट नाहीं, रशियाची कुटिलता, हिंदुस्थानाविषयीं मत्सर व त्यावर त्याचा डोळा, आणि त्याला वाटेंत काबूल देश सोयीचा या गोष्टी पाहून इंग्लिश सरकार बऱ्याच दिवसांपासून इच्छितें कीं त्या देशांत आपली पैरवी असावी. व याबाबद कित्येक वेळां वाटाघाटी झाल्या पण गोष्ट जमून आली नाहीं. इतक्यांत अलीकडे वर्तमान समजलें कीं रशियानें काबूलांत आपला मुत्सद्दी पाठविला व त्याचा तेथें बहुमान होऊन दोघा राष्ट्रांचें मेतकूट जमत चाललें. सबब हिंदुस्थान सरकारास वाटलें कीं या वेळीं आपलें कांहीं मुत्सद्दीमंडळ काबूलच्या अमिराकडे पाठवावें व सर्व गोष्टींचा खुलासा करून घ्यावा. ह्मणून त्यांनीं सर चार्लस निविल मद्रासचे सेनाधिपति यांच्या बरोबर दुसरे कांहीं चतुर लोक व थोडी फौज देऊन तिकडे पाठविलें होतें. व ते मागाहून येताहेत अशी वर्दी अमीरास पोंचविण्याकरितां एक मुसलमान सरदार अघाडीस पाठविला होता तो अमीरास भेटून त्याचें पत्र यावें व वाटेंत सेनाधिपतीस सन्मानपूर्वक आदरोपचार व्हावे व कोणी कांहीं हिल्ला हरकत करू नये ह्मणून अमीराचीं आज्ञापत्रें त्याच्या मुलखांत फिरतील अशी वाट पहात गेलेलें मंडळ ब्रिंटिश राज्याच्या हद्दीवर पेशावरापासून थोडें पुढें जाऊन मुक्काम करून राहिलें होतें. व अघाडीस गेलेल्या हिंदुस्थान सरकारच्या सरदाराचा अमीरानें बहुमान केला अशा खबराही आल्या होत्या त्यावरून सर्व सुरळीत होईल असें वाटत होतें पण तसें कांहीं घडून आलें नाहीं. सबब रवाना झालेलें मंडळ पुढें जाऊ देणें निर्भय नाहीं असें समजून हिंदुस्थान सरकारानें त्यास मागें बोलाविलें. व ते परत आले.

आतां त्या रोखावर दहा वीस हजार फौज रवाना करण्याची कडेकोट तयारी होऊन राहिली आहे. कोणी ह्मणतात काबुलावर स्वारी होणार, कोणी म्हणतात त्याचे हद्दीवर शह देऊन त्यास दरारा उत्पन्न करणार, व पुढें तो कसा वागतो तें पहाणार.

अमिरानें या कृत्याच्या योगें ब्रिटिश सरकारचा मोठा अपमान केला सबब त्याची खोड मोडून सरकारानें आपला प्रभाव त्यास जरूर दाखविला पाहिजे व त्याकरितां ही तयारी अवश्य आहे असें विलायतेपर्यंत बहुत लोक म्हणत आहेत. तेव्हां आतां पुढें काय होतें पहावें.

## अकोल्याची मुलींची शाळा.

आमचे वाचकांस ठाऊक असेल कीं एथें मुलींची शाळा मराठी १ व हिंदुस्थानीं २ अशा तीन होत्या परंतु दुःखाची गोष्ट कीं, प्रस्तुत त्या सर्व लयास गेल्या आहेत. या निमशाई शाळा होत्या ह्मणजे सरकारांतून अर्धा खर्च व म्युनिसिप्यालिटी कडून अर्धा खर्च त्यांनां मिळत असे. अकोल्यास मुलींची शाळा होऊन दहा वर्षें झालीं पण तिला सुस्थिति कधींच आली नाहीं व म्युनिसिप्यालिटीनें आपली गरीबी व शाळांची वाईट स्थिति मनांत आणून पैसा देणें बंद केलें त्यामुळें निरुपाय होऊन त्या शाळा विद्याखात्याकडून बंद झाल्या.

हल्लीं संतोषाची गोष्ट अशी समजते कीं, एथील पुढारी मंडळी मुलींच्या मराठी शाळेची पुनरपि स्थापना फार लवकर करणार आहे. त्यांनीं फंड जमविण्याची तजवीज केली व कोणत्या व्यवस्थेनें कसें काम चालवावयाचें त्याची योजना केली आहे. आमची इच्छा आहे कीं, ही इमारत आतां तरी मजबूद पायावर उभारली जाईल. व शाळा बुडण्याला जीं कारणें पूर्वीं झालीं असतील तीं पुन्हा उत्पन्न न होण्याच्या कामीं मंडळी योग्य काळजी घेईल.

रा. ब. नारायण भाई दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर यांणीं विद्याखात्याच्या रिपोर्टावरील आमचा मागला निबंध पाहून मुलींच्या शाळेच्या संबधानें आम्हास पत्र लिहिलें आहे. ते ह्मणतात कीं हें काम लोकांच्या मदतीचें आहे. म्युनिसिप्यालिटीनें पैसे देण्याचें बंद केलें सबब मुलींच्या शाळा बंद झाल्या. अजूनही म्युनिसिप्यालिटीची, लोकलफंडाची, अथवा लोकाश्रयाची मदत मिळेल तर सरकारांतून पूर्ववत निमा खर्च देवविण्याची तजवीज होईल. त्यांनीं ह्मटलें आहे कीं, म्युनिसिप्यालिटींत नेटिव मेंबरांची संख्या अधिक असतां शाळेला पैसा देण्याचें बंद करण्याबद्दल सर्वांबरोबर त्यांचें एकमत झालें होतें. खरेंच ही गोष्ट आह्मी ऐकिली आहे. पण तिच्या पूर्वींची आह्मास अशीही माहिती आहे कीं मुलींच्या शाळा चांगल्या चालत नाहींत अशाबद्दल विद्याखात्याकडून कित्येकदां कमिटीकडे गिल्ला आलेला होता. व तिच्या जवळ पैसेही नव्हते तेव्हां सहजच त्या बंद कराव्या असें बहुमत पडलें. यांत आश्चर्य मानण्यास रखें नाहीं. अस्तु.

राव बहादुर नारायण भाई पुनरपि या सत्कृत्याची उभारणी झालेली पहाण्यास उत्सुक आहेत. व आह्मी तिजबद्दल खटपट करावी असें ते चहातात. त्याचप्रमाणें आपण खासगींतून १०० रुपये बक्षीस किंवा २ रुपये दरमहाची वर्गणी देऊं इच्छितों असेंही त्यांनीं पत्रांतून आह्मांस कळविलें आहे. या त्यांच्या सहाया बद्दल व शुभेच्छे बद्दल सर्व ग्रामस्थांच्यावतीनें आह्मी रा.ब. यांचे आभार मानितों. व त्यांच्या या उमेदींच्या सूचनेवरून एथील मंडळींनीं त्वरा करून मुलींच्या शाळेच्या पुन: संस्थापनेचा विचार केला ही संतोषकारक गोष्ट त्यांस अगत्यपूर्वक कळवितों.

## सुरेतच्या पत्रकर्त्यांवरील खटला.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं गेल्या आठवड्यांत आम्ही शेवटीं अजमास केल्याप्रमाणें स्पेशियल जडज मि० पोलन साहेब यांचा ठराव होऊन एकंदर सर्व आरोपी दोषमुक्त करून सोडून दिले. या साऱ्या प्रकारणावरून एकंदरींत असें दिसून आलें कीं, दुष्ट व दुस्मान लोकांनीं या आरोपी झालेल्या भल्या लोकांचा केवळ छळ करण्याचे इराद्यानें अकटोविकट खटपट केली. व परम साहसी व उत्ताढाली मोतीलाल पोलिस इन्स्पेक्टर यांणीं आपली शिकार साधण्याच्या व नांव मिळविण्याच्या उद्देशें या लोकांच्या अब्रूवर घाड घालण्यास कंबर बांधिली. पण शेवटीं त्याचा परिणाम काय झाला! पोलिसाची फटफजीती होऊन एकंदर खटला तयार करणारांचा उपहास झाला. सरकाराला हजारो रुपये खर्च आला व आरोपी तर सर्वस्वी नागवले; तरी शेवटीं न्यायानें त्यांस आपला सोज्वल हस्त दिला. हेंच त्यांचे मुख्य धन शिल्लक राहिलें ह्मणून संतोष मानावयाचा; कारण "मानोपिमहतांधनं" असें ह्मटलें आहे. सोलापुरासही रेलवे मुकद्दम्यांत पोलिसानें कशी भालेराई केली होती ती वाचकांस आठवत असेल. तर हीं दोन ढळढळीत उदाहरणें पाहून सरकारानें यापुढें तरी अशा उन्हा पाण्यानें घरें जाळण्याच्या दुष्टखटपटी पोलिसाकडून होणार नाहींत याविषयीं खबरदारी घ्यावी. तसें न झाल्यास त्यांत सरकारासही दूषण लागण्याजोगें आहे. कांहीं साक्षीदारांवर खोट्या प्रतिज्ञेचे मुकद्दमे करण्यासही सेशन जडजानीं परवानगी दिली आहे त्याप्रमाणें घडून आल्यास त्यांची चांगली खोड मोडेल. व तशा प्रकारच्या दुसऱ्या लोकांस तें उदाहरण होईल.

## आगबोट बुडून भयंकर नाश.

विलायतेंत प्रिन्सेस अलाइस नावाच्या आगबोटींतून लंडनाहून सप्तंबरचे ३ रे तारखेस ११ वाजतां सुमोर ८०० मनुष्यें स्त्रिया, मुलें यांसहवर्तमान हवा खाण्याकारितां ग्रेवसेंड एथें गेलीं होतीं व तिकडून संध्याकाळचे ६ वाजतां त्याच आगबोटींतून परत यावयास निघालीं ती उलविचचे नवळ आली तों ८ वाजण्याचे सुमारास समोरून दुसरी आगबोट येऊन दोघींची टक्कर झाली त्याबरोबर अलाइस ही आगबोट तळी गेली. तेव्हां ज्यांनां पोहोता येत होते, व ज्यांनां बोटीचा वगैरे कांहीं आश्रय मिळाला त्याच्या योगानें सुमार सवाशें मनुष्यें कडेला लागलीं व बाकीं पुरुष, स्त्रिया व लहानलेकरें सर्व मिळून सहा सातशें मनुष्यें बुडून मरण पावलीं! कित्येक लोक तर आपल्या सर्व घरखटल्यासुद्धां गेले होते ते सारेच्यासारेच मरण पाऊन त्यांच्या घरांचे नक्षल झालें. व पुष्कळ घराण्यांची विसंगती झाली व सर्वत्र शोक पसरला. चक्रवर्तिनी साहेबांस हें वर्तमान समजलें तेव्हां अत्यंत दु:ख झालें व त्यांनीं निराश्रितांस व दु:खितांस सहाय देण्याची तजवीज करविली. लार्ड मेयर हे अनाथ झालेल्या लोकांकरितां वर्गणी जमवीत आहेत. ईश्वर असा प्रसंग कोठें न आणो.

## रेसिडेंट साहेबांचे आभार.

अलीशान रेसिडेंट साहेब यांजकडून या आठवड्यांत या प्रांतांतील वेगवेगळ्या खात्याचे गेल्या सालचे पांच रिपोर्ट छापलेले आह्मांस नजर आले आहेत त्यांकरितां आह्मी त्यांचे आभार मानितों. ते रिपोर्ट येणेप्रमाणें.

१ जुडिशियलखात्याचा रिपोर्ट.
१ पोलिसखात्याचा रिपोर्ट.
१ जेल रिपोर्ट ( तुरुंगासंबंधी )
१ विद्याखात्याचा रिपोर्ट.
१ रेजिस्ट्रेशनखात्याचा रिपोर्ट.

५

हे प्रत्येक रिपोर्ट त्या त्या खात्याचे मुख्याधिकाऱ्यांनीं केलेले असून त्यांवर कमिशनर साहेबांचे अभिप्राय व रेसिडेंट साहेबांचे अभिप्राय आहेत.

हल्लीं आमच्या वऱ्हाडाला अधिकारी चांगले मिळालेले आहेत. डायरेक्टर, स्यानिटरी कमिशनर, इन्स्पेक्टर जनरल पोलिस, जुडिशियल कमिशनर, मुख्य कमिशनर व सर्वांवर रेसिडेंट साहेब हे लोकांच्या सुदैवानें फार उत्तम आहेत. याजबद्दल त्यांचीं कामेंच त्यांची साक्ष देताहेत. विद्याखात्याच्या रिपोर्टाचे संबंधानें दोन आठवड्यांपूर्वीं आह्मी लिहिलें आहे. त्यावरून या गोष्टीचा खुलासा वाचकांस चांगला झाला असेल. बाकीच्या विषयींही पुढील आठवड्यापासून आह्मी लिहूं लागूं तेव्हां त्या त्या गोष्टी व्यक्त होतील.

रेसिडेंट साहेबास कामें पुष्कळ आहेत तीं सर्व ते दक्षतेनें करून आह्मां पत्रकर्त्यांस सहाय करण्याविषयींही ते काळजी घेतात ही फार मोठी गोष्ट होय. व या फक्त रिपोर्ट पाठविण्याच्याच संबंधानें आह्मी हें ह्मणतों असें नाहीं. कित्येक प्रसंगीं वेगवेगळाले विषय लिहिण्याच्या संबंधानेंही त्यांनीं आह्मांस उपयुक्त सूचना केल्या आहेत व तेणेंकरून आमचे लेख सुधारले आहेत सबब त्याजबद्दल आह्मी त्यांचे आभार मानणें फार अवश्यक होय असे कोणासही वाटल्या वाचून रहाणार नाहीं.

## दिवाणी जाहिरात.

नंबर १२२

ता. १८ सप्तंबर सन १८७८ इसवी सन १८७७चा आक्ट १० ( दिवाणी काम चालविण्याचे रीतीविषयीं कायदा ) यांतील कलम ३२० चे आधारें रेसिडेंट ह्यानीं हिंदुस्थान सरकारचें पत्र नंबर १२३३ ता. १ माहे सप्तंबर सन१८७८ यांत दिलेल्या मंजुरीवरून असा ठराव केला आहे कीं मुलुक अमानी हैदराबाद एथील क्षेत्रामध्यें ज्या मुकद्दम्यांत, शेतकीचे कामास लाविलेल्या जमीनींतील किंवा अशा जमीनीचा प्रतिबंदी समई जो सत्ता प्रकार मानलेला असेल त्याजवरून कबज्यांत घेतलेल्या जमीनींतील कोणताही हक्क संबंध किंवा घरें, किंवा ज्या स्थावर मिळकती संबंधी जमीन किंवा हक्कसंबंध शेतकीचे कामास लाविला असेल अशी इतर स्थावर मिळकत, विकण्याचा हुकूम एकादे कोर्टानें केला असेल त्या मुकद्दम्यांतील हुकुमनाम्याची बज्यावणीं जिल्ह्याचे डिपुटी कमिशनराकडे निकालासाठीं दिली पाहिजे.

## वऱ्हाड.

या आठव्ड्यांत हवेचें मान बरेंच ताक्यावर आलें आहे. शेवटच्या ४ दिवसांत पाऊस अगदी नाहीं. ऊन चांगलें पडत आहे. व रोगराई विषयीं विशेष बोभाटा नाहीं. पण थोडथोडी सुरू आहे.

मि० जोन्स साहेब कमिशनर एथेंच आहेत. शुक्रवारीं व शनिवारीं ते डिपुटी कमिशनर आफिसांत खजिना, पेपरकरेन्सी वगैरे तपासण्यास गेले होते.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर उमरावतीस गेले आहेत.

उमरावतीचे डिपुटी इजूकेशनल इन्स्पेक्टरचें काम पहाण्यास रा. रा. गोविंद विश्वनाथ भावे तेथील मिडल क्लास स्कूलचे हेडमास्तर यांस आफिशिएटिंग नेमलें आहे.

मंगळवारीं मोठ्या सपाट्याचा पाऊस पडून वीज पडली. व तेणेंकरून बाभूळबनांत एक दोन गुरें मेलीं.

वसूलबाकीच्या कामीं कांहीं नवीन नियम झाले आहेत त्यांची समजूत देण्यासाठीं डिपुटी कमिशनरांनीं सर्व तालुक्याचे नायब तहशिलदार एथें बोलाविले आहेत.

महामारीचा उपद्रव अजून जारी असल्यावरून स्यानिटरी कमिशनरच्या मतावरून कमिशनर साहेबांनीं देऊळगावचे यात्रेला या वर्षीं लोकांनीं जाऊं नये असे जाहिरनामे प्रसिद्ध केले आहेत.

पोलिसचे व रेजिस्ट्रेशनचे इन्स्पेक्टर जनरल एथें आले आहेत.

स्यानिटरी कमिशनरांनीं देवीखात्याकडे ३ उमेदवार नवीन भरले व त्या जागा इस्पितलमधील कपांउंडर लोकांस दिल्या.

रिसवडकडे हाकमारी रोग उद्भवला आहे व वाशिमाकडे गळ्याला कांहीं विकार होऊन थोड्या मिनिटांत मनुष्य मरतें असा एक रोग उत्पन्न झाला आहे असें कळतें.

मे. गनत्राप साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट रजेवरून परत आले. व मि. हाबसन साहेब उमरावतीस परत गेले.

सिमल्याहून व्हाईसराय साहेब कलकत्यास जातांना ग्वालेर व हैदराबाद एथें जाणार असल्याचें वर्तमान आहे. व सर सालरजंग दिवाण साहेब त्यांस मोठी टोलेजंग मेजवानी देण्याच्या तयारींत आहेत अशी बातमी आहे.

रेसिडेंट साहेब विलायतेस रजेवर जाणार त्या विषयीं पुढें अधिक कांहीं वर्तमान नाहीं.

आज तिसरे प्रहरीं मुलींची शाळा पुन्हा स्थापण्याचा विचार करण्या करितां रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर यांचे एथें गांवांतील पुढारी मंडळीची सभा भरली होती. तींत एक म्यानेजिंग कमिटी नेमिली व रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुद्धे सुपरवायजर यांस सेक्रेटरी नेमिलें. व वर्गणीची यादी केली आणि दुसरे कांहीं ठराव करून दसऱ्याचे मुहुर्तानें ही शाळा स्थापन व्हावी असा निश्चय झाला व सभेचें काम आटपलें.

## वर्तमानसार.

काबूलचे सर हद्दीवर १५००० फौज पाठविण्याचा हिंदुस्थान सरकारानें विच्यार केला आहे.

ब्रह्मदेशचा राजा मरण पावल्याची बातमी आलेली खोटी आहे. तो आजारी मात्र आहे असें समजतें.

काबूलच्या अमिराकडे पाठविलेले नवाब गुलामहुसेन परत आले.

जबलपुरच्या उद्योगशाळेवर मेजर हिलेट यांस सुपरइंटेंडेंट नेमिलें.

अलवारचा राजा आपल्या रयतेचें उत्तम प्रकारें संगोपन करित असल्याचें वर्तमान आहे.

रक्तवृष्टी—धुळ्यापासून ३॥ कोसांचे सुमारास नागांव आणि बिलाडी यांचे दरम्यान आकाशांतून रक्ताच्या पावसाचा तुषार पडला असें समजतें.

## नोटिस.

पन्नुसिंग वल्लद उमेदसिंग जमादार रहाणार मलकापुर हल्लीं वस्ती पनज तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मास मी कुलमुखत्यारपत्र आठ रुपयाचे स्टांपावर तारीख १८ माहे नोवेंबर सन १८७६ इसवी रोजीं लिहून दिले असून याच तारखेस सब रजिष्टर अडगाव कचेरींत नोंदून दिलें आहे व तें तुमचे पाशीच होतें तुह्मी माझे घरीं एक वर्ष पावेतो राहून नोकरी केली व अन्न वस्त्र मीच तुह्मास पुरविलें असून शिवाय एक वर्षाचे नोकरी बद्दल रुपये ७५ पंच्याहत्तर तुह्मास देऊन अस्सल मुखत्यारपत्र तुह्मापासून मी परत घेतलें त्यास अजमास बारा महिने झाले. ह्या दिवसांपासून मी तुह्माकडून नोकरी घेतली नसून मुखत्यारपत्रही त्याच वेळेस रद्द असे ह्मणून मी तुह्मास सांगितलें असून तुह्मास आजरोजीं वऱ्हाडसमाचार अकोला पत्रांत खबर दिली आहे कळावें तारीख २१ माहे सप्टेंबर सन १८७८ इसवी.

( सही ) खुशालसिंग वल्लद बापुसिंग
रहाणार पनज
दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ८६ |
| महामारीवरील गोळी | ८१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ८६ |
| वैद्यप्रकाश. | २८८ |
| नादारीचे नियम. | ८८ |

सदर्हू किमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

---

## जाहिरखबर.

विद्यमान डिपुटी कमिशनर साहेब बहादुर जिल्हे अकोले जाहिरनामा सर्वत्र लोकांस कळविण्याकरितां प्रसिद्ध करण्यांत येत आहे कीं मेहेरबान कमिशनर साहेब बहादूर प्रांत वऱ्हाड यांजकडील इंग्रजी स्वारी पत्र नंबर ९० तारीख २३ सेप्टेंबर सन १८७८ चें आल्यांत मेहेरबान स्यानिटरी कमिशनर साहेब बहादूर असें फर्मावितात कीं हल्लीं महामारीचा उपद्रव सुरू असल्यामुळें देऊळगांव राजा एथील यात्रेस येणारे लोकांस सालमजकुरीं मनाई केली पाहिजे ह्मणोन आल्यावरून या नोटिसीनें सर्वांस कळविलें जातें कीं सालमजकुरीं देऊळगाव राजा एथील यात्रेस कोणी जाऊं नये.

तारीख २९ सेप्तेंबर सन १८७८ } R. Bullock
डिपुटी कमिशनर
जिल्हा अकोलें.

## जाहिरात.
### कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकांमध्यें "सिद्धांतकौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथें देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा अनुवृत्तिपूर्वभाग, इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशे शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांच्या मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा. पण वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाठविल्यास टपाल खर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांनीं कृपा करून आह्मांस 'पोष्टपेड' पत्रीं कळवावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८ } रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कौमुदीमहोत्साह कर्ते.

---

## विक्रीस तयार
### महामारीवर नवीन पुस्तक.

मिरजेचे दवाखान्यावरील मेडिकल आफिसर डा. त्रिंबक सखाराम सिरवलकर यांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें महामारी, तिचीं कारणें, निवारण, व उपाय यांजवर पुस्तक छापलेलें आह्माकडे विक्रीस आलें आहे. त्याची किंमत सहा आणे व बाहेर गावीं डाक हशील अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

## जाहिरात.
### उपयुक्त ज्ञानसार.

आह्मी गेल्या जानेवारीपासून "उपयुक्त ज्ञानसार" नावाचें मासिक पुस्तक काढून, त्यांत शेतकी, कारागिरी आणि इंजिनियरिंग ह्या तीन प्रकरणांची माहिती लिहित आहो. पहिल्या विषयांत भूमिपरीक्षा, खतांचे गुणधर्म व त्यांचा उपयोग, पिकांचें मान आणि वनस्पतीपासून व्यापारोपयोगी पदार्थ, स्वदेशांतील व परदेशांतील कारागिरी विद्या, व शिल्पसंबंधीं आणि इंजनेरचे कामाची वेंचक माहिती देत असतों. पुस्तकाची आगाऊ किंमत, घेण्याचें सुरू केल्यापासून एक महिन्याचें आंत ५ रुपये व बाहेरचे लोकांस पोस्टेज सहा आणे पडेल. हें पुस्तक संग्रह करण्यालायक आहे.

नवीन पुस्तकें तयार आहेत तीं,— साहित्यमालिका १–२, सार्थपांडवगीता ८ आणे, सार्थगणेशगीता ३ रुपये, सार्थ सप्तशति रेशमी ३८८, सार्थ सत्याविनायक पूजाकथासहित ८११; या पुस्तकांबद्दल पत्रव्यवहार ठेवणें तो पुणें एथें ज्ञानचक्षूंत, ज्ञानप्रकाशांत, मुंबई एथें इंदुप्रकाशांत आणि वऱ्हाडांत अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत टेवावा.

पुणें हसबनिसांचा वाडा घर नंबर ३३४
काशिनाथ महादेव थत्ते.

---

## सन १८७९ सालची रोजांनेशी.

या पुस्तकास दरसाल जसजसा आश्रय मिळत गेला त्या मानानें दरसाल जास्त सुधारणा करून तें आह्मी पांच सहा वर्षे तयार करीत आलों. सदरील सालच्या रोजनिशीचा सांच्या पूर्वी इतकाच असून सुधारणा मात्र थोडी जास्त केली जाईल. येत्या नोवेंबर २५ तारखेस छापून तयार होईल. यांत इंग्रजी मुसलमानी मराठी महिने, तारखा, वार, तिथि वगैरेची माहिती दिली जाईल. शिवाय सर सालांत येणारे विशेष उपवास, ग्रहणें, सण व त्या संबंधे सरकारी आफिसांत असणाऱ्या सुट्या वगैरेचीही माहिती असेल. मौंजी, विवाहाचे मुहूर्त, रवि उदय अस्ताचें कोष्टक, रोजमोरा चुकविण्याचे माहितीचे कोष्टक, वगैरे निराळींच दिलीं जातील. रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीआरडर, पोष्ठ [ विम्याच्या दरांत झालेल्या फेरफाराच्या विशेष माहिती सुद्धां ], सिविलप्रोसिजर, मुदताचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी इत्यादि अनेक नेहमी जरूर लागणारी कायद्याची माहिती वगैरेचा समावेशहि केला जाईल. समय विशेषीं जास्त मजकूर लिहिण्याची पाळी आली, किंवा जमा खर्चाच्या स्मरणार्थ टिपण करून ठेवावेंसे वाटलें तर त्याकरितां कांहीं जमाखर्चाच्या सदराचे व कांहीं कागद अखेरीस जोडले जातील. महिना, तारीख, वार, तीथ वगैरे संक्षेपानें न देतां पूणपणें लिहिण्यांत येतील. व इंग्रजींतही महिना, तारीख, वार, निराळा दिला जाईल तेणेंकरून ज्यांस मराठी समजत नाहीं अशा लोकांसही या रोजनिशीचा उपयोग होईल. पुढील ह्मणजे १८८० सालचे महिने, वार, तारखांचें कोष्टक इंग्रजी व मराठींत रंगीबेरंगी तयार करून निराळेंच जोडलें जाईल. वगैरे हरएक प्रकारें होईल तितकी सुधारणा करण्यांत येईल. कागद उंची घालून बांधणीही एक दोन प्रकारानें करणार आहोंत.

### रोजनिशीची किंमत

रोजनिशी प्रत नंबर ब्लॉटिंग पेपरसहित जाड पुठ्यानें बांधलेली किंमत बारा आणे, ट० एक आणा.

रोजनिशी प्रत नंबर २ साधी जाड पुठ्यानें बांधलेली किंमत आठ आणे, टपाल हशील एक आणा.

रोजनिशी प्रत नंबर ३ साधी विलायती कापडानें बांधलेली किंमत सात आणे, टपाल हशील एक आणा.

वर लिहिल्या अन्वयें जो किंमत आक्टोबर आखेर आह्माकडे येईल त्या नंबरची रोजनिशी तयार झाल्याबरोबर रवाना करण्यांत येईल. एकदम दहा प्रती घणारास टपाल खर्च पडणार नाहीं.

भाऊ गोविंद सापकार.
ज्ञानचक्षूचे मालक.

---

## आज्ञामालिका
## अथवा
### बादशाही हुकुमांचा संग्रह.

सर्वोपयोगी मासिक पुस्तक.

**निदान ५०० सह्या पाहिजेत.**

ग्याझेट आफ इंडिया ( हिंदुस्थान सरकारचें ग्याझेट ), कलकत्ता व मुंबई व मद्रास या तीन इलाक्यांचीं सरकारी ग्याझेटें, नागपुर व वायव्य व पंजाब या तीन प्रांतांचीं सरकारी ग्याझेटें, व हैदराबाद रेसिडेन्सी आरडर्स वगैरे सरकारी ग्याझेटांतून प्राते आठवड्यास पोलिटिकल [ राजकारस्थानचे ), न्याय, मुलकी बंदोबस्त, विद्या, टपाल, जंगल, अबकारी, पाटबंधारे, इंजिनियरिंग व रेलवे वगैरे अनेक खात्यांचे संबधानें किरकोळ ठाव लोकांचे माहिती करितां ह्मणून प्रसिद्ध होत असतात. परंतु ते सर्व स्वभाषेत नसतां बहुधा इंग्रजी भाषेतच लिहिलेले असतात. यामुळे ते प्रसिद्ध करण्यांतील सरकारचे हेतु पूर्णपणें सिद्ध होण्यास ह्मणजे सर्व लोकांस ते जेव्हांचे तेव्हां व स्पष्टपणें माहित होण्यास मोठी हरकत होते. पण प्रसगीं कित्येकांचे नुकसानही होते. ही उणीव काढून टाकण्या करितां निरनिराळे सरकारी ग्याझेटांतील सर्व लहान मोठे ठरावाचें माहाराष्ट्र भाषेंत भाषांतर करून तें माहे जानेवारी सन १८७९ इसवी पासुन मासिक पुस्तकाचे रूपानें प्रसिद्ध करण्याचा विचार केला आहे.

आज्ञामालिकेच्या प्रत्येक अंकांत मजकुराचे मानानें अष्टपत्री सांच्याचीं ४०–४८ पृष्ठें येतील; व तिची सालीना टपाल हशीलासह अगाऊ किंमत ५ रु० पडेल. फुटकळ अंकास ८८ पडतील. पत्रें पाठविणारांनीं तीं खालीं लिहिलेल्या गृहस्थांतून कोणाकडेही पाठवावींत. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

मुंबई— नेटिवओपिनियन पत्राचे मा.
पुणें— रा. रा. रावजी प्रभाकर भाने.
मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीचे सेक्रेट.
ठाणे–– सुर्योदयाचे म्यानेजर.
रत्नागिरी— जगन्मित्राचे म्यानेजर.
अहमदनगर– न्यायसिंधूचे म्यानेजर.

सर्व सुज्ञ लोकांनीं या महत्वाचे व लोकहिताचे कृत्यास उदार आश्रय देण्याची त्वरा करावी हीच त्यांस सविनय प्रार्थना आहे.

तारीख २५ माहे आगष्ट सन १८७८ इसवी.

व्यवस्थापक
**आज्ञामालिका**

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापुन प्रसिद्ध केलें.